# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

महासभा दि. २०/१२/२००७

आज गुरुवार दि. २०/१२/२००७ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०४ दि. १०/१२/२००७ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | नरेंद्र मेहता | महापौर |
| २) | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | उपमहापौर |
| ३) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील जयंत महादेव | सभागृह नेता |
| ५) | दिव्या अशोक तिवारी | सदस्या |
| ६) | म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ७) | शानू जो. गोहिल | सदस्या |
| ८) | पाटील उमाताई शाम | सदस्या |
| ९) | वैती नर्मदा यशवंत | सदस्या |
| १०) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| ११) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १२) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १३) | नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| १४) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १५) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १६) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| १७) | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | सदस्य |
| १८) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १९) | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | गटनेता |
| २०) | पाटील धनेश परशुराम | गटनेता |
| २१) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| २२) | पाटील शरद केशव | सदस्य |
| २३) | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर (गाडोदिया) | गटनेता |
| २४) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| २५) | पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| २६) | व्यास सुधा वासुदेव | सदस्या |
| २७) | फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| २८) | शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| २९) | म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| ३०) | पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| ३१) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ३२) | डिमेलो बर्नड आल्बर्ट | सदस्य |
| ३३) | बाविघर सिसिलीया विजय | सदस्या |
| ३४) | परेरा टेरी पॉल | सदस्य |
| ३५) | सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू | सदस्या |
| ३६) | कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ३७) | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | सदस्या |
| ३८) | ठाकुर प्रकाश पांडुरंग | सदस्य |
| ३९) | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | सदस्य |
| ४०) | शर्मा भगवती | गटनेता |

| | | |
|---|---|---|
| ४१) | भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |
| ४२) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ४३) | पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ४४) | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | सदस्य |
| ४५) | वर्षा भानुशाली | सदस्या |
| ४६) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| ४७) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४८) | जंगम लक्ष्मण गणपत | सदस्य |
| ४९) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ५०) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ५१) | पुजारी कांचन शेखर | सदस्य |
| ५२) | मुंज वासुदेव भास्कर | सदस्य |
| ५३) | सय्यद नुरजहॉं नझर हुसैन | सदस्या |
| ५४) | शेख नुर मोहम्मद अेहमद | सदस्य |
| ५५) | खान शफीक अहमद सादत | गटनेता |
| ५६) | भाटकर प्रेरणा प्रमोद | सदस्या |
| ५७) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५८) | वैती विजया हेमचंद्र | सदस्य |
| ५९) | पालांडे प्रशांत भगवंतराव | सदस्य |
| ६०) | ठाकूर कल्पना हरिहर | सदस्या |
| ६१) | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | सदस्य |
| ६२) | मोदी चद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ६३) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ६४) | दुबे रामनारायण सदानंद | सदस्य |
| ६५) | वैती चंद्रकांत सिताराम | सदस्य |
| ६६) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६७) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६८) | चक्रे वंदना रामदास | सदस्या |
| ६९) | शेख सलिम दाउद | सदस्य |
| ७०) | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | सदस्य |
| ७१) | माळी हेमा रविंद्र | सदस्या |
| ७२) | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | सदस्या |
| ७३) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ७४) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ७५) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |

**रजेचा अर्ज -**

| | | |
|---|---|---|
| १) | पाटील प्रफुल्ल काशीनाथ | सदस्य |
| २) | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | सदस्या |

(वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताने सभेला सुरुवात करण्यांत आली.)

**मा. महापौर :-**

सचिवजी आजच्या सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

पिठासिन अधिकाऱ्याच्या परवानगीने, या सुचनेव्दारा आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा गुरुवार दि. २०/१२/२००७ रोजी सकाळी ११.००वा. मिरा भाईंदर मुख्य कार्यालय तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात मा. महासभा सुचना क्र. ४ दि. १०/१२/२००७ रोजीच्या सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणावर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होत आहे. सकाळचे ११.१५ वाजून मि. झालेले आहे. अर्धा तासाची वेळ असेल.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर महोदय, या प्रश्नोत्तराच्या तासाच्या अगोदर आपल्याला एस.ई.झेड. संदर्भामध्ये माहिती पुरवण्यासाठी उपायुक्त साहेबांना आपण आदेश दयावा.

**मा. महापौर :-**

विषयपत्रिकेच्या शेवटच्या विषयानंतर आपण यावर चर्चा करु या.

**अनंत पाटील :-**

मी आपणा सर्वांचे लक्ष केंद्रित करण्यासाठी हा प्रश्न विचारत आहे. कारण पूर्वी अशीच मिटींग झाली होती. त्यावेळेला आयुक्त, उपायुक्त.....

**मा. महापौर :-**

मी मान्य करतो, शेवटचा विषय संपल्यानंतर आपण या विषयावर चर्चा करु या. आपल्याला रितसर माहिती देण्यात येईल.

**नगरसचिव :-**

प्रश्न क्र. १ श्री. प्रशांत भगवंतराय पालांडे यांचा प्रश्न आहे.

**मा. महापौर :-**

श्री. पालांडे साहेब आपल्याला यावर उत्तर दिलेले आहे. यावर आपले अजून काय म्हणणे आहे का?

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, हा जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्याच्या मागचा माझा उद्देश मी सभागृहाला सांगतो. ज्या अधिकाऱ्याच्या संदर्भात जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. तो अधिकारी त्या पदासाठी लायक आहे किंवा नाही. हा माझा मुद्दा नाही. त्यांच्याकडे ती गुणवत्ता आहे किंवा नाही हा ही माझा मुद्दा नाही किंवा ते त्या पदावर राहून कुठल्याप्रकारचे काम करत आहे किंवा काम करत नाही हा प्रश्न विचारण्यामागे ही माझा उद्देश नाही. मला असे विचारायचे आहे की, मा. महासभागृहामध्ये सर्व मा. सदस्य, नगरसेवक जे एखाद्या प्रस्तावावर ठराव पारित करतात. त्याची अंमलबजावणी होते की नाही. यासाठी खास कारण आहे की त्या ठरावाला प्रशासन कोणती किंमत देते. १ जून रोजीच्या महासभेमध्ये या संदर्भामधला ठराव महासभेने सर्व मताने पारित करण्यात आलेला होता. तर यासाठी मी आजचा हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. हे जे सभागृह आहे ते मिरा भाईंदर शहरातील सर्वोच्च सभागृह आहे आणि जनता आपला प्रतिनिधी या सभागृहामध्ये पाठविते आणि विविध विषयांवर या सभागृहामध्ये चर्चा होते. आपण या सभागृहाला प्लॅनिंग ॲथोरिटी म्हणतो. थोडक्यात सर्व मिरा भाईंदर नागरिकांचे लक्ष या सभागृहात लागलेले असते. एखादा विषय "ज" च्या प्रस्तावाखाली असू दे किंवा प्रशासनाने आणलेला प्रस्ताव असू दे. अत्यंत अभ्यासपूर्ण चर्चा या सभागृहामध्ये केली जाते. अनेक नगरसेवक या सभागृहामध्ये अभ्यासू आहेत. अनुभवी आहेत. त्या सर्वांबरोबर चर्चा केल्यानंतर एखादा ठराव पारित करण्यांत येतो आणि माझ्या माहितीप्रमाणे हा ठराव त्यावेळी १ जूनच्या महासभेमध्ये सर्वानुमते पारित झालेला आहे. पारित झालेल्या ठरावाबद्दल प्रशासनाने काय केले याची माहिती मला आज हवी आहे. हा माझा पहिला मुद्दा.

**बालाजी खतगांवरकर (मा. आयुक्त (मु.) साो.) :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलत आहे की, सन्मा. सदस्य श्री. पालांडे साहेबांनी हा जो प्रश्न सभागृहात दिलेला आहे. हा प्रश्न सभागृहाला नविन नाही. यापूर्वी सुद्धा सन्मा. सदस्य सदस्यांनी हा प्रश्न ''ज'' प्रस्तावाखाली आणि इतर चर्चेतसुद्धा उपस्थित केलेला होता. त्यावर सभागृहामध्ये तत्कालिन उपस्थित सदस्यांमध्ये व प्रशासनाकडून इंतर्भूत चर्चा झाली आणि आपण प्रश्न मांडल्याप्रमाणे या सभागृहामध्ये ठराव पारित केला ही वस्तूस्थिती आहे आणि निश्चितच या सभागृहाच्या ठरावाप्रमाणे या ठिकाणी कामकाज करण्यात येते. आपण आपल्या प्रश्नामध्ये सन्मा. श्री. संभाजी पानपट्टे, (उपायुक्त) यांना पशूशल्य चिकित्सक अधिकारी या पदावर समान वेतनश्रेणीमध्ये नेमणुक करावी असा प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्या अनुषंगाने खुलासा करु इच्छितो आणि लेखी खुलासासुद्धा आपल्याला देण्यांत आलेला आहे. श्री. संभाजी पानपट्टे (उपायुक्त) याबद्दल याच सभागृहाने निर्णय घेतलेला आहे. याची आपल्याला कल्पना असायला पाहिजे आणि या सभागृहाने निर्णय घेतल्यानंतर प्रशासनाने त्याची शासनाच्या मान्यतेने अंमलबजावणी केलेली आहे. हा फार महत्त्वाचा मुद्दा आहे आणि शासनाने शासन स्तरावरील वर्ग-१ अधिकारी, महासभेने ठराव पारित केल्याप्रमाणे महापालिकेच्या आस्थापनेवर उपायुक्त या पदावर त्यांची याठिकाणी नेमणुक करण्यांत आलेली आहे याची आपल्याला सर्वप्रथम कल्पना देवू इच्छितो. तद्नंतर मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजाची तपासणी करण्याकरिता अनुसूचित जाती आयोगाचे आयोग त्याठिकाणी उपस्थित झाले होते. सन्मा. आयोगासमोर अनुसूचित जातीचे जे पद असतात जो अनुशेष रेषोमध्ये असतो ते भरण्याबद्दल चर्चा झाली होती आणि त्याचे मिनिटस सुद्धा प्राप्त झाले होते. अनुसूचित जाती आयोगाला प्रशासनाने वस्तूस्थिती माहिती सादर केली होती. अनुसूचित जाती आयेगाने मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर तीन उपायुक्त असल्यामुळे एक पद अनुसूचित जातीमधून भरण्याची कार्यवाही करावी अशी धोरणात्मक सुचना मांडली होती. परंतु, प्रशासनाने त्यांच्यासमोर वस्तुस्थिती मांडली होती. या तीन उपायुक्तापैकी शासनाने जे निकष दिलेले आहेत. त्यात दोन प्रतिनियुक्तीचे अधिकारी आहेत. एक महापालिकेचा अधिकारी आहे आणि प्रतिनियुक्तीच्या

अधिकाऱ्यांना अनुशेष लागू नाही आणि महापालिकेने ऑलरेडी शासनाकडील अधिकारी याठिकाणी सामावून घेतलेले आहे ते खुल्या प्रवर्गाचे आहे. त्यामुळे उपायुक्त पदावरचे अनुसूचित जातीचे पद भरण्याकरिता सध्या पद मंजूर नाही ते आपल्याकडील सन्मा. सदस्यांनी ही बाजू मांडल्यानंतर त्यांना ही परिस्थिती अवगत करण्यात आलेली होती. त्यामुळे सभागृहाने सामुहिक असे एखादया अधिकाऱ्याला सुरुवातीपासून घ्यायचे आणि त्यांना इतरत्र कुठेतरी नियमबाह्य करण्याबद्दलचा ठराव करायचा ही अशी अंमलबजावणी प्रशासनाला करता येत नाही. हे आणून दिल्यानंतर अनुसूचित जातींच्या पदाबाबत एक जास्तीचा उपायुक्त याठिकाणी मंजूर करण्याचे त्या ठरावात या सभागृहाने मान्यता दिलेली आहे आणि त्या अनुषंगाने प्रशासनाने शासनाकडे जास्तीचे एक उपायुक्त पद मंजूरसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे व ते शासनाच्या विचाराधीन आहे आणि ते पद मंजूर होताच त्याठिकाणी जातीचे अधिकारी रितसर भरण्याची कार्यवाही प्रशासनाकडून केली जाईल.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, माझा प्रश्न असा होता की, कोणाचे प्रमोशन किंवा डिमोशनचा प्रश्न मी विचारलेला नव्हता किंवा श्री. पानपट्टे साहेबांची नियुक्ती चुकीची आहे असे ही मी म्हणत नाही. माझा प्रश्न वेगळा आहे. आपण मला सांगा की, मा. महासभेचा जो ठराव पारित केलेला आहे.

**बालाजी खतगांवरकर (मा. आयुक्त (मु.) साो.) :-**

श्री. पालांडे साहेब आपण लेखी एक देता आणि बोलता एक. वास्तविक सभागृहाला आपला पूर्ण प्रश्न वाचून देण्याची सुद्धा माझी हरकत नाही. आपण स्पष्टपणे आपल्या प्रश्नामध्ये असे म्हटलेले आहे की, श्री. पानपट्टे साहेबांना पशुशल्य अधिकारी या पदावर घेता येते का, हा तुमचा प्रश्न आहे.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब मी तेच बोलत आहे. त्याच विषयावर येत आहे.

**बालाजी खतगांवरकर (मा. आयुक्त (मु.) साो.) :-**

असे कदापि होउ शकत नाही. ते नियमबाह्य आहे. तसे करता येत नाही.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब मी त्याचबद्दल बोलत आहे. आपल्या महासभेमध्ये तो ठराव पारित झालेला होता. त्या ठरावाच्या पुढे आपण काय कार्यवाही केली? सभागृहाला त्या संदर्भात आपण काही कळविले का?

**बालाजी खतगांवरकर (मा. आयुक्त (मु.) साो.) :-**

सन्मा. सदस्यांना मी अवगत केलेले आहे की, तुम्ही तो ठराव अर्धवट वाचू नका. त्या ठरावामध्ये दुरुस्ती होउन तो ठराव पारित झालेला आहे आणि त्याच्यामध्ये स्पष्ट लिहिलेले आहे. एक जास्तीचा उपायुक्त शासनाकडे मागणी करावे. त्याची अंमलबजावणी आपण केलेली आहे.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, आपल्याकडे दोनच ''ड'' वर्ग महानगरपालिका आहे आणि दोनच पद मंजूर आहेत तर आणखिन जास्तीचे अजून कसे काय आपल्या येथे मंजूर होईल?

**बालाजी खतगांवरकर (मा. आयुक्त (मु.) साो.) :-**

आपल्याला याची कल्पना देवू इच्छितो की, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लोकसंख्येची जी वाढ आहे, या शहराची जी प्रगती आहे. सन्मा. प्रधान सचिव साहेबांनी सुद्धा या "ड" सुचीमध्ये बदल करण्याचे धोरण निश्चित केलेले आहे आणि त्याप्रमाणे भविष्यात ते पद मंजूर होणार आहे.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब माझा पहिला प्रश्न असा होता की, जो ठराव पारित झालेला आहे. त्याच्याबद्दल प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे? सभागृहाला कळविले का, त्याच्यापुढे काय कार्यवाही केली? त्याच्यानंतर जवळ जवळ तीन-चार मा. महासभा झालेली आहे. एखादा ठराव पारित करतो. तो "ज" च्या प्रस्तावाखाली असू दे किंवा प्रशासनाने आणलेला असू दे. त्या ठरावावर काय अंमलबजावणी केली हे प्रशासनाने पुढे सांगायला हवे की नको.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, हे असे झालेले आहे की, सभागृहाच्या शेवटच्या वेळी "ज" चे प्रस्ताव येतात. आपला हा प्रस्ताव त्याचपद्धतीने शेवटच्या वेळी आला होता आणि सभागृहाने मंजूरी दिली. असे असताना जर ही चुकीची बाब आहे. या सभागृहाने केलेला ठराव चुकीचा आहे याची नोंद या महासभेमध्ये पुन्हा दुसऱ्या मा. महासभेमध्ये झाली पाहिजे. श्री. पालांडे साहेबांनी जे विचारले ते बरोबर आहे. म्हणजे आम्ही जे ठराव करतोय त्याला प्रशासन नंतर सांगतोय की, हे चुकीचे आहे. मग असे प्रस्ताव चुकीचे आहेत तर तुम्ही त्यावेळेस का सांगत नाही?

**मा. महापौर :-**

सन्मा. नगरसेवक ओमप्रकाश अग्रवालजी हा प्रश्न सन्मा. नगरसेवक प्रशांत पालांडे यांचा आहे आणि जर त्यांनी याबद्दल बोलले तर बरे होईल अन्यथा प्रत्येक नगरसेवकाची भावना अशी होईल आणि हा विषय खुप लांब होईल व त्यांचा मुळ वेळ निघुन जाईल.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. नगरसेवक ओमप्रकाश अग्रवालजी जे सांगत आहेत तेच म्हणणे माझे ही आहे. ''ज'' चा प्रस्ताव असू दे किंवा प्रशासनाने आणलेला एखादा प्रस्ताव असू दे. त्याच्यावर बहुमताने ठराव पारित होतो. एकमताने ठराव पारित होतो आणि त्याच्यामध्ये असे ही म्हटलेले आहे की, तो जो प्रस्ताव आहे तो प्रारूप नियम २००२ कलम ब अन्वये त्वरीत अंमलबजावणी चा ठराव सर्वानुमते त्या महासभेमध्ये पारित झालेला आहे.

**मा. महापौर :-**

असे आहे की, जो काही ठराव त्यावेळी झाला होता. आपल्याकडे ठरावात एखादी त्रुटी असेल किंवा नियमात बसत नसेल तर आपण ते सभागृहात खुलासा करतो. मागच्यावेळी सन्मा. सदस्या प्रभात ताई पाटील व सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेबांनी विषय मांडला होता की, आपल्याकडे जे संगणकचालक आहेत त्यांना एक्सटेंशन द्यावे. त्यावेळी प्रशासनाने आपली भुमिका स्पष्ट केली की, आम्हाला ते करता येणार नाही. त्यानंतर सभागृहाची भावना अशी होते की, आपल्या ठरावाची अंमलबजावणी होणार आहे. सेम प्रश्न येथे आहे. जो ठराव झालेला होता. त्याची अंमलबजावणी झालेली नाही. त्या संदर्भात आपण सभागृहाला परत माहिती द्यायला हवी की, सदरचा ठराव चुकीचा झालेला आहे व त्यावर आम्हांला अंमलबजावणी करता येत नाही.

**प्रशांत पालांडे :-**

तो प्रस्ताव विखंडीत झालेला आहे का?

**मा. महापौर :-**

आता या ठरावाची अंमलबजावणी करायला आपल्याला कायद्याने काय अडचण आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, हा जो ठराव ज्यावेळेला झाला त्यावेळेला सभागृहात मी उपस्थित होतो. एकमताने ठराव पास झाला असे जे लिहिलेले आहे ते चुकीचे आहे. तेव्हा आम्ही विरोध केला होता. आमचा विरोध नोंदविला गेला नाही. त्यानंतर मंत्रालयात मी अपिलात गेलो. तत्कालिन सचिव ना.बा.पाटील त्यांनी मला धडधडीत सांगितले होते की, म्हात्रे साहेब हा ठराव ही चुकीचा आहे आणि नियुक्ती ही चुकीची आहे. तुम्ही माझ्या विरोधात हायकोर्टात जा आणि तेथून ऑर्डर घेउन या. कारण मला वरिष्ठांचे या नियुक्तीबाबत दबाव आहेत. फोन येतात माझ्यापेक्षा ज्येष्ठ लोक ज्यांना आपण त्यांच्या पदापेक्षा त्यांचा दबाव या बदलीकरिता आहे. कृपया करुन त्यांनी मला हाथ जोडले. तुम्ही माझ्या विरोधातच हायकोर्टात जा आणि ऑर्डर घेउन या म्हणजे मला इम्लीमेन्टेशन करता येईल एवढे मला बर्डन आहे. हे श्री. ना.बा.पाटलांचे वक्तव्य आहे. मी दिडवर्षी याच्यावर पत्रव्यवहार केला आहे. श्री. पानपट्टे साहेबांवर आमचा व्यक्तिगत असा आकस काहीच नाही. हे जे पद होते ते महापालिकेच्या आस्थापनेवर ज्यांना ज्येष्ठता मिळेल त्यांच्याकरिता राखीव असलेले पद होते. अधिकाऱ्यांनी वरिष्ठ लोकांनी स्वतःच्या एका माणसाची येथे सोय लावली. महापालिकेच्या आस्थापनेवर एकाची तजबिज लावली म्हणून उच्च पातळीवरून संपूर्णप्रकारे राजकिय म्हणा, प्रशासकीय म्हणा, श्री. ना.बा.पाटील (सचिव) यांच्यावर दबाव आणून त्या नियुक्तीची पत्र काढली गेलेली आहेत. जवळ जवळ दिड वर्षापासून याच्यावर माझा कॉरस्पॉन्डस होता. याच्यावर प्रशासनाने कुठलाही निकाल घेतला नाही. उलट कार्यवाही केली आणि हा जो ठराव केलेला आहे, या ठरावाला आमचा त्यावेळेला ही विरोध होता. आपण प्रोसिडींग काढून बघा.

**प्रशांत पालांडे :-**

मला सचिव साहेबांना एक प्रश्न विचारायचा आहे, आपण एकमताने लिहिलेले आहे आणि सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब म्हणतात की, तो ठराव एकमताने झालेला नाही. पण त्या मिनिट्समध्ये त्या ठरावाची प्रत आहे, त्याच्यामध्ये एकमताने लिहिले गेले आहे. नक्की काय?

**मिलन म्हात्रे :-**

ते प्रोसिडींग काढून आपण वाचावे. आपण आम्हाला खोट पाडता.

**नगरसचिव :-**

प्रोसिडींग पुढच्यावेळेला येईल तेव्हा समजेल.

**मिलन म्हात्रे :-**

पुढच्या वेळेला कशाला? विषयपत्रिकेवर आज हा विषय आलेला आहे तर ह्याचे ठराव आणि प्रोसिडींग तुमच्या डायसवर पाहिजे. हा तुमचा धडधडीत आरोप आहे. याच्यामधला मी तक्रारदार आहे. आमच्याार थोपता की,आम्ही त्या ठरावाला सपोर्ट केला असे होत नाही. वाहनाचे हायकोर्टात मी पिटीशन केले होते तेव्हा याच श्री. संभाजी पाणपट्टेनी खोटी एलिगेशन हायकोर्टमध्ये केली की, सभागृहामध्ये सदस्यांनी या ठरावाला सपोर्ट केला. प्रोसिडींगची इंग्लिश भाषांतर करून मी हायकोर्टला दिले आणि त्यांचे एफिडेवीट खोट ठरले. मा.

महापौर साहेब, हाय जोक नाही. आम्ही ज्या ठरावाला विरोध केलेला आहे. तो विरोध आमच्या प्रत्येक सभेमध्ये आला पाहिजे. त्या प्रोसिडींगला आला पाहिजे. वाटेल तसे करून चालत नाही. आपण लिहा एक विरोधात सगळे दहा विरोधात सगळे. ही जी सवय आहे ती तुम्ही बंद करा. आम्हाला ते झेलायला लागते. हायकोर्टात माझ्यावर एलिगेशन झाले. तुमच्या मागे बसलेले अधिकारी आहेत त्यांनी ॲफिडेव्हीटवर एलिगेशन केलेले आहे. ही फार गंभीर बाब आहे. आम्ही असे चालू देणार नाही. याच्यामध्ये आमचा विरोध आहे तो का आलेला नाही, ते सांगा. ह्या प्रश्नाशी संबंधितच मी बोलत आहे. प्रोसिडींग मागवा आणि त्याच्यात उल्लेख करा, काय आहे ते नाहीतर असे होते की, मंत्रालयात आम्ही तक्रारी करायच्या आणि सभागृहामध्ये सपोर्ट करायचा हे धंदे मिलन म्हात्रे ह्यांनी कधीही केलेले नाही आणि पुढे करणार ही नाही.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, माझा पहिला असा होता की, ठराव पारित झाल्यानंतर त्या ठरावावर काय कार्यवाही झाली ती सभागृहाला कळवायला पाहिजे. त्याचे उत्तर अजून का कळवले नाही ते साहेबांनी दिलेले नाही.

**मा. महापौर :-**

साहेबांनी येथे तेच सांगितले की, ॲक्च्युअली ते पद आपल्याकडे मंजुर नव्हते.

**प्रशांत पालांडे :-**

सभागृह एखादा ठराव पारित करतो ते सभागृहाला पुढच्या किंवा त्याच्या पुढच्या महासभेमध्ये सांगितले पाहिजे की, नको की हा ठराव चुकीचा होता. तो ठराव विखंडीत केला आहे का? शासनाकडे पाठविला आहे का?

**मा. महापौर :-**

शासनाकडे पाठवलेला आहे आणि तेथुन अजूनपर्यंत काही रिप्लाय आलेले नाही.

**प्रशांत पालांडे :-**

किती वेळामध्ये यायला पाहिजे? त्याच्यात काय नियम आहे?

**मा. महापौर :-**

ते उत्तर तेथुन येणार आहे.

**प्रशांत पालांडे :-**

पण त्याला काहीतरी मुदत असेल ना, तीन महिने, सहा महिने.....

**बालाजी खतगांवकर (उपायुक्त (मु.) सो.) :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा दि. ०१/०६/२००७ ला आपण जो ठराव म्हणता तो ठराव पारित केला होता. त्या अनुषंगाने प्रशासनाने दि. ०४/०६/२००७ ला शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. म्हणजे तीन दिवसाच्या नंतर तात्काळ तो प्रस्ताव शासनाकडे सादर केलेला आहे.

**प्रशांत पालांडे :-**

शासनाकडे पाठवलेला आहे का?

**बालाजी खतगांवकर (उपायुक्त (मु.) सो.) :-**

होय.

**प्रशांत पालांडे :-**

मग आपण जे म्हणतो की, प्रारूप नियम २००२ कलम (ज) प्रमाणे त्वरित मग त्याच्याबद्दल आपण काय म्हणता? त्या मा. महासभेमध्ये आपण उपस्थित होता की, आयुक्त साहेब उपस्थित होते?

**बालाजी खतगांवकर (उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी नव्हतो. डायसवर आयुक्त साहेबच होते.

**प्रशांत पालांडे :-**

माझ्याकडे मिनिटस आहेत त्यात त्यावेळी तुम्ही उपस्थित होता.

**बालाजी खतगांवकर (उपायुक्त (मु.) सो.) :-**

आस्थापना म्हणून उत्तर मी दिले असेल. पण त्यावेळेला डायसवर साहेब होते.

**प्रशांत पालांडे :-**

पण त्यावेळी आयुक्त साहेबांचे कुठलेही स्टेटमेंट नाही की, तो ठराव बरोबर आहे की, चुकीचा आहे. त्यांनी त्यांचे मत नोंदवायला पाहिजे की, नको?

**मिलन म्हात्रे :-**

श्री. पालांडे साहेब, या नियुक्तीमध्ये शासनाचे असे जी.आर. आहेत की, कुठल्याही अधिकाऱ्याच्या नियुक्तीबद्दल, बदलीबद्दल कुठल्याही राजकिय पक्षाचे किंवा पुढाऱ्याचे पत्र नसावे. हा एक जी. आर. आहे. श्री. पानपट्टे साहेबांच्या संपुर्ण त्या नियुक्तीच्या प्रकरणामध्ये एकुण किती राजकिय पत्र व्यवहार आहे. मला सगळ माहिती आहे. मी त्याच्या सर्व सर्टीफाय कॉपी काढल्या आहेत. तुम्ही त्याचे विश्लेषण कराल का? या डी.आर. चे उल्लंघन करून या नियुक्तीमध्ये अमुक अमुक लोकांनी त्याच्यावर पत्रव्यवहार केला आहे आणि तो रेकॉर्डवर आला आहे. माहितीच्या अधिकारामध्ये मी सर्व मिळवलेले आहे. त्याचा जरा उल्लेख करा म्हणजे त्या जी.आर.चे उल्लंघन झालेले आहे हे ही खुले होउ द्या.

**आसिफ शेख :-**

सन्मा. पिठासिन अधिकारी, याठिकाणी आमचे सन्मा. सदस्य प्रशांत भगवंतरावजी पालांडे साहेब यांनी जो विषय उपस्थित केलेला आहे. श्री. संभाजीराव पानपट्टे, उपायुक्त या संदर्भात आणि सन्मा. सदस्य मिलनजी म्हात्रे यांनी याठिकाणी व्यवस्थितपणे त्यांच्या मताप्रमाणे खुलासा केलेला आहे. श्री. संभाजीराव पानपट्टे, उपायुक्त यांना मिरा भाईंदर महानगरपालिकेत कायम स्वरूपी उपायुक्त पदी नेमणूक करण्या संदर्भात बऱ्याच लोकांनी, राजकीय पक्षाच्या लोकांनी त्यामध्ये पत्रव्यवहार केलेला आहे. त्या मताशी मी देखील सहमत आहे. परंतु, एखादा निर्णय सुरूवातीच्या महानगरपालिकेने घेतल्यानंतर बहुमताने तो ठराव मंजुर झालेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आमचा विरोध झालेला आहे.

**आसिफ शेख :-**

विरोध होता ते बरोबर आहे पण ठराव.....

**मिलन म्हात्रे :-**

विरोध नोंदवला पाहिजे ना. अन्यथा बहूमत आणि विरोधला अर्थ काय? सभागृहामध्ये विरोध नोंदवला असेल तर ते सभागृहामध्ये आले पाहिजे. सभाशास्त्रानुसार आले पाहिजे. आपण प्रशासनाच्यावतीने आमच्यावर एलिगेशन करता ना, त्यामुळे बहूमत बोलू नका.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य आपण बोलत असताना मी इंटरफेयर करत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही आमच्यावर ते थोपत आहेत. आमचा विरोध होता हे मी स्पष्ट बोलतोय. या सभागृहात मी हजर होतो.

**आसिफ शेख :-**

आपला विरोध नोंदविला नाही आणि आपण हे जे बोलत आहात ते बरोबर आहे. मी बोललो की, ठराव सर्वानुमते मंजूर झालेला नाही तर ठराव बहूमताने मंजूर झाला असे मी बोललो.

**मिलन म्हात्रे :-**

बहूमताचा अर्थ काय होतो?

**आसिफ शेख :-**

बहूमत म्हणजे मेजोरिटी.

**मिलन म्हात्रे :-**

सगळ्यात जास्तीत जास्त मते आणि त्याच्यात एक जरी विरोधी असेल तर तसे मेन्शन करायला लागते. एक विरोधात सर्व हे बोला. गोड बोलून भाषा बदलत नाही. ऐकायला बरे वाटते.

**आसिफ शेख :-**

तुमचे म्हणणे बरोबर आहे. ठराव सर्वानुमते मंजूर आणि बहूमताने मंजूर.

**मिलन म्हात्रे :-**

एक विरोधात सगळे बहूमत होउ शकत नाही. एवढे मला माहित आहे.

**मा. महापौर :-**

बहूमताशिवाय ठराव मंजूर होत नाही. सर्वानुमते मंजूर झालेला नाही. पण बहूमताने नक्कीच झाला असेल.

**मिलन म्हात्रे :-**

आमचा विरोध आहे तो आपण या प्रोसिडींगला नोंदवला का? एवढे मला सांगा.

**मा. महापौर :-**

बाकी लोकांचे विरोधच झाले.

**मिलन म्हात्रे :-**

असे नाही. त्याच्यावर मतदान झाले का?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. प्रशांत पालांडे साहेबांच्या प्रश्नोत्तराचे अर्धा तास संपत येईल. हा प्रश्न त्यांचा आहे. त्यांना वेळ दिलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पण ही मागच्या सभागृहाची गोष्ट आहे.

**मा. महापौर :-**

हा प्रश्न त्यांचा आहे. त्यांची वेळ संपत जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

या ठरावाच्या वेळेला हे सन्मा. सदस्य सभागृहात नव्हते.

**मा. महापौर :-**

आपण बसून घ्यावे.

**आसिफ शेख :-**

तत्कालिन महापालिकेने हा ठराव पारित केलेला होता तेव्हा आम्ही सदस्य होतो. त्यांनी जरी प्रश्न विचारला असेल तरी आमचे ते कर्तव्य आहे. आम्ही त्या ठरावाला समर्थन केले आहे म्हणून आम्हांला बोलायला लागेल. तुम्ही असे कसे म्हणता की, त्यांनी प्रश्न विचारलेला आहे. म्हणजे काय तुम्ही आमचा आवाज दाबायचा प्रयत्न करता का? आम्ही बोलतो आम्हांला बोलू द्या. आम्ही सभेत होते ज्यावेळी ठराव पारित झाला तेव्हा आम्ही सदस्य होतो आणि तेव्हा श्री. प्रशांत पालांडे हे सदस्य नव्हते. आम्हांला बोलू द्या. तत्कालिन महानगरपालिकेने जो ठराव केलेला आहे. ठराव क्र. १५ दि. ५/७/२००४ रोजी, ठराव पारित झाल्यानंतर हा ठराव बहूमताने मंजूर झालेला आहे. त्यावेळी सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी विरोध केला त्यांचे म्हणणे बरोबर आहे. काही राजकीय नेत्यांनी पत्रव्यवहार केला तेही त्यांचे म्हणणे बरोबर आहे. परंतु, ठराव बहूमताने मंजूर झालेला आहे. त्यांनतर सन्मा. तत्कालिन आयुक्त श्री. आर.डी. शिंदे साहेब यांनी त्या ठरावासंदर्भात कार्यवाही करण्यासाठी शासनाकडे ठराव पाठवलेला होता. शासनाने त्या संदर्भात आपल्याला पत्र पाठवले तर शासनाचे नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र, मिरा भाईंदर महापालिका/२००४/८६८/प्र.क्र.१४८/०४/नवि-२८, मंत्रालय, मुंबई-४०००३२ दि. २४/६/२०००४.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण मुद्दयाचे बोला. अर्धातास दिलेला आहे. तो त्यांचा वेळ आहे.

**आसिफ शेख :-**

माझे याठिकाणी एवढेच म्हणणे आहे की, जेव्हा एखादा निर्णय शासनाने घेतला. एखाद्या अधिकाऱ्याला याठिकाणी कायम स्वरुपी नेमणुक करण्याचा तेव्हा जर तो विषय पुन्हा महासभेत येउन मा. महासभा दुसरा ठराव पारित करते. तर शासनाच्या एखादया निर्णयाविरुद्ध पुन्हा ठराव पारित होत असेल तर आपण कृपया इतिहास आठवा.

**मा. महापौर :-**

हा ठराव कोणी केला आहे?

**आसिफ शेख :-**

पुन्हा ठराव केला. त्याची आवश्यकताच नव्हती. पहिला ठराव केलेला आहे त्याला सुचक - श्री. चंद्रकांत वैती आणि अनुमोदक - श्रीम. हेलन गोविंदजी आहे.. जेव्हा पिठासीन अधिकारी सन्मा. उपमहापौर श्री. मुझफ्फर हुसैन साहेब होते. हा दि. ०५/०६/२००४ रोजीचा हा ठराव व ठराव क्र. १५, त्याच्यानंतर पुन्हा दुसरा ठराव केलेला आहे. तो म्हणजे त्यांना पश्चात बुध्दी आठवलेली आहे. ते दि. ०१/०६/२००७ ला, म्हणजे मा. महासभा एक ठराव पारित करते त्याच्यानंतर पुन्हा तीन वर्षानी पश्चात बुध्दी आठवते की, पुन्हा ठराव करा. मला याठिकाणी असे स्पष्ट म्हणायचे आहे की, जेव्हा शासन कोणत्याही कामासंदर्भात निर्णय घेतो तो निर्णय सर्वांना बाध्य आहे आणि एखादी गोष्ट जर आपण शासनाच्या विरोधात करायला गेलो तर आपण इतिहास आठवा. मागच्या वेळी ही बरेच निर्णय आपण शासनाच्या विरोधात घेतल्यामुळे तत्कालीन नगरपालिका बरखास्त झालेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ते निर्णय नव्हते. तुम्ही सभागृहामध्ये बेकायदेशीर काम केले होते. आपण विषयाला कुठेतरी वळण देवू नका. सभागृहातले अधिकार तुम्ही चुकीच्या मार्गाने वापरले होते. त्यामुळे तुम्हाला ते भोगावे लागले.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्याला जे बोलायचे आहे ते बोला.

**आसिफ शेख :-**

शासनाचे निर्णय .......

**मिलन म्हात्रे :-**

शासनाच्या निर्णयाच्या विरोधात नाही. इथे शासनाची चार हेअरिंग झाली. तुमच्या पुढाऱ्याने अधिकाऱ्याचे तसे गैरवापर केले म्हणून तुम्हाला ते भोगायला लागले.

**आसिफ शेख :-**

त्यामध्ये नगरसेवक पद ही रद्द होउ शकते.

**मिलन म्हात्रे :-**

आणि शासनाने जरी चुकीचे निर्णय दिले तरी आमचे हाउसचे पॉवर आहेत. कोणी उद्या पाठवतील तर त्याला आम्ही डोक्यावर बसून घेणार का?

**आसिफ शेख :-**

त्यांचा ठराव केलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ते ठराव रद्द ही करता येतो.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख नगरसेवक पद रद्द करण्याचा अधिकार आहे. तर कोर्टात जा आणि नगरसेवक पद रद्द करा. आपण बोलताना ताळतंत्र सांभाळा. या सभेमध्ये हा ठराव पुन्हा पारित झाला. त्यावेळी तुम्ही का विरोध केला नाही? तेव्हा तुमच्यावर जबरदस्ती होती का? तुम्ही त्यावेळेस विरोध का मांडला नाही. आपण रोष्टर पध्दतीने भरती केलेली नाही. जेव्हा श्री. पानपट्टे यांची भरती झाली त्यावेळेस ते तुम्ही रोष्टर पध्दतीने केलेले आहे का? मग तुम्ही बोलताना ताळतंत्र सांभाळा.

**आसिफ शेख :-**

सन्मा. ज्योत्स्ना हसनाळे मॅडम, आपण याठिकाणी जे बोलत आहात तर आम्ही झोपलेलो नव्हतो. तुम्ही झोपले होता.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

कोण झोपले होते आणि कोण मागे होतात, तर आपण ही जी भाषा वापरत आहात ती व्यवस्थित वापरा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण दोघेही खाली बसा. आपल्याला जी माहिती द्यायची होती ती माहिती आम्ही घेतलेली आहे. कृपया, आपण खाली बसा.

**आसिफ शेख :-**

आपण शासनाच्या विरोधात निर्णय घेउ नका.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. आपण खाली बसावे. सन्मा. नगरसेवक प्रशांत पालांडे साहेब आपण बोला.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, श्री. पानपट्टे साहेबांची जी नियुक्ती झालेली आहे ती नियमाच्या विरुध्द आहे असे मी या प्रश्नामध्ये कुठे ही म्हटलेले नाही. हे आपल्या आस्थापनेवर आहेत ना. त्यांना एखाद्या वेळेला खात्यामध्ये बदली करण्याचा प्रशासनाला, सभागृहाला अधिकार आहे का? असा माझा पुढचा प्रश्न आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

श्री. पालांडे साहेब, आपण जो प्रश्न विचारलेला आहे त्या प्रश्नामध्ये त्यांच्या बदली बद्दलचा उल्लेख नव्हता आणि आता चर्चा बदली बद्दल करत आहात. म्हणजे हे संयुक्तिक होत नाही. आपण काय प्रश्न विचारलेला आहे याची जाण आपल्याला पाहिजे आणि सभागृहाला तुम्हाला जे बोलायचे आहे ते ठासून म्हणा. त्याच्यात चर्चा होउ द्या. सभागृहाला निर्णय घेउ द्या. बदली करणे हा वेगळा विषय आहे आणि इतरत्र पदावर नेमणूक करणे हा वेगळा विषय आहे.

**प्रशांत पालांडे :-**

इतरत्र पदावर बोलायचे नव्हते. माझा हा शब्द चुकला असेल.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्या प्रश्नामध्ये बदलीचा विषय नव्हता.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, तोच प्रश्न आहे ना.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मग तुम्ही स्पष्ट म्हणा ना.

**प्रशांत पालांडे :-**

तसा प्रश्न दिलेला आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपली जी मनातली भावना आहे. पशुशल्य चिकित्सक अधिकारी या पदावर देता येते का? असे आपल्याला म्हणायचे आहे का?

**प्रशांत पालांडे :-**

ते चुकीचे आहे का? असे मला म्हणायचे आहे. सभागृहाला अधिकार आहे की नाही?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याला मी हे आश्वासित करु इच्छितो, त्यांना पशुशल्य चिकित्सक अधिकाऱ्याचे कामकाज दिले तरी त्यांचे उपायुक्त नॉमिनेशन जात नाही.

**प्रशांत पालांडे :-**

आमची ती अपेक्षाच नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याला जे उपायुक्त अनुसूचित जातीसाठी भरायचे आहे, त्याला पद मंजुर होईपर्यंत ती कार्यवाही करता येत नाही.

**प्रशांत पालांडे :-**

सुरुवातीपासून माझा हा प्रश्न आहे की, सभागृह एखादा ठराव पारित करतो. त्याला प्रशासनाच्या दृष्टीने किती किंमत आहे?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्हाला मी तेच सांगतोय.सभागृहाचा दिशाभूल न होता. मी आपल्याला पर्यायपणे सांगितलेले आहे. सभागृहाने तो निर्णय घेतलेला आहे. त्यासाठी त्यामागची जी भावना होती ती अनुसूचित जातीच्या अधिकाऱ्याला उपायुक्त दर्जाचे पद मिळावे. ही सभागृहाची भावना होती आणि त्या अनुषंगाने श्री. पानपट्टे साहेबांना इतरत्र सामावून घेण्याची कार्यवाही करता येत नाही. त्या ठरावामध्ये जी वाढीव दुरुस्ती होती की, जास्तीचे एक उपायुक्त पद मंजुर करण्याची ती कार्यवाही प्रशासनाने केलेली आहे आणि ते निश्चितच शासनाच्या विचाराधीन आहे व ती कार्यवाही अंतिम होईल. ते पद मंजुर झाल्यानंतर या सभागृहाची जी अपेक्षा आहे ती निश्चित पूर्ण होईल. हे काही वेगळे उत्तर नाही. निश्चितच, येणाऱ्या काळामध्ये त्याच्यावर निर्णय होणार आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, आता खतगावकर साहेब बोलले की, ठराव चुकीचा होता व ठरावाची शासनाच्या नियमाप्रमाणे तुम्ही त्या ठरावाला बसवले. तर त्याची माहिती सभागृहाला दिली पाहिजे की नाही? ऐसे ठराव, यहापर सभागृह मे पढे जाते है। सभागृह का ठराव आपके पास आता है। सभागृहामध्ये जे ठराव वाचले जातात, ते ठराव वाचल्यानंतर सचिवांकडे जातो. सचिवाने त्याच ठरावाला कायम केले पाहिजे. ठराव दिल्यानंतर त्याच्यामध्ये काही दुरुस्ती होते आणि दुरुस्ती झाल्यानंतर सभागृहाला ते कळत नाही. असे अनेक ठराव आहेत. आपण सभागृहामध्ये एकतर ही पध्दत घालावी. जो ठराव येथून जाणार आहे त्याची सत्यप्रत आम्हाला मिळाली पाहिजे. हा प्रकार ''ड'' ''ज'' चा झाला. शासनाच्या नियमाप्रमाणे दुरुस्ती केली.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण सभागृहातच दुरुस्ती केली ते सर्व मिनिट्स आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हा ठराव घाईघाईने केलेला आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

घाईघाईने नाही. ज्या सन्मा. सदस्यांनी ठराव मांडलेला आहे. त्या माझ्यासमोर आहे आणि हे घाईघाईने नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

जेव्हा हा ठराव झाला. दुसरा ठराव, ठराव क्र. २७ जेव्हा झाला तेव्हा यावेळेला या सभागृहामध्ये चर्चा झाली. सन्मा. रोहिदास पाटील त्यावेळेला उपस्थित होते. त्यांनी ही या विषयावर चर्चा केली. परंतु, या ठरावाचे इतिवृत्तांत आजपर्यंत या सभागृहाला मान्यतेसाठी आलेले नाही. कृपया, हा ठराव क्र. २७ इतिवृत्तांत जर तयार असेल तर ते तेथे मागवावे आणि तो ठराव वाचून दाखवावा. त्यावर झालेली चर्चा वाचावी.

**मा. महापौर :-**

वेळ संपलेली आहे. आपण इतिवृत्तांत पुढच्या सभेला वाचून दाखवा.

**नगरसचिव :-**

याचे इतिवृत्तांत पुढील मिटींगला येणारच आहे. प्रश्नोत्तराच्या तासाची वेळ संपलेली आहे.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, हा वेळ पेंन्डींग राहिला ना.

**मा. महापौर :-**

होय.

**नगरसचिव :-**

आजच्या सभेसाठी श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांची एक लक्षवेधी आलेली आहे. विषय भाईंदर पूर्व काशिमिरा ते भाईंदर उड्डाण पूल येथे येताना दिपक हॉस्पिटलजवळ सिग्नल बसवणे.

मिरा भाईंदर काशिमिरा रस्त्यावर गोल्डन नेस्टच्या समोर सर्वोदय कॉम्प्लेक्स, हिमालय कॉम्प्लेक्स, गितानगर, पद्मनाथ दर्शन ही रहिवाशी संकुले येतात. सदर कॉम्प्लेक्स मधील रहिवाश्यांना सदोदीत बाजार खरेदीकरिता त्याचप्रमाणे शाळेतील मुलांना रस्ता क्रॉस करतेवेळी (क्वीन मेरी स्कुल) तसेच येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाश्यांना रस्ता पार करतेवेळी जीव मुठीत घेउन रस्ता पार करावा लागतो. कारण तेथे सिग्नल नाही, त्यामुळे येणारी सर्व वाहने सुसाट वेगाने येतात. शिवार गार्डन ते उड्डाण पुलापर्यंत कोणतीही सिग्नल नाही. व याच कारणामुळे या रस्त्यावर दिवसाला दोन ते तीन अपघात होतात. उदा. दि. १४/१२/२००७ रोजी संध्याकाळी ५.४५ वा. सदर रस्त्यावर असाच एक अपघात झाला. त्यात सहा वर्षाचा शाळेतील मुलगा व त्याची आई दुर्दैवाने मुत्युमुखी पडली, असे अनेक अपघात आम्ही आमच्या डोल्यांनी पाहतो. पण याला आळा घालू शकत नाही. हे अपघात टाळण्यासाठी व वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवण्यासाठी दिपक हॉस्पीटल किंवा तिथल्या

आजुबाजुच्या रस्त्यावर सिग्नल बसविणे महत्वाचे आहे. दि. १४/१२/२००७ रोजी झालेल्या अपघाताबाबत प्रशासनाचे लक्ष वेधू इच्छित आहे. प्रशासनाने याबाबत भुमिका स्पष्ट करावी.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी आपको अगर कुछ बोलना है तो बोलिए।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहब, मिरा भाईंदर महानगरपालिका का जो छत्रपती शिवाजी महाराज मार्ग है काशिमिरा से लेकर अपने उड्डाण पूल तक यह भाईंदर की शान है। इसमे कोई दौरा नही है, आदमी जब काशिमिरा से प्रवेश करता है तो उसे लगता है की, मैं एक बडे शहर मे आया हूँ। लेकिन जब यह रस्ते पर आदमी आता है, उसके पहिले भी अनेक अपघात हूए। एकबार महासभा मे कुछ डिवायडर को बंद करनेका, कुछ को खोलनेका प्रस्ताव आया। आज जब यह दो-तीन दुर्घटना हूई तो इस बारे मे वहा के रहिवासी यहापर आए। प्रत्यक्ष रुपसे मिले। आपको भी मिले, उस दिन गटनेता की मिटींग चालू थी तब यह विषय आपके पास मे आया, फोन आया की, ऐसी दुदैवी घटना हूई है। मेरे कहनेका तात्पर्य इसमे कोई राजकीय नही है या कोई किसीका उद्देश नही है की, किसीका का रस्ता बंद करनेका और किसीका रस्ता चालू करनेका, इसमे जो जो अनुभवी है। भले वह किसी पक्ष के हो, जब शिवार गार्डन से गाडी छुटती है वह डायरेक्ट उड्डाण पूल पर होती है उस वक्त उसका इतना वेग होता है की, आदमी को मालूम नही होता है और क्रॉसिंग करते समय उसके चपेट मे आदमी आते है। उड्डाण पूल से काशिमिरा जाते है तो अपना एक सिग्नल उड्डाण पूल से निचे उतरते है। यहा से जाते समय गाडी का उतना स्पीड नही होता है। तो यह दुर्घटना टालनेके लिए वहा के संबंधित लोगोंने जब मुझे बताया तब मैंने बोला की, हम डिवायडर नही डाल सकते है, स्पीड ब्रेकर नही डाल सकते है। शासन के कोर्ट के निर्णय के कारण एक सिग्नल की हम मांग कर सकते है और यह बात मे अपने शहर अभियंता श्री. बारकुंड साहब से फोन करके बात की, इसके लिए क्या उपाययोजना हो सकती है? तो उन्होंने बोला की, सिग्नल हम डालनेके लिए आप सुझाव दे सकते हो और उसपर प्रशासन विचार करेगा। तो मेरी आपसे यह विनंती है की, लक्षवेधी के माध्यम से, नागरिको का यहापर जो नुकसान होता है, यहा जो आदमी अपघात से मरते है। यह रस्ता चार तरफ जाता है। इस रस्ते के उपर अगर एक मिनिट, देड मिनिट का सिग्नल डालेंगे और वह सिग्नल से लोगोंको आने जाने को मिलेगा तो शायद यह दुर्घटना मे कुछ ना कुछ प्रतिबंध आएगा। तो मेरी सभागृह से यह विनंती है की, लक्षवेधी के आधार पर महापौरने इसपर ताबडतोब रुलिंग करके वहापर सिग्नल बिठनेका निवेदन शासन प्रशासन को दे। ऐसी मेरी भावना है और उसमे अगर किसीकी सुचना है। किसीकी उपसुचना है या किसीको बोलना है तो उसमे मेरा कोई ऑब्जेक्शन नही है। लेकीन यह दुर्घटना ऐसी होती है और वहापर आपका ऑफीस है, आप भी प्रत्यक्ष देखते हो की, वहापर कोई भी सिग्नल न होने के कारण यह दुर्घटना होती है। मेरी सभागृहसे विनंती है की, आप इसमे ताबडतोब सिग्नल बैठानेका आदेश इस लक्षवेधी के आधार पर सभागृह को देंगे। ऐसा मेरा आपसे निवेदन है।

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, आपल्या परवानगीने बोलत आहे. आपल्या येथे सिग्नल व्यवस्था आम्ही स्थायी समितीला सदस्य असताना मंजुरी मिळाली. त्यानंतर आर.टी.ओ. चा संपूर्णपणे सर्व्हे झाला. त्या कमिटीमध्ये मी एक मेंबर होतो. शहरातील ज्या ज्या ठिकाणी चौक आहेत त्या ठिकाणचे सर्वप्रथम सर्व्हे झाला. सिग्न्लचे स्पॉट डिक्लरेशन झाले. आपले सिटी इंजिनिअर श्री. वैरागडे साहेब त्यावेळी होते. आमच्या परिने आम्हाला जे काय व्यवस्थित करता आले ते आम्ही लोकप्रतिनिधी या नात्याने केले. परंतु, आजच्या शहरामधील प्रत्येक सिग्नलची सिस्टीम ही पूर्णपणे बेकायदेशीररित्या बसवलेली आहे. त्याचे टाईमिंग आहे. ते टायमिंग बघण्याकरिता आपल्याकडे एकाही अधिकाऱ्याला वेळ नाही. बहुसंख्य वेळेला शाळेतून मुले सुटतात. चार-चार, पाच-पाच मुलांना एक महिला घेउन जाते. पण आपल्याकडे कुठल्याही त्या चौकामध्ये झेब्रा क्रॉसींग पट्टे नाही. त्यानंतर जे सिग्नल लावले आहेत त्याची जी लावण्याची पध्दत आहे ती ही चुकीची आहे. आपल्याला कळतच नाही की, पुढचा सिग्नल कुठून पडला? किती मिनिटात पडला? पटापट पुढून वाहनं येतात, मागून वाहनं येतात. आपला वेळ किती आहे. आझाद नगरचा सर्वात सेनसेटिव्ह सिग्नल आहे. त्या लोढा कॉम्प्लेक्सवरुन गाड्या कधी, कुठून निघतात ते काही कळत नाही. म्हणजे मी जरी माझ्या स्ट्रेट रस्त्याने चाललो आहे. तर समोरची गाडी येउन मला डॅश करते. म्हणजे सिग्नलची टायमिंग सिस्टीम कुठेही बरोबर नाही. लहान मुले, वृध्द महिला, नागरिक या लोकांना क्रॉस करण्याकरिता जसे ग्रीन सिग्नल पडतो. झेब्रा क्रॉसींग पट्ट्यावरुन त्यावेळेला त्या लोकांना अलाउड केले जाते की, हिरवा सिग्नल झाला की, लोकांनी क्रॉस करावे. ही पध्दती आपल्या शहरामध्ये कुठे ही अवलंबविली नाही. त्याकरिता आर.टी.ओ. शी समन्वय साधा. किती वेळ देवू शकतो ते बघा आणि जास्तीत जास्त म्हणजे हायवेला काशिमिरा पोलीस स्टेशनचा सिग्नल आहे तिथे प्रचंड वाहतुक असते. म्हणजे घोडबंदरच्या चढणीपर्यंत ट्राफीक जाम असतो. त्या सिग्नलमध्ये आपल्याला काय करता येईल. त्याच्याकरिता खास करुन आपल्या अधिकाऱ्यांना मा. महापौर साहेब आपण आदेश निर्गमित करावेत.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी व मिलन म्हात्रेजी यांनी जी सुचना मांडली त्याबद्दल रितसर याची तपासणी करुन कुठे कुठे सिग्नलची गरज आहे ते बघीतले जाईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, यह जो स्पॉट बता रहा हू। वह मेरे ख्याल से सभागृह मे किसी भी नगरसेवकने आक्षेप नही किया की, यह गलत है। मुझे यह बोलना है की, आप भाईंदरका पुरा सर्व्हे किजीए। जैसा सन्मा. नगरसेवक मिलन म्हात्रेजीने बोला।

**मा. महापौर :-**

आपने अभी जो पर्टीक्युलर प्वॉईंट नजर मे लाए है। उसके उपर अधिकारी को भेजकर वहॉ पर रितसर कौनसा सिग्नल आया है, स्टॉप का कैसा सिग्नल लगना चाहिए। झेब्रा क्रॉसींग का लगना चाहिए, या डायव्हर्शन का लगना चाहिए। इसबारे मे डिटेल लेकर बादमे बोलता हू।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

यह कार्यवाही विदीन सेवन डेज, या १५ डेज मे होना चाहिए। जल्द से जल्द मे करवाओ क्योंकी कल कभी आता नही है।

**मिलन म्हात्रे :-**

माझी सुचना अशी आहे की, आपण सर्व सिग्नलचा सर्व्हे करा.

**उमा सपार :-**

मा. महापौर साहेब, तिथे सिग्नल बसविणे खूप जरुरीचे आहे. तिथे भरपूर अपघात होतात. माझ्या येथे ही खूप जणांनी कंम्प्लेंट केलेली आहे. तिथे सिग्नल बसवायलाच पाहिजे. शिवार गार्डनच्या येथे ही बघा. तेथून सिग्नल सुटत नाही तर लोक दुसरीकडून लगेच येतात. रिक्षा, गाडींचे नेहमी अपघात होतात. अनेक पत्रव्यवहार झालेले आहे तरीपण तुम्ही लक्ष देत नाही. तिथे सिग्नल बसवणे जरुरी आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, या पर्टीक्यूलर सिग्नलचा आपण ताबडतोब निर्णय घ्या. सर्व्हे करा.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, ठाण्यावरून येताना काशिमिराजवळ जो नाका आहे. तेथून भाईंदरला टर्न मारताना लेफ्टचा जो सिग्नल आहे. हा वारंवार बंद असतो. कितीवेळा तरी मी श्री. जानकरला सांगितले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील साहेब, एक-दोन वेळा तिकडे दुर्घटना झालेली आहे. आपण भाईंदरला अपघात होतात त्याबद्दल घ्या.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

मा. महापौर साहेब, आपण आर.टी.ओ. च्या मुख्य अधिकाऱ्याला बोलावून आपल्याला सिग्नल किती अंतरावर बसवायचे आहे. ते बघा. नियमाबाहेर बसवता येत नाही. ते नियमाला धरुनच बसवावे. नाहीतर, आपले सर्व नगरसेवक उठून बोलतील की, आपण येथे सिग्नल लावा. तिथे सिग्नल लावा. तसे होउ शकत नाही. पब्लिक वाढलेले आहे. ॲक्सीडेंट होणार. ते टाळू शकतात.

**प्रशांत पालांडे :-**

जे स्पीड ब्रेकर आहेत त्याच्याबद्दल काय नियम आहेत ते मला कळू दे.

**बालाजी खतगांवकर (उपायुक्त (मु.) सो.) :-**

लावू शकत नाही. सुप्रीम कोर्टाचे निर्देश आहेत.

**प्रशांत पालांडे :-**

नियम काय आहे ते कळू दे.

**बालाजी खतगांवकर (उपायुक्त (मु.) सो.) :-**

स्पीड ब्रेकरच्या ऐवजी पट्टा मारायला पाहिजे.

**प्रशांत पालांडे :-**

भाईंदर पश्चिमेला जो नविन मॉल झालेला आहे तिथे ऑलरेडी दोन तीन स्पीड ब्रेकर लावलेले आहेत. ते कसे काय लावले आहेत?

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आपल्या येथे स्पीड ब्रेकरला स्थगिती आहे. पण रमलिंग स्ट्रीप ज्या ज्या छोटया छोटया असतात त्या लावायला अलाउड आहे.

**प्रशांत पालांडे :-**

नविन मॉल झालेले आहे तिथे तीन स्पीड ब्रेकर लाईनमध्ये आहे ते तसे काय आले?

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, आपल्या परवानगीने बोलतो की, सन्मा. नगरसेवक ओमप्रकाश अग्रवालजी यांनी जो प्रश्न मांडला तर त्यादिवशी जे ॲक्सीडेंट झाले. ते फार भयानक होते. होन्डा सिटी कारने एका बाईला

उडवले. तिच्या हातामध्ये सहा वर्षाचे मूल होते ते बसच्या मागच्या चाकामध्ये आले आणि त्या मुलाचा पूर्ण चेंदा झाला. तो जो सिग्नल आहे. त्या सिग्नलच्या येथे वारंवार ॲक्सीडेंट होतात. सिग्नल यंत्रणेसाठी महानगरपालिका खर्च करते. खर्च केल्यानंतर त्याची अंमलबजावणी होते की, नाही? कारण काशिमिरा येथील एक सिग्नल सोडला तर पुढचे जे सिग्नल आहेत, तिथे तुम्ही यंत्रणा बसवा. तिथे कोण सिग्नल पाळत नाही. महानगरपालिकेतर्फे जे दोन तीन स्पॉट आहेत तिथे शाळा सुटण्याच्या वेळेला आर.टी.ओ. चे पोलिस अधिकारी असणे फार गरजेचे आहे. सिग्नल यंत्रणेला कोण मानत नाही. कारण रोड एवढा वाईट झालेला आहे. डायरेक्ट ब्रीजवर जाण्यासाठी, एस्सल वर्ल्डला जाण्यासाठी काशिमिरा नाक्यापासून स्पीडला गाडया येतात आणि तिथे कोणी सिग्नल यंत्रणा पाळत नाही. नुसती सिग्नल यंत्रणा बसवून तिथे फायदा होणार नाही. तिथे पोलिस अधिकारी हवे.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर महोदय, उत्तन विभागामध्ये मंत्री महोदय जातात. म्हणून टाकलेले स्पीड ब्रेकर काढले जातात. सुप्रीम कोर्टाचा आदेश आहे म्हणून आपण त्यांना सपोर्ट करतो. पण तिथे ॲक्सीडेंट झाले तर तिथे ताबडतोब स्पीड ब्रेकर केला जातो. म्हणजे ॲक्सीडेंट होण्याची वाट बघण्याचा आपला हेतू आहे का? राई, मोर्वा, मुर्धा ह्या शाळा जवळपास आहेत. तिथे अनेक ॲक्सीडेंट झालेले आहेत. स्पीड ब्रेकर लावलेले आहेत. तुम्ही जर या मंत्री महोदयांचा कार्यक्रम संपला तर स्पीड ब्रेकर लावा.नाहीतर, आम्हांला तिथे रस्त्यावर यावे लागेल हे फक्त लक्षात ठेवा.

**मर्लिन डिसोझा :-**

मा. महापौर साहब, आपकी परवानगी से बोल रही हूँ, मेरा यह सजेशन है की, जो काशिमिरा का रोड है वहाँपर सिल्व्हर पार्क और यह जो फ्लाय ओव्हर है वहाँपर ॲट लिस्ट तीन फूटवेअर ब्रीज होंगे तो स्कूल के विद्यार्थीओंके लिए और बाकी जो प्रेडीशन लोग सबमिट करते है उनके लिए बहूत सुविधा हो जाएगी। तो फुटवेअर ब्रीज इज अ बेस्ट सोल्युशन.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहब, अभी हमारे स्थायी समितीके सभापतीजींने बोला की, हर एक नगरसेवक मांग करेगा की, इधर यह होना चाहिए। हो सकता है की, मांग करेंगे। लेकिन अभी जो सिग्नल की बात चल रही है उस सिग्नल के बारे मे आप देख रहे हो, आप सभागृह की सहानुभूती देख रहे हो। हर सभागृह का नगरसेवक चाहता है की, वहाँपर व्यवस्था होनी चाहिए। वहा की नगरसेविका श्रीम. उमा सपार मॅडम, उनकी मांग है। तो आप इसको कोई राजकीय मुद्दा मत बनाईए। आप अभी आदेश दिजीए अगली मा. महासभा के पहले उसपर कार्यवाही हो। उसके लिए आपको कोई बडा फंड भी नही लगेगा।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी, आपने जो बताया है और बाकी सदस्योंने बताया है की, गोल्डन नेस्ट के इधर जिस सिग्नल के उपर एक विशेष आर.टी.ओ. से परमिशन लेकर चर्चा करके वहापर सिग्नल के लिए, विश्वास मे लेकर करेंगे। आपने पहिले कमिटी बनाई थी। तो उनके साथ मिलकर सिग्नल के स्टॉप नक्की किए गए थे। उनकी क्या अडचण है। वह समझकर लोगोंकी सुविधा की जाए। उसके उपर आपने जो एक सिग्नल बोला है के जल्दसे जल्द करेंगे और बाकी सदस्योंने जो सिग्नल के बारे मे बताया है। उसके लिए रितसर आर.टी.ओ. के साथ मिटींग करके किधर किधर सिग्नल लगना चाहिए।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहब, आपने अगर विलंब किया तो वहाँके स्थानिक लोगोंके पत्र आपके पास भी है। वहाँपर रास्ता रोको आंदोलन होगा। अगर आपको उसकी तरह राह देखनी है तो फिर आप देखिए।

**मा. महापौर :-**

हम वहाँपर जल्द से जल्द कर रहे है। धन्यवाद.

**प्रशांत पालांडे :-**

स्पीड ब्रेकरचे उत्तर दिलेलं नाही.

**मा. महापौर :-**

हायकोर्टाचे जे आदेश आहेत त्या आदेशाप्रमाणे स्पीड ब्रेकर लावता येत नाही.

**प्रशांत पालांडे :-**

मॉल समोर कसे काय?

**मा. महापौर :-**

जर कोणी एखादया खाजगी, बिल्डरने लावले असेल तर त्याबद्दल माहित नाही. तसे काय असतील तर आपल्याकडून काढण्यात येईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब, चर्चेमध्ये आपण काशिमिरापर्यंत गेले तर सिग्नलच्या साईबाबा मंदिरापर्यंत या.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. तेही समाविष्ट करुन घेतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आपण टेम्पो स्टॅण्ड चे काय करणार आहात? आपण रस्ता बनवला. एका बाजूला टेम्पो स्टॅण्ड आहे व दुसऱ्या बाजूला गॅरेज आहे. भंगारवाले, फर्निचरवाले असतात आपण त्याचे काय करणार आहात? टेम्पो स्टॅण्ड हटवणार का नाही ते आपण अतिक्रमण विभागाला विचारा ना. त्यांनी पूर्ण रस्ता चॉकअप केलेला आहे.

**मा. महापौर :-**

कोणत्या अधिकाऱ्याला चार्ज आहे त्यांनी उत्तर द्यावे.

**प्रेमनाथ पाटील :-**

अतिक्रमणचे श्री. दिवटे, उपायुक्त साहेब आहेत ना.

**मा. महापौर :-**

साहेब आपण तो रस्ता एक मोठी रक्कम खर्च करुन बनवलेला आहे. ज्याठिकाणी ५०टक्के टेम्पो पार्किंग होतात. सकाळच्या वेळी एका गाडीला जर प्रॉब्लेम झाला तर ट्रॅफिक जाम होतो. तर त्यांना आपण ब्रीजखाली किंवा ओम साई इंडस्ट्री आहे. तिथे कुठेतरी पार्टली जागा अॅडजेस्ट करुन द्यायचे आहे व तातडीने तेथून ते काढण्यांत यावे.

**शरद पाटील :-**

ब्रीजखाली नको तिथे कशाला पाहिजे?

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण कुठेतरी अरेंजमेंट करा.

**मा. महापौर :-**

त्या टेम्पोवाल्यांना कुठेतरी जागा द्यायला पाहिजे ना.

**शरद पाटील :-**

पर्यायी जागा द्या. पण ब्रीजखाली देवू नका. त्यांना पर्यायी जागा दिली होती. तेथून ही ते परत आले होते. आपली कार्यवाही होते पण त्या कार्यवाहीला अर्थ नसतो. परत येउन ते तिथे्च उभे राहतात. पर्यायी जागा दिली होती. त्यांचे मोर्चे आले. त्यांची युनियन आली की, आपण त्यांना परत तिथेच उभे करतो. आज एवढा मोठा रस्ता असताना सुद्धा शहराच्या टोकावर होताना ट्रॅफिक जाम होते. हा विषय कितीवेळा निघालेला आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण तेथून टेम्पो हटविणार का नाही? त्याचे मला नक्की उत्तर द्या.

**मा. महापौर :-**

नक्की हटविणार.

**प्रेमनाथ पाटील :-**

पण कधी? आता अतिक्रमणचे अधिकारी श्री. दिवटे साहेब आहेत त्यांना विचारा ना.

**मा. महापौर :-**

आता चार दिवस सुट्टी आहे. त्यानंतर टेम्पो स्टॅण्डवाल्यांना बोलावून त्यांचे आम्ही ऐकून घेउ व नियमाप्रमाणे लवकरात लवकर ते काढण्यांत येईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

आणि गॅरेजवाल्यांचे काय करणार?

**मा. महापौर :-**

रस्त्यावर जे काय आहे ते काढण्यांत येईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

नक्की का?

**मा. महापौर :-**

होय.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, आपल्या परवानगीने बोलत आहे की, आपण सांगितले की, रस्त्यावर गाडी असेल तर आपले अधिकारी गाडी उचलतात. पण सुभाषचंद्र बोस मैदानाच्या समोर जे डंम्पर लागतात. मी त्यांना तोंडी सांगितले तर त्यांनी ते उचलले का ते सांगा? मला त्याचे उत्तर पाहिजे आणि जर त्यांना लेखी पाहिजे असेल तर मी त्यांना लेखी देते.

**मा. महापौर :-**

त्यासाठी आपण गटनेत्यांची बैठक लावली होती. नॉन हॉकर्स, हॉकर्स झोन तर त्याच्यावर नक्कीच शंभर टक्के कार्यवाही केली जाईल.

**नयना म्हात्रे :-**

ते ठरवायच्या अगोदर ही गाडया उचलल्या आहेत. कमिटी बनवायच्या अगोदर गाडया उचलल्या ना. मग मी डंम्पर उचलायला सांगितले तर ते का उचलले नाही?

**मा. महापौर :-**

बऱ्याच ठिकाणी अजूनपर्यंत बोर्ड लागलेले नाही. स्थानिक नागरिकांची ही मागणी आहे की, आम्ही गाडया कुठे पार्क करावे व त्यासाठी कुठे पार्किंग द्यावे. नो पार्किंग कुठे द्यावे. त्याच्यावर प्रत्येक गटनेत्यांची एक बैठक घेउन रितसर सभागृहापुढे विषय आणून त्यानंतर त्याच्यावर नक्कीच कार्यवाही करु.

**नयना म्हात्रे :-**

ते लाखो रुपयाचे डंम्पर घेतात तर ते ठेवायला त्यांच्याजवळ जागा नाही का? ते रस्त्यावर लाईनमध्ये एवढे डंम्पर का उभे करता?

**मा. महापौर :-**

तुम्ही जे आत्ता असे बोलता तर असे काय असेल तर रस्त्यावर जे डंम्पर आहेत ते तातडीने काढण्यांत यावे असा मी आदेश देतो.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, आपल्या शहरामध्ये गल्लोगल्ली युझ कार्ड सेल्स ॲन्ड परचेसचे दुकान आहे. त्यांच्याही गाडया तीन तीन लाईनमध्ये पास झालेल्या आहेत.

**मा. महापौर :-**

रस्त्यावरचे जेवढे आहेत ते सर्व काढण्यांत येईल.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, आपण ह्या गाड्या उचलू शकत नाही. प्रॉब्लेम असा आहे की, तुमच्या अधिकाऱ्यांना सांगितले तर सांगतात की, महापालिकेकडे व्यवस्था नाही. टोनिंग मशीन नाही. त्यामुळे आम्ही गाडया उचलू शकत नाही. अशी उत्तरे देतात.

**मा. महापौर :-**

जर टोनिंग मशीन नसेल तर आपण ती हायर करु.

**अनिल सावंत :-**

लवकरात लवकर करा.

**मधुसूदन पुरोहित :-**

मा. महापौर साहेब, आपकी संमती से मैं और एक प्रश्न पुछना चाहता हूॅ, तीन दिन पहिले भाईंदर वेस्ट मे कुछ पंधरा से वीस झोपडे जल गए है। तो मुझे यह पुछना है की, अगर हमारा अतिक्रमण विभाग है तो इस तरह के झोपडे बनते कैसे है? दुसरी बात, जब यह बन जाते है...

**मा. महापौर :-**

आप जो विषय पर चर्चा कर रहे है, उसपर बहूत लम्बी चर्चा होगी।

**मधुसुदन पुरोहित :-**

महासभा चर्चा के लिए होती है ना।

**मा. महापौर :-**

जो विषय है, उस विषय पर बोलिए।

**मधूसुदन पुरोहित :-**

यह बहूत बडी समस्या है। कल यहापर बहूत से लोग हताहत होने के चान्सेस थे, लोग बच गए है। यह हमारा सबसे पहिला कर्तव्य है जी सबसे जरुरी चीज है उसके बारे मे हमने सविस्तर बात करनी जरुरी है।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य जी आप बात १००टक्के खरी है। मैं उसकी भावना से भी सहमत हूॅ।

**मधुसूदन पुरोहित :-**

यह भावना की बात नही है। यह सविस्तर चर्चा का विषय है। अगर कल वहापर ५० जन जलकर मर जाते तो हमलोग लोंगो को क्या उत्तर देते? यह इस तरह की झोपडपट्टीला बनती कैसी है और उपरसे वायर दिए गए है। शॉर्ट सर्कीट के कारण वहाँपर आग लगी है। तिसरी बात वहाँपर लोगोंकी पानी के कनेक्शन दिए गए है। चौथी बात, नवघर रोड गाव में नवघर गाव के लोगोंने कुछ झोपडपट्टीयाँ वहापर तोडी है। कल रात मैंने खुदने जाकर देखा। कम से कम देड सो दो सो झोपडे है। वहाँपर लोग जाते है और खम्बे लगाकर आ जाते है। वह जो यह वह महानगरपालिका की जगह है। वहाँपर लोग जाते है। पहिले जाकर चार दिन अपने खम्बे गाडते है। उसके बाद प्लॉस्टिक लगाते है। उसके बाद और कुछ काम करते है फिर अपने यहा के अधिकारीयो को पटाते है। उनसे जो जो काम करवाने है वह काम करवाके लेते है। आप इंदिरा नगरमे जाईए। आपको एक झोपडा तीन लाख रुपए में मिलेगा। उनके पास सारे कागजाद है लेकिन

जो जमिन है वह महानगरपालिका की है। यह क्या कारण है की, इस तरह लोग झोपडे बनाते जा रहे है। दोन तीन लाख रुपए मे झोपडे बेच रहे है। तो हमारी महानगरपालिका का उस विषय पर क्या कहना है?

**भगवती शर्मा :-**

सन्मा. सदस्य मधुसूदन पुरोहितजीने जो कहा उससे मैं सहमत हूँ। यह झोपडे बन रहे है और उसमें आग लग रही है। उसको जवाबदार कोण है? दि. २९/११/०७ को एक पत्र है, श्रीम. दिव्या अशोक तिवारीने दिया था। इसके अंदर उन्होंने उल्लेख किया था, गणेश आनंद नगर मे ३०० झोपडे नंवम्बर महिने के अंदर बने है। क्रांती नगर मे ५० झोपडे बने है। नितीन चाल मे दस झोपडे है। ऐसे वहापर जो झोपडे बने है उसकी लिखित शिकायत अतिक्रमण विभाग को की गई थी और श्री. दिवटे साहबने यह कहकर अपनी असमर्थता जताई थी की, शासन को हमको आदेश है, हम इन झोपडी को नही निकाल सकते। मा. खतगांवकर साहब से भी मिला, तो इन्होंने बोला की, हम इनको निकालेंगे। लेकिन उसपर आजतक कार्यवाही नही की गई है। उन्होंने सिर्फ एक महेज कारण बताया है की, हमको शासन का निर्देश है की, हम इन अतिक्रमणोंको हटा नही सकते। इसके पहिले क्या हटाया नही गया? आज वह झोपडे बस रहे है। उनको मूलभूत सुविधा कौन देगा। मुलभूत सुविधा तो महानगरपालिका को देनी पडेगी और जब ऐसी दुर्घटना घटती है तो उसको जवाबदार कोण?

**मधुसूदन पुरोहित :-**

उसका कारण यह पता चला है की, शॉर्ट सर्कीट के कारण यह हुआ है।

**प्रविण पाटील :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. सदस्य मधुसुदन पुरोहित यांनी जो विषय काढला की, सर्व्हे नं. २०९ मध्ये झोपडया झालेल्या आहेत. ज्या झोपडया झाल्या तर त्याबाबत माझे पत्र दि. १५/११/०७ ला होते या विभागात कमीत कमी १० ते १५ झोपडया होत्या. त्यांना फोटोपास होते. आता तिथे जवळ जवळ दोनशे ते तीनशे झोपडया झाल्या आहेत. अतिक्रमण विभागाला मी याबाबत दि. १५/११/०७ रोजी तक्रार केली त्याच्यानंतर अजून दोन ते तीन वेळा तक्रार केली की, आपण तिथे जावून परिस्थिती बघा. काहीही कार्यवाही झालेली नाही. आज तिथे जाउन परिस्थिती बघा. काहीही कार्यवाही झालेली नाही. आज तिथे जवळ जवळ तीनशे ते चारशे झोपडया झालेल्या आहेत. तिथे काही गुंड पाच हजार ते दहा हजार रुपयामध्ये ठाण मारुन बसलेले आहेत व ते झोपडया विकतात. आपण आत्ताच्या आत्ता जावून बघा तिथे अजूनपर्यंत काम चालू आहे. तिथे जत्रा भरली आहे. पण तिथे काहीच कार्यवाही होत नाही. आपण त्याच्यावर स्पष्ट कार्यवाही करा.

**जयंत पाटील :-**

सन्मा. नगरसेवक मधुसूदन पुरोहित यांनी झोपडपट्टीच्या विषयावर बोलताना नवघर गावातील लोक झोपडपट्टया बनवतात असा उल्लेख केलेला आहे. तो संपूर्णतः चुकीचा आहे. नवघर गावातील एक ही माणूस तिथे झोपडी बनवत नाही.

**मधुसुदन पुरोहित :-**

नवघर गावाच्या मागे झोपडपट्टी आहे. त्याच्यात काय चुकीचा प्रकार आहे?

**जयंत पाटील :-**

त्या झोपडपट्टया प्रचंड प्रमाणात बनत चालले आहे. या मताशी मी सहमत आहे आणि त्या संबंधातील तीन दिवसापूर्वी उपायुक्त श्री. दिवटे साहेब, अतिक्रमण विभाग यांच्याशी मी संपर्क साधलेला आहे आणि त्यांनी संपूर्ण झोपडपट्टी उचलायला सांगितलेली आहे. झोपडपट्टी ही शासकीय जागेवर आहे. त्याच्यावर आपण डंम्पींग केलेले आहे आणि विशेष बाब म्हणजे तिथे मॅन ग्रो ची कापाकापी चालू आहे.

**मधुसूदन पुरोहित :-**

साहेब, आपली नाराजची काय आहे ते आम्हांला कळले नाही.

**जयंत पाटील :-**

त्या जागेवर तिथे झोपडपट्टी बनते. तिथली संपूर्ण झोपडपट्टी उचलावी तिथे संपूर्ण नविन झोपडया बनत आहेत.

**जुबैर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, आपला विषय सिग्नलपासून सुरु झाला होता आणि अजून बरेचसे सदस्य...

**प्रविण पाटील :-**

अतिक्रमणचा विषय महत्त्वाचा आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब, ज्या झोपडपट्टया बनत आहे त्या आपण तोडणार नाही का?

**मधुसूदन पुरोहित :-**

आम्हांला यांच्याकडून उत्तर येउ द्या. नंतर तुम्ही तुमचा विषय मांडा. कल उधर सौ जण मर जाते तो वहापर जिम्मेदार कौन रहता था। आपके पास से हमे उत्तर आता ही नही है। आपले अतिक्रमण विभागाचे अधिकारी कुठलेही काम करत नाही. श्री. पानपट्टे साहेबांना मी वरबली कम्प्लेंट केली होती. इथे भाईंदर वेस्टला डॉन बॉस्को शाळा आहे त्या शाळेचा मालक पाच हजार स्क्वेअर फिट जागा मोफत वापरत आहे आणि

त्या सोसायटीच्या लोकांना दम देतोय. मी बघून घेईन, मी नेत्यांना सांगेल मी असे करेन, मी तसे करेन. साहेब, इथे बसले आहेत आपण त्यांना विचारु या. मला बोलतात हे जूने बांधकाम आहे. ठिक आहे. मग पाच वर्षे पंधरा वर्षे अगोदर लोकांनी अनधिकृत बांधकाम केले आणि आम्ही जर तिथे नविन नगरसेवक म्हणून गेलो किंवा त्या परिसरात मी रहात असेल व मी सांगितले की हे अनधिकृत बांधकाम आहे तर या अधिकाऱ्यांनी असे उत्तर द्यायचे का आणि तो दादागिरी करतो, दम देतो. मी भाई आहे. मी शहाणा आहे. त्याला हे अधिकारी घाबरतात का?

**अनिल सावंत :-**

साहेब आपण जबाबदार अधिकाऱ्याला उत्तर द्यायला सांगा.

**मधुसूदन पुरोहित :-**

आम्ही फक्त येथे प्रश्न मांडायला येतो का? उत्तर कोण देणार? मतलब इधर ''आया-गया जयरामजी की'' ऐसा हिसाब है क्या? बोलनेका आनेका और ऐसा ही चले जाने का क्या?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य इनामदारजी आप बोलो।

**जुबैर इनामदार :-**

मा. महापौर साहब, मेरा प्रश्न सिग्नल से ही है जो प्रश्न सन्मा. नगरसेवक ओमप्रकाश अग्रवालजीने उपस्थित किया है।

**प्रविण पाटील :-**

हा विषय पूर्ण होउ दे नंतर बोला.

**मधुसूदन पुरोहित :-**

अधिकारी को इसपर बोलने दिजीए ना. श्री. पानपट्टे साहेब आपण उत्तर द्या. मी आपणाला प्रश्न विचारलेला आहे. त्याचे उत्तर काय?

**चंद्रकांत म्हात्रे :-**

अध्यक्ष महोदय, सन्मा. सदस्य मधुसूदन पुरोहितजींनी आता बोलले होते, त्याला जोडून बोलत आहोत. सोसायटीमध्ये कुठेही अतिक्रमणचे काम झाले तर तिथे अतिक्रमण विभागाचे लोक ताबडतोब जातात आणि तिथे तोडफोड करतात आणि एवढया मोठया झोपडपट्टया वसत आहेत तिथे कानाडोळा करण्याचे कारण काय? त्याचे आपण पहिल्यांदा उत्तर द्यावे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्यांना याबाबत उत्तर देतो, मी अतिक्रमणचा कारभार चार-पाच महिने पाहिले होते. त्याच्यामध्ये दिडशे बांधकाम तोडले. साडे तीन हजार झोपडपट्टया...

**मधुसूदन पुरोहित :-**

साहेब तुम्ही काय केले तो माझा विषय नाही. तुम्ही माझ्या प्रश्नाचे उत्तर द्या. तुम्ही काय केले ते सांगा. मी इतिहास विचारत नाही. मी आता विचारलेल्या प्रश्नाचे तुम्ही उत्तर द्या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण म्हणता ना, की झोपडपट्टीवर कार्यवाही का होत नाही त्याच्याबद्दल मी बोलत आहे.

**मधुसूदन पुरोहित :-**

तुमची ॲबिलिटी किंवा डिसॲबिलिटीबाबत मी प्रश्न विचारलेला नाही. तुम्ही फक्त मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर द्या. त्या शाळेचा तो मालक तिथल्या रहिवाश्यांना दम देतो.

**मा. महापौर :-**

सर्वांचे बोलून झाले का? तर आता बसून घ्या. मी अधिकाऱ्याला उत्तर द्यायला सांगतो, आपण बसून घ्या.

**मधुसूदन पुरोहित :-**

माझा विषय श्री. पानपट्टे साहेबांबरोबर झाला होता तर उत्तर ही तेच देतील.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. आपण आता बसून घ्या. मी उत्तर द्यायला सांगतोय.

**मधुसूदन पुरोहित :-**

कशाला बसून घ्या? उत्तर मिळत नाही तरी बसून घ्या. अधिकारी उत्तर द्यायला उभे आहे तर त्यांना उत्तर देवू द्या.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. महापौर साहेब, नगरसेवक येथे येवून बोललात तर अधिकारी काम करतात का, ते पहिल्यांदा बघा ना.

**मधुसूदन पुरोहित :-**

उत्तर देने के लिए ऑफीसर खडा है तो उसे उत्तर देने दिजीए।

**मा. महापौर :-**

आप बैठिए, आपको उत्तर मिलेगा।

**मधूसूदन पुरोहित :-**

आप उसको बचा रहे है क्या?

**चंद्रकांत म्हात्रे :-**

एखाद्या गॅलरीचे बांधकाम होत असेल तर तिथे आपले अतिक्रमण विभागाचे अधिकारी येउन ते बांधकाम तोडतात मग हे का तोडत नाही?

**मा. महापौर :-**

मी आपल्या भावनाशी सहमत आहे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

प्रश्न विचारलेला आहे त्याचे आपण अधिकाऱ्याला उत्तर द्यायला सांगा.

**मा. महापौर :-**

मी कुठे नाही म्हणून बोलतो. आपण सर्वच जण उभे आहात तर उत्तर कसे काय देणार?

**मधुसूदन पुरोहित :-**

मा. महापौर साहेब, त्या सोसायटीने आपल्या महानगरपालिकेला लिगल ॲडव्होकेटने दिलेले पत्र दिलेले आहे. सोसायटीचे पत्र दिलेले आहे. मागच्या तीन वर्षापासून ते लोक फॉलोअप करत आहेत. सामान्य नागरिक असल्यामुळे लोक आपले अधिकारी त्यांचे ऐकत नाही. असा काय भाग आहे का? त्या अधिकाऱ्याला उत्तर देता येत नाही? जूने बांधकाम आहे म्हणून आम्ही काय करु शकत नाही. तो मोठया भाई लोकांचे नाव घेतो म्हणून आम्ही काय करु शकत नाही अशी आम्ही किती लोकांशी दुश्मनी घ्यायची तर आपण आपली नोकरी सोडा. जर तुम्ही आम्हांला कारण देण्यासाठी बसले आहेत तर वि आर हिअर फॉर सोल्यूशन नॉट फॉर क्रिएट द प्रॉब्लेम. दे ऑल आर हिअर फॉर ओनली क्रिएट द प्रॉब्लेम्स. मग ते का प्रश्नाचे उत्तर देत नाही ते विचारण्यासाठी आम्ही प्रश्न विचारतो. मा. महासभेचा उद्देश काय तर तुम्ही त्यांना बोलायला तर द्या.

**मा. महापौर :-**

ठिक आहे आपण मा. महासभा आहे म्हणून बोलता. आय ॲग्री विथ ऑल.

**मधूसूदन पुरोहित :-**

उत्तर द्यायला माणूस उभा आहे तर त्याला उत्तर देवू द्या.

**मा. महापौर :-**

आपण बसा. तीन तीन जण उभे आहेत.

**मधूसुदन पुरोहित :-**

मी प्रश्न विचारल्यावर मला ते केबिनमध्ये उत्तर देतात. तर आता इथे त्यांना काय उत्तर द्यायचे आहे ते देवू द्या.

**एस. ए. खान :-**

मा. महापौर साहेब कोणी बोलायला उठले तर आपण सांगता की बसा. बसा तर आम्ही येथे बसण्यासाठी आलेलो नाही. तुम्ही शिस्त पाळायला सांगा ना. जर कोण एकजण बोलत असेल तर दुसऱ्याने गप्प राहावे. तुम्ही नेहमी सांगता की, बसा. बसा तर आम्ही येथे बसायला आलो आहोत का? उभे राहू द्या.

**मधूसूदन पुरोहित :-**

एकाने प्रश्न विचारल्यावर दुसरा उभा राहिला तर पहिल्याने बसायचे असे काय आहे का?

**तूळशीदास म्हात्रे :-**

आपण महापौर म्हणून त्यांना रुलिंग द्या.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य या विषयाशी मी नक्कीच सभागृहाचा बाजूने आहे. आपल्या बाजूने आहे.

**मधुसूदन पुरोहित :-**

मा. महापौर साहब, उनको देने दिजीए। मेरे प्रश्न का जवाब देने बिना मैं बैठनेवाला नही हूँ। उनको उत्तर देने के लिए आप समय दिजीए।

**मा. महापौर :-**

श्री. पानपट्टे साहेब, आपण पाच महिन्यात किती बांधकाम तोडले?

**मधुसूदन पुरोहित :-**

साहेब मी त्यांचा इतिहास विचारत नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

१३० बांधकाम आणि तीन हजार झोपडे तोडले.

**मा. महापौर :-**

साहेब, पाच महिन्यात १५० दिवस त्यात ४० सुट्टया व ११० दिवसात तुम्ही एवढे बांधकाम तोडले. आपण सभागृहाला चुकीची माहिती देवू नका. मी माझे मत मांडतोय हे चुकीचे आहे. आपण एक वीट तोडली

असेल व इथे येउन सांगणार की दिडशे बांधकाम तोडले. तर नविन झोपडपट्टी ही जोरात वाढत चालली आहे आणि भविष्यात याच सभागृहाला त्यांना कुठेतरी ॲडजेस्ट करायला लागेल. मग एखाद्या सदस्याची भावना दुखते की, माझा हा मतदार संघ आहे तेथून झोपडपट्टी गेली. आपले जेवढे आरक्षण आहे त्याच्यात प्रत्येकामध्ये झोपडपट्टी वाढत चालली आहे.

**मधुसूदन पुरोहित :-**

माझ्या प्रश्नाचे अजून उत्तर दिलेले नाही.

**प्रभात पाटील :-**

आता तुमच्या विभागाला बगल झाली हे बघा. त्यांनी श्री. दिवटे यांना पुढे घेतले. आपण श्री. पानपट्टे साहेबांकडून उत्तर मागा.

**बालाजी खतगांवकर (उपायुक्त (मु.) सो.) :-**

अतिक्रमणचा पदभार आता श्री. दिवटे साहेबांकडे आहे.

**मधुसूदन पुरोहित :-**

पण मी याबाबत श्री. पानपट्टे साहेबांशी बोललो होतो. त्याकरिता माझ्या प्रश्नाचे उत्तर श्री. पानपट्टे साहेब देतील.

**बालाजी खतगांवकर (उपायुक्त (मु.) सो.) :-**

ते खुलासा करतील.

**शानू गोहिल :-**

आपण संबंधित अधिकाऱ्यांना खुलासा करायला सांगा.

**बालाजी खतगांवकर (उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्या विषयाचे कामकाज १ तारखेपासून श्री. दिवटे साहेबांकडे आहे.

**मधुसूदन पुरोहित :-**

साहेब आम्हांला ते माहित आहे. मी मागची गोष्ट विचारत आहे. मी श्री. पानपट्टे साहेबांना विचारले होते.

**प्रभात पाटील :-**

वीस दिवसामध्ये काय कार्यवाही झाली. आम्हांला त्याचे उत्तर पाहिजे.

**मधुसूदन पुरोहित :-**

ती शाळा बांधली आहे आणि तिथे ५००० स्क्वेअर फिट चे अनधिकृत बांधकाम केलेले आहे. याबाबत तुमच्याकडे मी तीन वेळा तक्रार केली. तुम्ही त्याचे काय केले?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

सदरचे बांधकाम हे जूने असल्यामुळे त्याची हेअरिंग घेवून...

(सभागृहात गोंधळ)

**शानू गोहिल :-**

हमे यह बडे दुःख के साथ बोलना पड रहा है की, मा. पालकमंत्री गणेशजी नाईक के आदेश का अभी तक पालन नही हूआ है। तो एक नगरसेवक के बोलनेका क्या पालन होगा यह हमको मालूम नही। आप इसका खुलासा करिए।

**मधुसूदन पुरोहित :-**

काय झाले ते बोला?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

त्याची हेअरिंग घेवून पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

**मधुसूदन पुरोहित :-**

मी आपल्याला बोललो होतो की, आपण आपला कुठला तरी व्यक्ती पाठवा. त्या शाळेचा जो कोण प्रिन्सीपल, मॅनेजर असेल त्याच्याकडे संबंधित माणूस पाठवला का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

पाठवला आहे.

**मधुसूदन पुरोहित :-**

मग त्याच्यावर काय झाले?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

नंतर माझी एक महिन्यापूर्वी बदली झाली.

**मधुसूदन पुरोहित :-**

त्याने तुम्हांला दम दिला का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आताची परिस्थिती मला माहित नाही.

**मधुसूदन पुरोहित :-**

त्याने दम दिला का? तुम्ही मला सांगितले होते की, आम्ही किती लोकांशी दुश्मनी घ्यायची?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

असे काहीच नाही.

**मधुसूदन पुरोहित :-**

तुम्ही मला असे बोलला होता की नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

असा प्रश्नच नाही.

**मधुसूदन पुरोहित :-**

माझा विषय तो नाही. जूनं बांधकाम हा विषय माझा नाही आणि तो भाई असेल तर त्याच्या घरी.

**जुबैर इनामदार :-**

श्री. पानपट्टे साहेब तुम्ही मला ही बोललात की मी कोणा कोणाबरोबर या शहरात दुश्मनी घ्यायची. माझी या सभेला विनंती आहे. येणारा अतिक्रमणचा जो कोणी अधिकारी असेल त्याला आपण अगोदर विचारा, दुश्मनी घ्यायची तुझी तयारी आहे का? नसेल तर तशा व्यक्तीला तशा उपायुक्ताला अतिक्रमण विभाग देवू नये.

**मधुसूदन पुरोहित :-**

असे जर भाई लोकांना घाबरायला लागले तर झालं, आपली वाट लागेल. मिरा भाईंदर शहराचे मिरा भाईदर गाव होईल. तुम्ही त्याचे उत्तर काय ते सांगा ना. कार्यवाही काय केली आणि काय करणार ते तुम्ही सांगा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

एक महिन्यापूर्वी माझी बदली झाल्यामुळे आजच्या घडीला काय परिस्थिती आहे ते कसे सांगणार.

**मधुसूदन पुरोहित :-**

बदली झाली नव्हती. मी विचारलेला प्रश्न हा एक महिन्यापूर्वीचा आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

होय.

**मधुसूदन पुरोहित :-**

आता तुम्ही येथे आहात ना. तो विषय तुम्हांला माहित आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

माझ्याकडे आता तो विभाग नाही.

**मधुसूदन पुरोहित :-**

तुमचा विभाग बदलला तर काय झाले?

**प्रेमनाथ पाटील :-**

तुमच्या कारकिर्दीमध्ये बांधकाम झालेले आहे.

**उमा सपार :-**

पानपट्टे साहेब, पंधरा दिवसच झाला तुमच्या चार्ज संपलेला आहे आणि आता आरोग्य विभागामध्ये आलेला आहात. महिना झाला म्हणून सांगून कोणतेही काम अंगावर घेत नाही. मला ही असेच बोलले होते.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

चायनिजची गाडीसुद्धा, त्याने दम दिल्याबरोबर ताबडतोब सोडून देतात.

**शरद पाटील :-**

पहिल्यांदा उत्तर देवू दे.

**उमा सपार :-**

पानपट्टे साहेब, आपण उत्तर द्या. सगळेजण उत्तर मागत आहेत.

**मधुसूदन पुरोहित :-**

आपण बोललात ना, विषय परिवर्तन होईल. त्यांना दोन मिनिट तरी बोलू द्या. त्या अधिकाऱ्यांची भावना तर कळू द्या. तो काय करतोय.

**आसिफ शेख :-**

विषय परिवर्तन करत नाही. हा तुमचाच विषय आहे.

**मधुसूदन पुरोहित :-**

आपण परत नविन विषय मांडणार आणि उत्तर तसेच राहणार.

**आसिफ शेख :-**

सन्मा. पिठासिन अधिकारी, अधिकाऱ्यांनी आता सांगितले की आम्ही तीन हजार झोपड्या आणि १५० अनधिकृत बांधकाम तोडले एकदम कॉलर टाईट करुन सभागृहात सांगितले. पण अनधिकृत बांधकाम राजरोसपणे उभे राहतात. त्याच्यावर आपण का कार्यवाही करत नाही. झोपडया तोडतात ठिक आहे, ते

गोरगरिबांचे आहे. पण शहरात आरक्षणात अनधिकृत मोठ मोठे बांधकाम चालू आहे. ते का तोडत नाही? जो अनधिकृत है वह सब तुटना चाहिए। झोपडया अनधिकृत आहे त्या तुटल्या पाहिजेत. झोपडयांना संरक्षण द्यायचे नाही. जे अनधिकृत आहे ते तुटलेच पाहिजे. गरिबांना वेगळा न्याय, श्रीमंताना वेगळा न्याय असे करु नका.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, या सभागृहात सगळे झोपडपट्टीच्या विरोधात आहे आणि त्या झोपडपट्टया होवू नये या विरोधात अख्खं सभागृह असतानासुद्धा अधिकारी जर असे बोलत असतील की, आम्ही किती जणांशी दुश्मनी घ्यायची आणि काय करायचे तर एखादा नगरसेवक तुम्हांला झोपडपट्टीबद्दल कुठची शिफारस घेउन येत असेल तर त्याचे नाव आपण येथे डिक्लेअर करा आणि तुम्ही त्या झोपडपट्टया तोडल्या पाहिजेत या मताशी आम्ही सगळेजण आहोत व झोपडपट्टी शहर झाले नाही पाहिजे आपले प्रशासन झोपलेले आहे. मी आपल्याला सांगतो. प्रत्येक फेरिवाला सुद्धा नविन फेरिवाले रोज किती बसतात? आपण जुन्यांना उचलतो. उचला, पण नविन बसतात त्यांचे काय?

**मधुसूदन पुरोहित :-**

आम्हांला फेरिवाले कार्ड दाखवतात की, मी या युनियनचा माणूस आहे मी याचा माणूस आहे. मी असे करेन. मी तसे करेन. मी त्यांना फोन लावून देईल तुम्ही त्यांच्याशी बोला. फेरिवाल्यांचा विषय आला म्हणून मी तुम्हांला सांगतोय. एका ज्वेलर्सच्या दुकानाच्या बाहेर एक केळेवाला बसतो. त्याला ज्वेलर्सवाल्यांनी विरोध केला.

**शरद पाटील :-**

आज नविन फेरीवाले किती बसतात? आज आपला छत्रपती शिवाजी महाराज मार्ग आहे. या रस्त्यावर फेरीवाले बसतात. आज फ्लाय ओव्हरच्या खाली फेरीवाले आहेत त्यांना आपण का उचलत नाही? या रस्त्यावर फेरीवाल्यांना बसायला कोणी परवानगी दिली? मी तुम्हांला सांगतो आज १० ते १२ आईस्क्रीमवाले व फेरीवाले या फ्लाय ओव्हरच्या खाली बसतात. छत्रपती शिवाजी मार्गावर चायनिजच्या गाडया फूटपाथवर लागलेल्या आहेत. त्या गाडया आपण का उचलत नाही आणि नविन फेरीवाले रोजराज या शहरामध्ये येत आहेत. जुन्यांना उचलतात आणि नविन रोज येतात. आपण एक फेरी मारु शकत नाही. अधिकारी म्हणून आपल्याला गाडी दिलेली आहे ते कशासाठी दिलेले आहे? आपण फिरून जिथे फेरीवाले बसतात त्यांना उचलायला पाहिजे. मी लांब जात नाही. केबिनरोडला तीन गाडया होत्या. तेव्हापासून मी पत्रव्यवहार करतोय. आज दोन्ही साईडला केबिनरोडला बसायला लागले आहेत. बायपास रस्ता आहे. आम्हांला बी.पी.रोडला जायची गरज लागत नाही. आम्ही पाच मिनिटात फाटकावर पोहचतो. पण अजून तिथले सुद्धा उचलले जात नाही. आजही आपण फेरिवाल्यांना बी.पी.रोड, नवघर रोडवरून उचलतो. पण तिथे उचलून झाल्यावर ८.०० वा. नंतर आपली गाडी गेली की, फेरीवाले येउन बसतात. मधे येउन बसतात व धंदा करतात. माझ्यावर एकदा फेरीवाल्यांबद्दल कंम्प्लेंट झाली. अशी कम्प्लेंट केली गेली की मी हफ्ता मागतोय. आम्ही हफ्ता मागत नाही. मी त्यांना सांगितले की, जर तुम्ही तिथे बसता, त्यावेळेला मला पोलिसांनी सहकार्य केले तो ना-फेरिवाला झोन होता तिथे तुम्ही का बसलात. म्हणून मधे जातात ते फेरीवालेसुद्धा उचलून घ्या. नीट काम करायचे असेल खऱ्या रितीने काम करा. फक्त ब्लॅकमेलिंग करुन, उचलून, उठवून त्यांच्याकडून वसूली करु नका.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, झोपडपट्टया आणि आरक्षित जागा याला जास्त महत्व द्या. अन्यथा मिटींग पुढे चालणारच नाही आणि सदस्यांनी चालवू ही नये. अनधिकृत बांधकाम आणि झोपडपट्टया हाच विषय सभागृहाने उचलून धरायचा आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, झोपडपट्टयांचा एवढा विषय निघालेला आहे. ज्या झोपडपट्टया जुन्या आहेत त्यांना हात लावायचा नाही. त्यांच्याकडे जूने प्रुफ आहेत. ज्या झोपड्या नव्याने बनतात. त्या तुम्ही बिनधास्त तोडा. दुसरी गोष्ट आपण फूटपाथचा विषय घ्या. फूटपाथवर बिल्डिंगवाले, सामान आहेत ते आपण उचला. ते का उचलत नाही? पण जुन्या झोपडपट्टयांना हात लावायचे नाही.

**स्नेहा पांडे :-**

श्री. पानपट्टे साहब, कह रहे है की, तीन हजार झोपडे तोडे तोडना तो दूर की बात है। एस.एन. कॉलेज के पिछे इंदिरानगर मे आज भी रोज देड-दो सौ नए झोपडे बन रहे है। क्या महानगरपालिका को इसकी जानकारी है जानकारी है तो जो नए झोपडे बन रहे है वह क्यो नही रुकाया जा रहा है? अधिकारीयोंको पता नही है या जानबुझकर बनाया जा रहा है?

**प्रविण पाटील :-**

मा. महापौर साहब, सर्व्हे नं. २०९ चौपाटीसाठी आरक्षित जागा एस.एन.कॉलेजच्या मागची जागा...

**बालाजी खतगांवकर (उपायुक्त (मु.) सो.) :-**

माझी सर्व सन्मा. सदस्यांना विनंती आहे की, एकेकाने बोलले तर आपली चर्चा होईल व त्याचे मिनिटस होतील. आपण जर एकदाच सर्व बोललात तर त्याची नोंद काय होईल? व ते रेकॉर्डला कसे राहिल? माझी विनंती आहे की, एका एका सदस्याने जर विषय मांडले तर आपला सर्वांचा त्याच्यात चांगला निकाल होईल.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

आज झोपडपट्टीचा आणि अनधिकृत बांधकामाचा निर्णय लागू द्या. आणि मग काय व्हायचे आहे ते होउ द्या. त्याशिवाय मिटींग होणार नाही.

**मा. महापौर :-**

आपल्या भावनेशी सहमत आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

कारण तुम्हांला पत्र देवून सुद्धा अधिकारी काम करत नाही. तर त्याचा फायदा काय?

**मा. महापौर :-**

इसलिए मैंने बोला एक एक बोलिए।

**दिव्या तिवारी :-**

मा. महापौर साहब, जो पुरानी झोपडपट्टीया है उनको हम नही दे पा रहे है। तो जो नए झोपडे बन रहे है उनको हमलोग कहा से देंगे और पब्लिक जो है वह किसी बात को सुनने के लिए तयार नही है। अतिक्रमण विभाग कार्यवाही करनेके लिए तयार नही है। दो-दो, तीन-तीन लेटर देने के बाद भी यही जवाब मिलता है की ठिक हे। पुलिस प्रोटेक्शन लेने के बाद हम कार्यवाही करेंगे। लेकिन आज तक उन्होंने कोई कार्यवाही नही की है और दिन ब दिन झोपडे बनते जा रहे है। इसपर प्रशासन का निर्देश है हमको उसका प्रमाण चाहिए।

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहब, याठिकाणी अतिक्रमण व झोपडपट्टी या विषयावर अर्धा तास चर्चा झाली. आपल्या मिरा भाईंदर मेन रोड करुन क्वीन्स पार्कला जाणारा गणपती मार्बलच्या येथून जाणारा रस्ता, या रस्त्यावरून आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेची बससेवा सुद्धा सुरु आहे. त्या रस्त्याची हद्द नेमके डी.पी.रोड केवढा आहे. त्यासंदर्भात आपण बांधकाम, नगररचनेला पत्र लिहिले आहे. त्याचे कुठेही उत्तर नाही आणि त्याच्यावर कुठलीही कार्यवाही नाही. त्या रस्त्याच्या मधोमध गणपती मार्बल आणि बऱ्याचशा मार्बलवाल्यांनी अतिक्रमण केले आहे. त्याच ठिकाणाहून क्वीन्स पार्कच्या सगळ्या लोकांचे जाणे-येणे आहे. दिपक रोडचा रस्ता व एक ह्या साईडचा रस्ता, या रस्त्याच्या संदर्भात चार पत्र लिहिलेली आहेत. त्याच्यामध्ये कुठलीही कार्यवाही झालेली नाही. मार्बलवाल्यांनी रोडवर अक्षरशः दुकाने थाटून ठेवलेली आहेत. या संदर्भात वारंवार मी कमिशनर साहेबांशीसुद्धा चर्चा केली. पत्रव्यवहार केला तरीही काय होत नाही. त्वरीत त्याच्यावर कार्यवाही व्हावी अशी माझी विनंती आहे.

**मधुसूदन पुरोहित :-**

मा. महापौर साहेब, श्री. पानपट्टे साहेबांना माझ्या प्रश्नाचे उत्तर द्यायला लावा. पाच हजार फूट अनधिकृत बांधकाम केलेले आहे. तेही एका शाळेच्या मॅनेजमेंटने त्याचे काय करायचे आहे? डॉन बॉस्को स्कूल का पाच हजार फूट का अनधिकृत बांधकाम है उसके विषय मे उत्तर चाहिए। साहेब, माझ्या प्रश्नाचे उत्तर द्या. नाहीतर ते तोडायला लावा. तुम्हांला बोलता येत नाही का? मग उत्तर द्या ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मी उत्तर देत आहे ना. पण आपण ऐकूनच घ्यायला तयार नाही.

**मधूसुदन पुरोहित :-**

काय ऐकून घेत नाही. किती वेळ झाला?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

सदरचे बांधकाम जुने असल्यामुळे त्याची हेअरिंग घेवून पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

**मधुसूदन पुरोहित :-**

कधी येईल?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

येईल. पाच सहा दिवसांत येईल.

**मधुसूदन पुरोहित :-**

त्याला ते बांधकाम बांधून पाच वर्षे झालेली आहेत. सोसायटीचा तो पार्किंग प्लेस आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ते बांधकाम जुनं आहे. त्याच्यामध्ये प्रोसिजर असते. त्याला नोटीस द्यावी लागते.

**मधुसूदन पुरोहित :-**

किती वेळ? पाच वर्षे झालेली आहेत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ते बांधकाम जुनं असल्यामुळे तोडता आलेले नाही. त्याची हेअरिंग घ्यावी लागेल.

**मधुसूदन पुरोहित :-**

जेव्हा त्याने अनधिकृत बांधकाम केले तेव्हा का तोडले नाही?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

त्यावेळेस पाच वर्षाअगोदर मी नव्हतो.

**मधुसूदन पुरोहित :-**

झाले, असे बोलून आपण विषय सोडला.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आम्हांला कायदा हातात घेता येत नाही. तुम्हांला माहित नसेल पण त्याला नोटीस द्यावी लागते. हेअरिंग द्यावी लागते. त्यानंतर मग कार्यवाही केली जाते.

**मधूसुदन पुरोहित :-**

मग ते कधी होईल?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

८-१५ दिवसात होवून जाईल.

**मधूसूदन पुरोहित :-**

नक्की.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब, सुभाषचंद्र बोस मैदानाजवळ एक सर्कल आहे. ते गार्डनसाठी रिझर्व्ह आहे ना.

**मा. महापौर :-**

तो रोड आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

डिवायडरच्या मधला भाग.

**मा. महापौर :-**

तो मधला भाग पण रोडच आहे. तिथे आपण मधला रोड पेंन्डींग ठेवला आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

ती जागा झोपडपट्टीवाल्यांसाठी आहे का? तिथली झोपडपट्टी कधी हटवणार? त्या रस्त्याने नगरसेवक, आपण ही जात असता. उद्या जर तिथला मुलगा गाडीखाली आला तर तो पहिला मार खाणार.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, त्यांचे पहिल्यांदा पुर्नवसन करा. नंतर तुम्ही त्यांना तेथून बिनधास्त काढा. ज्यांच्याकडे प्रुफ आहेत त्यांचे प्रुफ बघून त्यांना रुम द्या. नाहीतर सगळ्या झोपडपट्टया काढून टाका. जे रुम तयार आहेत ते कोणाला द्यायचे आहे?

**निर्मला सावळे :-**

पिठासिन अधिकाऱ्याच्या परवानगीने बोलत आहे. मिरा भाईंदर शहरामध्ये रस्ते किंवा इतर विकास कामासाठी रस्त्यामध्ये बाधित असणाऱ्या झोपडे, घरं आपणाकडून तोडली गेली होती त्यावेळेस काळामध्ये मिरा भाईंदर शहराचे आयुक्त शिवमुर्ती नाईक साहेब होते. त्यावेळेस त्यांना प्रत्यक्ष फोटोपास आणि तसे लेखी पुरावे त्यांच्याकडे आहेत की, १९९५ च्या आधीच्या ह्या वस्त्या आहेत. सुभाषचंद्र बोस मैदानाच्या समोर जे डिवायडंर आहे. त्याच्यात जी घरे आहेत त्यांना आपण त्यावेळेस आश्वासन दिले होते. की, तुमचे पुर्नवसन झाल्याशिवाय आपल्या झोपड्यांना हात लावणार नाही. तर प्रथम......

**प्रेमनाथ पाटील :-**

मॅडम, ते डिवायडर आता दोन वर्षापुर्वी झाले आहे.

**निर्मला सावळे :-**

आधीपासुन चार वर्षापासुन त्या तिथे झोपडे आहेत. रस्त्यामध्ये बाधित झालेले असतांना त्यांचे पुर्नवसन झाल्याशिवाय या आपल्या घरांना हात लावता येत नाही. त्याकरिता मी मा. महापौरांना विनंती करते की, शहरामध्ये ठिकठिकाणी अनधिकृत बांधकामे मोठेमोठी इमारती डौलाने उभे राहतात. त्याच्यावर प्रथम कार्यवाही करावी नंतर झोपडपट्ट्यांना हात लावावे.

**अनंत पाटील :-**

याच विभागातल्या ज्या झोपडपट्ट्या आंबेडकरनगरमध्ये होत्या ते घोडबंदर येथे ३३३ सर्व्हे नंबरला शिफ्ट केल्या होत्या. त्यांनी तिथे ही जागा कव्हर केलेली आहे आणि येथे ही जागा कव्हर केलेली आहे. दोन्ही साईडला जर झोपडपट्टीला प्राधान्य दिले तर या शहराचे झोपडपट्टीमध्ये रुपांतर होईल त्यांच्या पुर्नवसनाचा मुद्दा आपण उपस्थित केला होता. पुर्नवसन करायचे पण त्या झोपडपट्टीतील डिवायरमध्ये राहणारी लोक हे खरोखर पुर्नवसन करणारी लोक आहेत का? शहरात येणारे मंत्री महोदय आहेत, गाड्या जातात. आमच्या गावची लोक जातात. जर त्यांचे ॲक्सींडेट झाले तर त्याला जबाबदार कोण? आपण त्यांचे तिथे पुर्नवसन केले

आहे की, नाही? घोडबंदर येथे पुर्नवसन करण्याकरिता आपण जागा दिली होती की, नाही? याचे उत्तर प्रशासनाने द्यावे. कनकियाच्या ठिकाणी आपण पुर्नवसन केले होते. काही झोपडपट्ट्यांना मार्कींग दिली होती. त्याचे काय झाले?

**प्रविण पाटील :-**

मा. महापौर साहेब, एस.एन कॉलेजच्या मागे सर्व्हे नं २०९ हे एकंदरीत क्षेत्र १५ हेक्टर आहे. त्याच्यापैकी तीन हेक्टर जागा शंकर नारायण कॉलेजसाठी व मैदानासाठी आरक्षित केलेली आहे. उरलेल्या १३ हेक्टर मध्ये जवळ जवळ त्यावर मी जवळ जवळ एक ते दिड महिना झाला. मी पाठपुरावा केलेला आहे की, आपल्याकडुन तिथले अतिक्रमण हटवावे. श्री. पानपट्टे साहेबांकडे चार्ज असतांना त्यांना प्रत्यक्षात मी तीन ते चार वेळा भेटलो लेखी मागणी केली. तरीही आतापर्यंत काहीही कार्यवाही झालेली नाही. त्याच्यावर तुम्ही कार्यवाही कधी करणार आहात किंवा त्यांना फोटोपास देवुन राहायला देणार आहात मग तिथे झोपडे बनवायला आमची ही माणस पाठवतो आपण सांगा की, आपण तिथे झोपडपट्टीवर कार्यवाही करणार आहात की, नाही आजच्या तरखेला तिथे हजारो झोपड्या आहेत. काही लोक पाच – पाच हजार रुपये घेवुन बसले आहेत. आता चला तुम्हांला आता दाखवतो.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, मला श्री. पानपट्टे साहेबांना प्रश्न विचारायचा आहे की, आपण तीन हजार झोपडपट्ट्या कुठल्या तोडल्या? एका अधिकाऱ्याच्या तोडुन असे हे खोटे उत्तर चालत नाही. आपण हा असा चुकीचा पायंडा पाडला आहात तुम्ही सक्षम नसल्यामुळे तुमची कामगिरी आम्हांला करायला लागली. रात्री १०० झोपडपट्ट्या मी स्वतः तोडल्यात आणि ती लाकड जाळुन टाकली.

**प्रविण पाटील :-**

मा. महापौर साहेब, आम्ही कधीही अतिक्रमण विभागाकडे तक्रार केली. की एकाच कारण असते की, नंतर करतो व आपले तिथे कर्मचारी नसतात. अतिक्रमण न हटविण्यामागचे नेमके कारण काय आहे?

**जुबैर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, सभागृहात सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजीने चांगला विषय उपस्थित केला होता. मला फक्त आपल्या अधिकाऱ्यांना असे विचारायचे आहे की, छत्रपती शिवाजी महामार्गावर मला वाटते आपले अधिकारी दिवसाच्या आत कमीतकमी दोन ते तीन वेळा आपल्या महापालिकेच्या गाड्यातुन फिरतात. त्यांना गाड्या घरी सोडायला जातात. त्याच मार्गावर सिग्नल बसवणे हे अत्यंत गरजेचे आहे. मात्र ते कुपंण लावण्यात आलेले आहे फॅन्सींग या संदर्भात मी बांधकाम विभागाला पत्रव्यवहार केला होता त्यावर मला एक परत पत्र आले. मी पत्र पाठवले होते. की, कुंपण तुटून पडलेले आहे. त्याची दुरुस्ती झालेली नाही. कुंपण चोरीला गेलेले आहे. या तांत्रिक पध्दतीने कुपंण ओलांडुन लोक जातात. त्याच्यातुन ही सिग्नल बसवले आहेत. अपघात होवु शकतो. शहराचा एवढा चांगला रस्ता आपण तयार केलेला आहे. त्याच्यामागे खर्च झालेला आहे. आपल्या करधारकांचा पैसा लागतो. महापालिकेचे टेंडर निघतात. त्याचे पैसे वाटप होतात. साहेब, त्याच्यावर लक्ष देणे गरजेचे आहे. तो मुख्य मार्ग आहे. दिड दोन लाख खर्च करतो त्याचा फायदा ही झाला पाहिजे. माझी या मा.महासभेला सुचना आहे आणि आपण त्यापध्दतीची रुलिंग द्यावी. या विषयाबद्दल तातडीने कार्यवाही करण्यांत यावी. सुशोभिकरणाचे काम व्हावे त्याला रंगरंगोटी व्हावी ते कुंपण परत तांत्रिक पध्दतीने बसविण्यात यावे.

**मा. महापौर :-**

संपुर्ण सभागृहाने आपली भावना व्यक्त केलेली आहे. अतिक्रमण विषय झोपडपट्टी, इललिगल बांधकाम आणि महत्वाचा मुद्दा हाही आहे. दरवेळी आपल्याकडे मा. मंत्री गणेश नाईक साहेब येतात. दरवेळी त्याच विषयावर चर्चा होते. अधिकाऱ्याला झापलेही जाते तरीही आपण त्याबद्दल प्रशासन काहीही निर्णय घेत. नाही की, नक्की काय करायचे आहे आणि अतिक्रमण हे अगदी जोरात वाढलेले आहे व मला हे ही माहिती आहे की, श्री. पानपट्टे साहेबांचा चार्ज याकरिता काढलेला आहे की, ही सर्व उत्तरे द्यायला लागतील म्हणुन त्यांनी हा चार्ज बदली करुन घेतलेला आहे. नक्कीच त्यांच्यामुळे हे सगळे अनधिकृत बांधकाम झालेले आहेत. आमचे काही दुमत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, त्याच्यावर काय कार्यवाही करण्यांत येईल.

**मा. महापौर :-**

आता यापुढे मी उपायुक्त साहेबांना विनंती करेन, जो कोणी संबंधित क्षेत्रिय अधिकारी आहे त्याला २००२ च्या जी.आर. प्रमाणे एखाद्या वॉर्डात किंवा प्रभागात त्याच्या क्षेत्रात इललिगल बांधकाम होत असेल तर जी.आर. प्रमाणे त्यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करण्यात यावी आणि आपले जेवढे क्षेत्रिय अधिकारी आहेत त्यांचे असे म्हणणे असते की, आम्ही पुटअप करतो पण आम्हाला रिसीव्हच देत नाही. आम्हाला वरचे नाही म्हणून सांगतात किंवा काही ना काही अडचणी असतात. तर क्षेत्रिय अधिकाऱ्यांना दोषी ठरवायचे त्यांच्यावर कार्यवाही करा आणि क्षेत्रिय अधिकाऱ्याने विभाग प्रमुखांकडे रिपोर्ट पाठवला असेल तर त्यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करण्यात यावी आणि ज्याच्याकडे चार्ज असेल त्याने जर एखाद्या ठिकाणी कार्यवाही केली नाही तर

त्यांच्यावर आपण नियमाप्रमाणे कार्यवाही करा. त्याशिवाय यांना शिस्त लागणार नाही. दरवेळी नगरसेवक नगरसेविका सन्मा. सदस्य सर्व बोंबलत राहतील आणि कुठल्याही प्रकारची कार्यवाही याच्यात होणार नाही याची मला खात्री आहे. म्हणून जिथपर्यंत आपण निलंबनाची कार्यवाही करणार नाही व त्यांना कुठेतरी असे वाटत नाही की, आपण हे नाही केले तर आपण निलंबित होणार आहे. याकरिता उपायुक्त साहेब, आपण या विषयाकरिता तातडीने याची अंमलबजावणी करा. ज्या ज्या ठिकाणी इललिगल बांधकाम आहे व तुम्हाला पोलिस प्रोटेक्शन मिळत नसेल तर आपण माझ्याकडे सुचना करा. माझे एस.पी. साहेबांशी बोलण झालेले आहे. ज्या ज्या वेळी तुम्ही पोलिस प्रोटेक्शन मागणार तेव्हा आम्ही नक्कीच तुम्हांला पोलिस प्रोटेक्शन देणार. म्हणजे आपण पोलिस प्रोटेक्शनचा आधार घेवू नका की, आम्हाला पोलिस संरक्षण मिळत नाही म्हणून आम्ही झोपडपट्टी काढत नाही. श्री. घेवारे साहेब, जेवढे आरक्षण हस्तांतरित झालेले आहेत त्यांच्याकडून आपण कुंपण भिंत आणि भरावाचे पैसे घेतलेले आहेत. तर आपण सध्या भराव करू नका पण कुंपण भिंत, आपल्याकडे ऑलरेडी पैसे घेतलेले आहेत. आपले पैसे तुमच्याकडे शिल्लक पडलेले आहेत आणि आपण जेवढे आरक्षण ताब्यात घेतले आहे कमीत कमी त्याला बॉन्ड्री करावी आणि गेट व ताला लावण्यात यावा. एवढे जरी केले तरी कुठेतरी त्यांच्यावर कंट्रोल येईल. तसेच आपण झोपडपट्टी करिता उत्तर देता की, ही आमची जागा नाही. गर्व्हमेंटची जागा आहे. महाराष्ट्र गर्व्हमेंटची जागा आहे, सेंट्रल गर्व्हमेंटची जागा आहे आपण किती ही केले तर त्याच्यामध्ये आपले डी.पी. रोड असतील किंवा भविष्यात आरक्षण असेल त्याचा ही इफेक्ट होणार आहे. कोणत्याही जागा असू दे. एखादी इललिगल बांधकाम असेल, बिल्डींग असू द्या, झोपडपट्टी असू द्या, तुम्ही सर्वांवर कार्यवाही करा आणि आपण क्षेत्रिय अधिकाऱ्यावर एकदम कडकपणे डिसीजन घ्या. मला दिसत नाही की, भविष्यात याच्यात कुठेतरी चेंजेस असतील. साहेब, आपण हे जिथपर्यंत स्ट्रॉंगली घेत नाही. पुढच्यावेळी जनता दरबाराला मा. श्री. गणेश नाईक साहेब येणार आहेत. तर त्यांना काहीतरी करून दाखवा. तुम्हीपण येथे काहीतरी करता आणि आम्हीपण येथे काहीतरी काम करतोय. यापुढे मी आपल्याला आश्वासन देतो की, पुढच्या मिटींगमध्ये जर ह्या लोकांनी कार्यवाही केली नाहीतर, आपणच त्यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करू या.

**मधुसुधन पुरोहित :-**

धन्यवाद.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, महापालिका जी झोपडपट्टया वाढवते त्याच्याबद्दल सांगतोय, महानंदा आरे सरिता आणि चर्मकारांकरिता महापालिकेतर्फे स्टॉल दिले जातात. टाउन प्लानिंग डिपार्टमेंट ज्यावेळी स्टॉल परवानगी देते त्यावेळी कुठेही जावून सर्व्हे करत नाही आणि ठिकठिकाणी रोडवर त्या स्टॉलची परवानगी दिलेली आहे. गेल्या सहा महिन्यामध्ये एवढे स्टॉल वाढले आहेत की, त्यांची सर्वांची चौकशी करून तेही स्टॉल उठवण्यात यावेत.

**मा. महापौर :-**

टाउन प्लानिंग डिपार्टमेंटने याची चौकशी करून कार्यवाही करावी.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब, आपल्या येथे मिरा भाईंदर शहरामध्ये रिलाईन्सचे पोल लावलेले आहेत त्याला आपण परमिशन दिलेली आहे का?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी महत्वाचा मुद्दा काढलेला आहे. आपल्या येथे गेल्या पाच दहा वर्षात रिलाईन्स, हच, एअर टेल या लोकांनी आपल्या येथे खड्डे खोदून त्यांचे पाईप टाकण्याचे काम पुर्ण केलेले आहे. ज्यावेळी आपल्याकडे एखादी कंपनी प्रस्ताव सादर करते, आम्हाला ह्याची परवानगी द्या. तर आपण त्यांच्याकडून फक्त खड्डे दुरूस्तीचे पैसे घेतो. पण आता कायम स्वरूपी आपली ती जागा ते वापरणार आहेत ते त्यांच्या व्यवसायासाठी जी अंडरग्राउन्ड जागा आहे जे काय ते आपली जागा वापरणार आहेत. तर मी ऑलरेडी श्री. बारकुंड साहेबांना आदेश दिलेले आहेत की, आपल्या मालकीच्या जेवढ्या जागा आहेत, महापालिकेच्या जेवढ्या जागा आहेत, तर कुठल्याही कंपनीचे फायबर वगैरे असतील तर त्यांच्याकडून वार्षिक भाडे किंवा मंथली भाडे असे सभेसमोर आणावे व भाडे ठरवा. कारण ते व्यवसाय करतात फुकटमध्ये आपली जागा वापरतात आणि रिलाईन्सच्या पोलवाल्यांना आपण वारंवार नोटीस दिलेली आहे. कारण त्यांच्यापोलवर आपल्या महापालिकेने जाहिरातीची परवानगी दिली तरी ते तातडीने काढून टाकतात. आपण त्यांना ऑलरेडी नोटीस बजावलेली आहे की, तुम्ही रितसर आमच्याकडून त्यांना ऑलरेडी नोटीस बजावलेली आहे की, तुम्ही रितसर आमच्याकडून प्रस्ताव घ्या परवानगी घ्या, त्यानंतर तुम्ही फायबर आणि पोल बसवा. पण ऑलरेडी फायबर व पोल काढण्याचे काम चालू आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, माझ्या प्रभागात तलाव रोडला एक पोल पुर्णपणे वाकडा झालेला आहे आणि तो कधीही पडू शकतो.

**मा. महापौर :-**

.ते ताबडतोब उद्या काढून घेण्यात येईल.

**भगवती शर्मा :-**

मेरे वॉर्ड के अंदर भी वही परिस्थिती है।

**मा. महापौर :-**

सारे पोल निकाले जाऐंगे।

**हेलन गोविंद :-**

सन्मा. महापौर साहेब, बराच वेळ झालेला आहे. आपण विषयाला सुरूवात करा.

**मिलन पाटील :-**

ह्यांनी केलेल्या प्रश्नाचे श्री. दिवटे साहेबांना उत्तर देवू द्या. सरकारी जागेत अडचण आहे. तेवढा एक विषय आहे तो घ्या.

**मा. महापौर :-**

सेंट्रल गर्व्हमेंटची जागा असू द्या स्टेट गर्व्हमेंटची जागा असू दे, याबाबत मी सांगितले आहे.

**भगवती शर्मा :-**

उन्होने जो जवाब दिया उसका वह उत्तर दे। उन्होने ऐसा कैसा जवाब दिया एक सन्मा. प्रतिष्ठित को ऐसे कैसे जवाब दिया। जब के श्री. खतगांवकर साहबने उनको भी निर्देश दिया था।

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त सो.) :-**

मा. महापौर महोदयांच्या परवानगीने निवेदन करतो की, या संदर्भामध्ये शासनाचे महसुल व वनविभागाचे जे परिपत्रक आहे. त्या परिपत्रकाच्या अनुषंगाने मी त्यावेळी बोललेलो होतो आणि सन्मा. सदस्यांना त्या परिपत्रकाची कॉपी ही दिलेली आहे. जी शासकिय खात्याची जागा आहे त्या शासकिय खात्याच्या अधिकाऱ्यांशी त्यांच्या नियंत्रणाखाली आपल्याला ही कार्यवाही करणे आवश्यक असते आणि त्यावेळी फौज फाटा, आपली यंत्रणा, मनुष्य बळ आपण त्यांना देवून ती कार्यवाही करतो. मागच्या फेब्रुवारी २००७ मध्ये या संदर्भात मा. आयुक्त महोदयांकडून नोट टाकून संबंधित शासकिय महसूल खात्याकडे जे संबंधित मालकीचे खाते आहेत त्यांच्याशी पत्रव्यवहार केलेला आहे आणि त्यांच्याशी संपर्क साधून याबाबतची पुढची कार्यवाही महापालिकेमार्फत इनिशिएट करून करू. प्राधान्याने ह्याच्यामध्ये जी आरक्षित जागा आहे. आरक्षित रस्ते आहे त्याच्यावर काही प्राधान्य ठेवून आपण त्याप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक राहिल.

**मा. महापौर :-**

इललीगल बांधकाम कुठे होतात. सर्व इललिगल जागेतून बांधकाम काढून टाका.

**भगवती शर्मा :-**

इन्होने मुझे एक परिपत्रक दिया था, जो ४ अक्टूबर, १९८२ का है।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य, भगवती शर्माजी मैने एक लाईन मे खुलासा कर दिया है की, आज के बाद अगर ऐसा हुआ तो हम ही कार्यवाही करेंगे।

**उमा सपार :-**

मा. महापौर साहेब, जिथे आरक्षित जागा आहे तिथे कम्पाउंड टाकून आपला बोर्ड लावून घ्या.

**मा. महापौर :-**

कंम्पाउन्ड लावण्यात येईल.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १६ दि. २०/०२/२००७, दि. १७/०३/२००७, दि. १६/०४/२००७, दि. ०३/०५/२००७ व दि. १७/०५/२००७ रोजींच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे या विषयाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**मदनसिंग उदितनारायण :-**

सचिव साहब, पान क्र. १३ मे निचे से दुसरा परिच्छेद है उसको मै पुरा पढता हूँ।

**नगरसचिव :-**

दुरूस्ती क्या है?

**मदनसिंग उदितनारायण :-**

पुरा पढने के बाद ही समझ मे आएगा। मा. महापौर महोदय की, परवानगी से बोलना चाहता हूँ, अभी जैसे इस विषयपर चर्चा हुई की, शासन और प्रशासन का क्या रवैया है। खाली मा. महासभा और जो नगरसेवक है सबको फसवा फसवी करने का क्या? हर किसीको, कुछभी बोलकर टाल दे या बोल दो की हमको मालूम नही है और इस विषय को मै इसलिए कह रहा हु की, पिछली मा. महासभा मे मैने लक्षवेधी लाई थी। लक्षवेधी का मतलब क्या होता है। या लक्षवेधी पर आपने रूलिंग दी है तो उसका मतलब क्या होता है? पिछली मा. महासभा मे मा. महापौर मॅडमने रूलिंग दिया या की, मेरी लक्षवेधीपर आठ दिन मे कार्यवाही की जाएगी। उसके उपरांत मैने सचिव साहब को और अतिक्रमण विभाग के अधिकारी को रिमाइंडर दिया। फिर भी एक महिना हो गया अभी तक उसपर कुछ भी कार्यवाही नही हुई। तो इसका मतलब क्या समझा

जाए इसका जवाब दिजीए। आज जो विषय चला वही मैने जनवरी महिने मे निकाला था और यह आज का विषय नही है। यह जो मेरा परिच्छेद है वह जनवरी महिने मे मेरी लक्षवेधी थी, उस लक्षवेधी पर फरवरी महिने की महासभा मे अपनी यह चर्चा हुई थी और इस विषय पर पेज नं. ३० पर मा. महापौरजीने रूलिंग दिया है। मुख्यालय आणि अतिक्रमण विभागाचे अधिकारी यांनी मा. आयुक्तांच्या शेऱ्याची वाट न बघता आपण या अतिक्रमणावर मोहीम राबविली गेली पाहिजे. मेरा यह कहना है की, विषय पर लक्षवेधी लायी जाती है और उसी विषय पर मा. महासभा मे रूलिंग भी दिया जाता है। फिर भी इसका कोई मतलब नही निकलता है। इस विषय को एक साल हो गया है। तो आज भी हमलोग बैठे है। अभी जैसे मा. महापौर साहबने बडी अच्छी रूलिंग दि की, सब अधिकारी नीचेवाले, उपरवालोपर कार्यवाही की जाए। तो क्या खाली मा. महासभा मे हम जो ७९ सदस्य बैठे है, जो पत्रकार बैठे है। जो दर्शकगृह मे दर्शक बैठे है। डायसवालो का अधिकारी सिर्फ इतना ही है की, उनको कुछ भी बोलकर फसवा फसवी करके बेवकुफ बनाया जाए। इसके आगे कुछ नही है क्या? मै डायस के अधिकारी को पुछ रहा हुँ। डायसपर जो भी बैठे है और आप लोगो को मालूम होगा की पिछली मा. महासभा मे...

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, आप पहिले सुन लिजीए। हमलोग हमारा टाईम खराब करने के लिए मा. महासभा मे नही आते है। इसका मतलब आप यह जो प्रोसिडींग की मान्यता ले रहे हो तो आपके रूलिंग की क्या व्हॅल्यु है? जब आपके रूलिंग की व्हॅल्यु नही तो हमारा इस महासभामे बैठना उचित नही है। यह सिर्फ पेज नं. १, पेज नं. २, पेज नं. ३ क्या इसके लिए हम आते है क्या? यह इतिवृत्तांत को मंजुरी मिलने के पहिले आपके रूलिंग की या जो पहिले महापौर थे उनके रूलिंग पर क्या कार्यवाही की गयी है? इसपर हमको जानकारी चाहिए। पच्चास बार बोला है। यह स्थायी समिती मे भी बोला है। सिर्फ रूलिंग हे करतोय, ते करतोय किंतु उसका अर्थ क्या है? हमे कामधंदा नही क्या? हम बिझनेस मॅन नही है क्या? सिर्फ मा. महासभा मे लोकप्रतिनिधी बोलके आपका ऐसा टाईम वेस्ट करने का क्या? आप इस इतिवृत्तांत को मंजुरी देने से पहिले जो जो रूलिंग हुई है उसके बारे मे अधिकारीयो से पुछो नही तो हमारा विरोध है। ऐसी इतिवृत्तांत को रूलिंग देने के लिए हमारा कोई मतलब नही है।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी व मदनसिंग उदितनारायणजी मैने आपको पहिले ही आपसे निवेदन किया था की, इललिगल काम चालू है...

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

यह इललिगल है। जो जो रूलिंग आयी है।

**मा. महापौर :-**

आपका जो परटीक्युलर विषय आया है उसपर बोल रहा हुँ।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हमे जो जो रूलिंग आयी है वह रूलिंग के बारे मे आज यह इतिवृत्तांत चार पाच महिने के बाद मे आ रहा है। इसमे रूलिंग के बारे मे टिपणी होनी चाहिए। क्या पिछली महासभा की यह रूलिंग महापौर की थी इसका उत्तर यह है। यह कार्यवाही हुई है। नही तो कोई जरूरत नही यहापर इतने लोग बैठे है। यह सब बिना टाईम के नही है। या तो अगली महासभा के इतिवृत्तांत मे जो जो रूलिंग है वह रूलिंग के उपर अधिकारीने क्या कार्यवाही की है वह लाईए नही तो इतिवृत्तांत पास और सब पेज नंबर घुमाते जाईए।

**मदनसिंग उदितनारायण :-**

हमको बतानेकी कोई जरूरत नही।

**मा. महापौर :-**

तो अभी आप क्या चाहते हो वह बताईए।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पिछली मा. महासभा मे जो रूलिंग हुई है उसके बारे मे आपका क्या बोलना है?

**शरद पाटील :-**

आता ज्या विषयावर हल्ला झाला तोच विषय त्या विषयावर रूलिंग दिल्यानंतर सुद्धा काहीच कार्यवाही केली नाही.

**मा. महापौर :-**

आता जी रुलिंग दिली त्यात स्पष्ट केले आहे की, एखादा आयुक्त...

**शरद पाटील :-**

म्हणजे प्रशासनाला ही सुचना आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मागच्या महापौरांनी दिलेले आहे. क्षेत्रिय अधिकारी, मुख्यालय, अतिक्रमाणला रूलिंग दिलेली आहे. मा. महापौर साहेब, आपसे विनंती है की, इस इतिवृत्तांत को जो मंजुरी ले रहे है। जितनी रूलिंग आपने इसके अंदर दि थी, पिछले महापौरने दि है या जो भी अधिकारीयो ने दि है। उस रूलिंग के टिपणी के साथ

मे यह कार्यवाही हुई है। या इसकारण नही हुई है। तो दोषी व्यक्ती मालूम पडेगा। नही तो खाली पेज घुमाते जाओ यह नही चलेगा।

**मदनसिंग उदितनारायण :-**

हम इसको खाली मंजुरी नही देंगे।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

इस तरह से मंजुरी देंगे तो हमलोग साथ नही देंगे।

**मदनसिंग उदितनारायण :-**

मतलब आप लोग पाप करेंगे और उसका फल हमलोग भुगते क्या?

**एस. ए. खान :-**

महापौर साहेब, याच्यापुढे मागच्या सभेचे इतिवृत्तांत पुढच्या सभेमध्ये आलेच पाहिजे हे असे चालणार नाही. एवढ दिल्यावर इतके कोण वाचणार.

**मा. महापौर :-**

बाद मे सिस्टमॅटीकली रेग्युलर हो जाएगा। एक एक प्रोसिडींग आएगा। सन्मा. सदस्य एस.ए.खान साहब का प्रश्न ऐसा है की, हर मिटींग मे मिले। मै मानता हु की, उनकी बात और सहमत हु। ऐसे ही हो लेकीन ऑलरेडी ६ फेब्रुवारी से लेकर अभीतक के प्रोसिडींग मंजुर होना बाकी है। एक साथ मे अगर १२ महिने के दुंगा तो कोई भी वह पढ नही पाएगा। इसलिए चार चार महिनेका दे रहे है। वह दो मिटींग मे पुरा हो जाएगा बादमे रेग्युलर महिने महिने का आएगा ।

**एस. ए. खान :-**

पुढच्या मिटींगमध्ये या मिटींगचे ही मिनिट्स देवून टाका म्हणजे संपुन जाईल.

**मा. महापौर :-**

नही होगा। जुन का प्रोसिडींग बहुत बडा है। वह तीन मिटींग हुआ है।

**शानु गोहिल :-**

अभी यह चार मिटींग हो गयी है। तो चार महिने हो गए है तो पहिली सभा मे सारी प्रोसिडींग दे सकते थे ना। इतना खिचने की क्या जरूरत थी। अभी यह जो प्रोसिडींग एकसाथ मे आयी है तो वह पहिली मिटींग मे दे सकते थे ना। तो आपने क्यो नही दिया।

**मा. महापौर :-**

ठिक है। अभी आगे से देंगे।

**शानु गोहिल :-**

सचिव को जवाब देने दिजिए।

**नगरसचिव :-**

पहिल्या दोन्ही सभा इलेक्शनच्या होत्या.

**शानु गोहिल :-**

तिसऱ्या मिटींगमध्ये द्यायला पाहिजे होती ना.

**नगरसचिव :-**

तिसरी सभा तहकुब होती.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहब अभी एक रूलिंग और दिजीए की जो जो मा. महासभा मे आप डायस पर से रूलिंग करेंगे उसके साथ मे अगली सभा मे जो इतिवृत्तांत आएगा और उसमे आपने जो जो रूलिंग दिया है उसके उपर उस अधिकारीकी टिपणी होनी चाहिए की, मैने यह यह कार्यवाही की है। तो इस इतिवृत्तांत का मतलब है। अन्यथा कोई मतलब नही है। सिर्फ रूलिंग देते जाओ और कुछ नही।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी जो गलत है वह गलत है और जो सही है वो सही है। आपने जो भावना व्यक्त की उससे मै सहमत हु।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

एक रूलिंग और दिजीए।

**मा. महापौर :-**

ऑलरेडी उसपर रूलिंग दिया गया है। अगर आयंदा से इसतरह की, कार्यवाही नही हो तो उस संबंधित अधिकारी पर...

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कार्यवाही नही व इस इतिवृत्तांत के साथ मे पिछले महापालिका मे महासभा मे महापौर ने यह रूलिंग दी एक नंबर, दो नंबर, तीन नंबर एक नंबर मे अगर क्षेत्रिय वार्ड अतिक्रमण विभाग है तो उसपर क्या कार्यवाही की १, २ नंबर मे आरोग्य विभाग है तो उसपर क्या कार्यवाही की और नही तो क्यो नही किया उसका हमको जवाब चाहिए।

**मा. महापौर :-**

ठिक है।

**आसिफ शेख :-**

त्यामध्ये आपण अवधी निश्चित करा. आपण या ठिकाणी जी रूलिंग देतो की, ही कार्यवाही व्हायला पाहिजे त्याचा अवधी निश्चित करा. आठ दिवस तर आठ दिवसात उत्तर पाहिजे आणि मिळाले नाही तर त्या अधिकाऱ्याला घरी बसवा. एक दोन लोकांना घरी बसविल्याशिवाय प्रशासन सुधारणार नाही. स्थायी समितीचे सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स होते तेव्हा पण ते हेच सांगत होते. जर रुलिंग दिली तर कार्यवाही व्हायला पाहिजे. व्हायलाच पाहिजे. नाहीतर, महापौरांचा अर्थ काय? महापौर शहराचे प्रथम नागरिक आहेत. हाउसचा लिडर नेता आहे. आपण कार्यवाही करु शकता.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा. महापौरजी यह मा. महासभा मे जो रुलिंग होती है और जो कामकाज होता है इसपर वॉच करनेके लिए बॉडी को कोई अधिकार है या नही? उसके लिए मा. महासभा मे कुछ नियम है या नही? अगर ऐसा है तो यह जो हमारी लक्षवेधी एक साल से पडी है एच.वाय. एक साल तक उस डिपार्टमेंट मे कौनसे अधिकारी आए और क्यो काम नही किया उसे इसका जवाब दिया जाए। उन्होंने मुझे अभी जवाब दिया की, उन्होंने इस कार्यवाही को अभी तक क्यो लटकाए रखा। इसके पिछे उनका क्या कारण था?

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मा. महापौर साहब, मैं इनका समर्थन करता हूँ, मुझे लगता है की एक साल पहिले मा. महासभा मे जो प्रस्ताव मंजूर हूआ था उसपर कार्यवाही नही हूई है तो आज हम जो कर रहे हे उस पर कार्यवाही नही होगी। मतलब पिछली मा. महासभा का अपमान हुआ और उस महासभा के अपमान के लिए उन अधिकारीयो को दोषी ठहराया जाए। यह आप रुलिंग दिजीए।

**मदन उदितनारायण सिंग :-**

उन अधिकारीयो से जवाब लिया जाए।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

आपने बोला की, हम कोशिश करेंगे की ऐसी कार्यवाही न हो। लेकिन यह कार्यवाही कहा हो रही है वह हमे कैसे मालूम पडेगा। एक मा. नगरसेवकने मुद्दा उठाया की, वहाँ पर अतिक्रमण हो रहा है लेकिन डिपार्टमेंटली लिस्ट निकालिए की अतिक्रमण कहा कहा पर है। ताकि जो जगह लिस्टपर नही आएगी इसका मतलब उसका संरक्षण किया जा रहा है। हर महिने से एक लिस्ट कट जाए जिसमे के अतिक्रमण डिपार्टमेंट डिक्लेअर करे की, हमारी नजर के अंदर अतिक्रमण की जगह है। हम उसपर क्या कार्यवाही कर रहे है? और उसकेबाद मे अतिक्रमण डिपार्टमेंट क्यो? कमिशनर डेप्यूटी कमिशनर उसमे क्या कार्य करते है उसका रुलिंग आना चाहिए यह आप नियम बनाईए। मा. महापौर साहब, आपने मेरी बात सुनो उसपर हा या नही किया, मुझे उसपर हा या ना नही मिला, की अतिक्रमण डिपार्टमेंट हर महिने लिस्ट निकालेगा या नही निकालेगा। उसको कमिशनर डेप्यूटी कमिशनर फॉलोअप करेंगे या नही।

**मा. महापौर :-**

मैं. आपकी बात से सहमत हूँ।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

आपने मेरी बात सुनी लेकिन मुझे यह नही मालूम पडा की, आप उसपर उसके आगे क्या करेंगे?

**मा. महापौर :-**

सचिवजी, या पुढे जेवढी रुलिंग होतात, त्या रुलिंगची वेगळी कॉपी संबंधित डिपार्टमेंटला आपण पाठवावे आणि नंतर प्रोसिडींग कायम झाल्यानंतर पाठवावे.

**नगरसचिव :-**

साहेब, रुलिंग जी असते ते संबंधित अधिकारी येथे असतात त्यांनी ती ताबडतोब घ्यायची असतात. त्यांनी मिनिटसची वाट न बघता ताबडतोब कार्यवाही करायला पाहिजे.

**मा. महापौर :-**

संबंधित जेवढे अधिकारी आहेत. त्यांनी आपली सुचना नोट करावी. एखादे राहिले असेल तर सचिवांकडून रुलिंग घेवून पुन्हा त्याच्यावर कार्यवाही करावी.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा. महापौरजी मैं इस झोपडे के पिछे इसलिए पडा हूँ की यह जो मेरी लक्षवेधी है इसमे सब तरह का गलत काम होता है। वहा गांजा, अफीम, चरस दारु सब मिलता है और एक साल मे यह जो अवैध धंदे बढ गए है उसके लिए अधिकारी जिम्मेदार है क्या?

**मा. महापौर :-**

है।

**मदन उदितनारायण सिंग :-**

और इन अधिकारीयो का मैं छोटा सा उदाहरण देता हूँ, कल हमारे एरिया मे अतिक्रमण की गाडी आयी थी। तो गटर पर एक जगह पर चायनिजवाला है। टेबल लगाकर लोगों को दारु पिलाता है। वह टेबल नही उठाया गया। मैंने अधिकारी को फोन किया वहापर दारु बिकता है। टेबलपर खुलेआम दारु पिलाते है। वह बोला की हम वह टेबल नही उठा सकते है और एक डेकोरेटर जिसके दो बाकडे को मैं दुकान के अंदर लगा और उस बाकडे को उठाकर लेकर चले गए। उस अधिकारी को यहापर बुलाकर हाजिर किया जाए की ऐसा क्यो करता है? उनको यहा पहिले सामने बुलाया जाए।

**प्रभात पाटील :-**

वह अधिकारी कौन है। उस अधिकारी को हम सब लोग को देखना चाहते है।

**मदन उदितनारायण सिंग :-**

जहा खुलेआम दारु मिलता है। उसको नही उठाया गया और एक डेकोरेटर का दो बाकडा उठाकर लाया गया और अतिक्रमण के नाम पर जो अधिकारी वर्ग है वह सिर्फ गरिबोंको सताते है। जहा गरिब मिला जहा उनको पैसा नही मिलता उनको सताते है। जहा से पैसा मिलता है वहा यह अतिक्रमण के अधिकारी कोई कार्यवाही नही करते है। मैं ऐसा खुला आरोप लगा रहा हूँ। इसपर कार्यवाही क्या होगी?

**एस. ए. खान :-**

मा. महापौर महोदय, आपण सकाळपासून, दहा वेळा बोलत आहात की मैं इससे सहमत हूँ, आप हर सदस्य के बात से सहमत हूँ। तो आप सिर्फ यहापर बैठनेके लिए सहमत है, कार्यवाही करनेके लिए किसके खिलाफ आपको अधिकार नही है क्या?

**मा. महापौर :-**

मैंने अभी क्या रुलिंग दिया? आप जो बोल रहे हो वह पिछली मिटींग के बारे मे बोल रहे है। मैंने अपने हिसाब से कार्यवाही की है।

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहब सहमत है और वह कार्यवाही करेंगे। उनको उसके लिए वक्त तो मिलना चाहिए ना।

**हेलन गोविंद :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलत आहे की, सन्मा. सदस्य एस. ए. खान साहेब आता बराच वेळ झालेला आहे. आणि मला वाटते की मा. महापौरांना व्यासपिठावर बसून पाच महिने झालेले आहेत. अगोदरचे सुद्धा महापौर होते. उपमहापौर होते तेव्हा त्यांनी त्यावेळेला अशी ॲक्शन घ्यायला पाहिजे होती. ते आता बसलेले आहेत व त्यांना सगळा अभ्यास करु द्या आणि त्यानंतर ते करणारच ना. सन्मा. सभागृहामध्ये बोलले आहेत की, मी सर्व सदस्यांच्या भावनांशी सहमत आहे. कारण एका अधिकाऱ्यांमुळे संपूर्ण अधिकाऱ्यांना हे ऐकावे लागते. इथे महानगरपालिकेचे जवळ जवळ चौथा टर्म आहे. इथे अधिकारी प्रामाणिकपणे काम करणारे जुने अधिकारी आहेत. परंतु, आता जे नविन अधिकारी आलेले आहेत. त्यांच्याकडून खरोखर चुकीची उत्तरे मिळतात. त्याच्यामुळे तुम्ही त्यांच्यावर लक्ष द्या. जे करणार आहेत तेच करतात. मागच्या वेळेला दोन नंतर अधिकाऱ्यांना साईडवर पाठवण्याचा जो विषय ठरवला होता त्याच्यावर आपण पुन्हा लक्ष द्या. कारण, जे प्रामाणिकपणे काम करतात त्यांना ऐकावे लागले आहे. चोर सोडून संन्यासाला शिक्षा दिली जाणार अशी या सभागृहात परिस्थिती आली आहे. कारण पुर्वी ही लोकपण पदावर होती त्यावेळेला ह्यांनी ॲक्शन घेतले नाही. आम्हांला तुम्हांला सपोर्ट करायचे आहे असे कारण असे नाही. आम्ही कोणाला घाबरत नाही. आम्ही कोणाची लाच घेत नाही. मला स्पष्ट बोलण्याची बिमारी आहे म्हणून मी स्पष्ट बोलते कुठल्याही पदाधिकाऱ्याबद्दल, अधिकाऱ्याबद्दल मी लाच घेत नाही. आणि मी कोणाची बाजू घेत नाही. जे स्पष्ट आहे ते सांगते. जे शरिराचा घात करायला बघतात त्याला मी घाबरत नाही. जो आत्माचा झाला आणि शरिराचा नाश करण्याचा अधिकार आहे. त्या परमेश्वराला मी घाबरत नाही. मला स्पष्ट बोलण्याची बिमारी आहे. म्हणून मी स्पष्ट बोलते. मा. महापौर साहेब आता जे बोलतात आणि बोलणाऱ्यांच्या चुका मी काढणार आहे. जेव्हा तुम्ही पदावर होता तेव्हा मी मान्य करते, होता तेव्हा तुम्हांला परमेश्वराने चांगली संधी दिली होती. आपण उपमहापौर होते, नगराध्यक्ष होते तेव्हा संधी असताना का केले नाही आणि आत्ताच हे सर्व का करत आहात? कारण तर आम्हांला शहराचा विकास करायचा आहे. आम्ही चांगली कामे केली आहेत. म्हणून देवाने आम्हांला हा चौथा टर्म दिला आहे आणि आम्हांला कार्य करायचे आहे. ह्या अधिकाऱ्यावर जर असा रोष करतात, त्या अधिकाऱ्यावर असा रोष करतात. अक्षरशः या अधिकाऱ्यांची परिस्थिती एवढी झाली आहे की, ते घाबरतात. कुठले काम कुठे करायचे, कसे करायचे याची त्यांना भिती वाटायला लागली आहे. त्याच्यामुळे मा. महापौर साहेब, तुम्हीसुद्धा लक्ष द्या. एखाद्या अधिकाऱ्यावर अन्याय करु नका. जे खरोखर प्रामाणिकपणे काम करतात. जे जुने अधिकारी आहेत त्यांच्यावर जरा लक्ष द्या. ह्यांनी येथून सस्पेन्डची ऑर्डर आणली त्याने तेथून सस्पेन्डची ऑर्डर आणली तर खरं म्हणजे येथे आयुक्त साहेब असायला पाहिजे. संपूर्ण मिरा भाईंदर शहराचा गोंधळ या आयुक्त साहेबांनी केला आहे आणि ते भोगायला लागते हे सर्व अधिकाऱ्यांना संपूर्ण मिरा भाईंदर शहराचे वाटोळे आयुक्त साहेबांनी केले. त्याच्या राज्यात फक्त बदली बदली आणि भुरटयांचे प्रमाण वाढले. विकासाची कामे

तर बाजूलाच राहिलेली आहेत. कितीवेळा जवळ जवळ डोंगरी ते चौक पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करायला किती वेळा मागणी केली. पण त्यांच्याकडे फंड नव्हते. जेव्हा लोक येतात तेव्हा त्यांना ताबडतोब फंड मिळतो. स्पीड ब्रेकर काढायला लावले तरी त्या लोकांनी काढले नाही. त्याची मागणी कितीवेळा होती. आता लोक येतात तेव्हा स्पीड ब्रेकर काढायला लागले आणि डांबरीकरण करायला लागले आहेत. या सभागृहामध्ये लोकांची भावना आहे त्याच्याशी आपण सहमत आहात. आपण त्यांच्यावर अगोदरचा रोष का काढता? त्यांना पण व्यासपिठावर बसू द्या. त्यांच्या पदाचा चांगल्याप्रकारे वापर करु द्या आणि मी बोलायला थांबणार नाही. जिथे मला चुकीचे दिसेल. माझी वैयक्तिक रित्या येथे पदाधिकाऱ्यांवर किंवा अधिकाऱ्यांबरोबर दुश्मनी नाही. म्हणून मी स्पष्ट बोलणार आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा. महापौर साहेब, कल उस गाडीवर जो अधिकारी था उसको बुलाऐंगे क्या?

**मा. महापौर :-**

आज के बाद जितनी भी रुलिंग है वह संबंधित अधिकारीयोंने सचिव से लेने का उसकी अंमलबजावणी करनेकी आज के बाद जितने भी रुलिंग होंगे उसपर नक्की कार्यवाही की जाएगी और नही की जाएगी तो अधिकारीयोंपर कार्यवाही की जाएगी।

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा. महापौरजी मेरी इस रुलिंग पर कार्यवाही कब होगी?

**एस. ए. खान :-**

आम्ही शहरासाठी बोलतोय, आमच्यासाठी बोलत नाही. आम्ही पण शहराच्या विकासासाठीच बोलत आहे. अधिकाऱ्यांची एवढी बाजू घेण्याची गरज काय? मान्य केले ना. आयुक्तांनी या शहराचे वाटोळे केलेले आहे.

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त साो.) :-**

मा. महापौर महोदयांच्या परवानगीने बोलत आहे की, सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेल्या विषयाप्रमाणे पुढच्या महिन्यामध्ये कार्यवाही करण्यांत येत आहे.

**शानू गोहिल :-**

उस समय के संबंधित अधिकारी को सामने बुलाईए।

**मा. महापौर :-**

जितने रुलिंग हूए है उतने को फॉलो करनेके लिए मैंने बोला है।

**चंद्रकांत मोदी :-**

पेज नं. २४ पर सेंट जोसेफ स्कूल के पास जो गॅरेज है। सृष्टी ब्रीज वहा आज एक साल हो गया है। वहा पान की तीन चार टपरी है उस बारे मे पूर्व महापौर मॅडमने आदेश दिया था की, तात्काळ काढण्यात यावे. निचे उनका जवाब भी है लेकिन आज एक साल हो गया है। अभी भी स्कूल मे पढनेवालो बच्चो को पढंने मे इतनी तकलिफ हो रही है की, सेंट जोजफ स्कूल का गेट बंद कर दिया है। उसका कोई भी कार्य नही हूआ। और जब भी किसी के घर मे या फ्लॅट मे काम चले तो नीचे मिट्टी आती है। तो तात्कालिक ऑफीसर पहूच जाता है की मेरा क्या? ऐसी बात चल रही है। सेंट स्कूल के आगे बच्चो को कितना तकलिफ होता है।

**चंद्रकांत म्हात्रे :-**

साहेब आपण आदेश द्या.

**मा. महापौर :-**

सकाळी आदेश देण्यात आलेला आहे. जेवढे गॅरेजेस ......

**चंद्रकांत मोदी :-**

साहब वह आज के आज निकलना चाहिए। सृष्टी ब्रिज के पास से गॅरेज निकालना चाहिए।

**चंद्रकांत म्हात्रे :-**

साहेब ते दोन दिवसाच्या आत काढण्यांत यावे.

**मा. महापौर :-**

काढून घेण्यात येईल.

**ओमप्रकाश दिवटे :-**

आज ताबडतोब काढून घेण्यात येईल.

**चंद्रकांत वैती :-**

पान क्र. २८ वर शिक्षण उपसंचालिका श्रीम. काकण मॅडम पाहिजे तर येथे काकड लिहिले आहे. तसेच पान क्र. २९ वर महाराष्ट्र राज्याचे शिक्षण मंत्री मा. फडके साहेब लिहिलेले आहे तर त्या जागी मा. श्री. वसंत पुरके साहेब पाहिजे.

**निर्मला सावळे :-**

पान नं. २४ वर, गेल्यावेळेस फेब्रुवारी महिन्यामध्ये जे रूलिंग दिले गेले होते. हौसींग फॉर डिसहौसींगच्या अंतर्गत आपल्या ताब्यात आतापर्यंत किती सदनिका आलेल्या आहेत. त्यावेळेस अधिकाऱ्यांनी उत्तर दिले होते की, ४१ सदनिका आपल्या ताब्यात आलेल्या आहेत. तसेच त्यानंतर सभागृहामध्ये असा ठराव ही केलेला आहे की, बेघरांना म्हणजे विस्थापित आहेत त्यांना आपण ही घरे देणार आहोत. तर सदर १०१ सदनिका आपल्याला ताब्यात मिळणार होत्या. आतापर्यंत त्या सदनिका आपल्या ताब्यात आलेल्या आहेत का? यानंतर फेब्रुवारी महिन्यात जो ठराव झाला होता त्याची अंमलबजावणी आपण कितपर्यंत केलेली आहे?

**मा. महापौर :-**

श्री. घेवारे साहेब, आपण खुलासा करावा.

**दिलीप घेवारे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, आतापर्यंत आपल्या ताब्यात १५१ घरे आलेली आहेत.

**निर्मला सावळे :-**

यानंतर, आपले जे समाज विभाग अधिकारी आहेत सुवर्ण जयंती मार्फत आपण बेघरांची लिस्ट बनवणार होतो. सन १९९५ च्या अगोदरची जी घरे आहेत त्यांची पुर्णपणे शहानिशा करून एक कमिटी नेमली होती आणि काही सदस्यांना या कमिटीवर नेमले होते आणि यामध्ये श्री. वाढोरे साहेब, श्री. संख्ये साहेब हे अधिकारी आहेत त्यांच्याकडून आपण दारिद्र्य रेषेखालील लिस्ट व १९९५ मध्ये जी घर तोडली गेलेली होती त्यांचे पुरावे सादर करून त्यांची आपण क्रमवार यादी तयार करणार होतो. ती यादी तयार झालेली आहे का?

**मा. महापौर :-**

मॅडम, जे मला माहित आहे त्याप्रमाणे मागच्या मिटींगमध्ये मी सुद्धा होतो. हा विषय मा. महासभेत परत आला होता आणि धोरण ठरले नव्हते ती ट्रान्झीट कॅम्पसाठी जागा आहे. हौसींग किंवा डिसहौसींग जे लिगल असतील ते रस्त्यात बाधीत होती त्यांना ती घरे द्यायची आहेत. त्याचे धोरण फायनल झाले नव्हते की, घरे कोणाला द्यायची आहेत?

**निर्मला सावळे :-**

नंतर आपण महासभेत ठराव केला होता.

**मा. महापौर :-**

झाले नव्हते. तो विषय पेंडींग राहिला होता. मी पण त्या मा. महासभेत होतो. तसा विषय नंतर आलेला आणि पेंडींग राहिला होता. कुठल्याही प्रकारचा ठराव झालेला नाही की, नक्की घरे कोणाला द्यायची आहेत? ट्रान्झीट कॅम्पला द्यायची की, बेघरांना द्यायची की झोपडपट्टी वासियांना द्यायची हे अजुन नक्की झालेले नाही.

**निर्मला सावळे :-**

तो विषय आपण रितसर विषय पटलावर घेवून तसा ठराव ही केलेला आहे की, बेघरांना ही घरे द्यायची आहेत. ट्रान्झीट कॅम्पसाठी असेल तर त्यावेळेस विधी अधिकाऱ्यांनी तुम्हाला का सांगितले नाही की, ही घरे ट्रान्झीट कॅम्पसाठी आहेत.

**मा. महापौर :-**

मॅडम, आपण पहिला हा ठराव केला होता. त्यानंतर आपणच तो विषय मा. महासभेपुढे परत आणला होता. आयुक्तांनी त्याच्यावर अंमलबजावणी केली नाही. कारण तो ठराव चुकीचा होता. म्हणून महासभेपुढे परत आले होते आणि आपण त्यावेळी धोरण निश्चित केले नव्हते. तो विषय आपणच परत आणला होता.

**निर्मला सावळे :-**

आपल्याकडे तसा ठराव आहे.

**मा. महापौर :-**

त्या सभेला मी ही होतो आणि माझा ही मुद्दा झाला होता.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो, ते अधिकार सभागृहाने आयुक्त साहेबांनी त्याच्यामध्ये निकष नसल्यामुळे तो ठराव परत मा. महासभेपुढे आणला होता. पण त्याच्यावर अंतिम निर्णय झाला नाही. डी.सी. रूल प्रमाणे त्याचे इंम्प्लीमेंट व्हावे अशी अपेक्षा प्रशासनाची होती.

**निर्मला सावळे :-**

आपण त्यावेळेस कमिटी स्थापन केलेली आहे.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर साहेब, माजी महापौर श्रीम. निर्मला (ताई) सावळे, या काळामध्ये त्या महापौर होत्या आज त्यांना हा प्रश्न विचारावासा वाटतो की, ह्याचे डी.सी. रूल्स मध्ये आपण जर एकंदरीत पाहिले तर आपले हे लक्षात येईल की, रस्त्याने बांधित होणाऱ्या लोकांना डिसहाउस दिले जाते. तर रस्त्याने बाधीत होणारे कोण? सरकारी जागेवर झोपड्या बांधायच्या, मुळात कसलीही परवानगी न घेता. जागा त्यांची नाही आणि त्या झोपड्या उचलल्यानंतर पुन्हा हाउस किंवा डिसहाउस द्यायचे. तसा तो नियम नाही. ज्यांची स्वतःची जागा आहे. ज्यांची मालकीची आहे त्या जागेत जर महापालिकेने एखादी योजना आखली, रस्ता रुंदिकरण झाले आणि त्याच्यात त्याची जागा गेली तर ते नियमाला योग्य आहे असे माझे म्हणणे आहे असा तो नियम आहे. कुठेतरी अवास्तव झोपड्या बनवायच्या आणि मग आम्हाला उचलले, बाधीत झाले व आता आम्हाला घर द्या. तसे ते हाउस - डिसहाउसमध्ये बसत नाही.

**निर्मला सावळे :-**

ह्याच्यामध्ये म्हटलेले आहे आपण पात्र झोपडपट्टीधारकांना म्हणतोय.

**जयंत पाटील :-**

पात्रचा विषय वेगळा आहे.

**निर्मला सावळे :-**

नियमानुसार येथे रूलिंग दिलेली होती.

**जयंत पाटील :-**

पात्र झोपड्या ह्या १९९५ च्या झोपड्या जे शासनाने मंजुर केलेल्या आहेत. पण ते हाउस-डिसहाउसमध्ये बसत नाही.

**मा. महापौर :-**

मॅडम, ते त्याच्यात येत नाही. आपण जसे सांगितले की, रितसर प्रस्ताव आणू.

**निर्मला सावळे :-**

त्याप्रमाणे ठराव पारित केला होता व पुढच्या मा. महासभेमध्ये आपण तसा रितसर विषय घ्या.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पान क्र. ३३ मध्ये तत्कालिन मा. महापौरांचे रूलिंग आहे. प्रकरण क्र. ११५,११६ हे दोन्ही विषय आपल्या मा. महासभेपुढे आलेले आहेत. परंतु, त्याला प्रशासनाचा गोषवारा नसल्यामुळे प्रशासनाचा गोषवारा लवकरच प्राप्त होईल आणि पुढील महासभेमध्ये विषय घेण्यात येईल. असे महापौरांनी आपल्या डायसवर निकाल दिला. रुलिंग दिले. त्यानंतर पुढचे सर्व १२१ पर्यंत प्रकरण चालत आली. त्यानंतर शेवटला १२३ प्रकरण सुद्धा झाले. त्यानंतर दि. १६/०४/२००७ ला मा. महासभा झाली. वास्तविक पाहता महापौरांच्या रूलिंगच्या नुसार ह्या सभेमध्ये सगळ्यात पहिला प्रकरण क्र. ११५,११६ यायला पाहिजे होते. परंतु तसे न होता आपण सालाबादप्रमाणे एखादा कार्यक्रम चालू असतो त्यानुसार ही जी दि. १६/०४/२००७ ची सभा आहे त्याच्यात व्यवस्थित सोयीस्कर प्रमाणे ही प्रकरणे बाजूला ठेवली गेली. पुढच्या प्रकरणाचे क्रमांक देवून त्याची संपुर्ण कार्यवाही पुढच्या प्रकरणामध्ये सुरू केली आणि ती प्रकरणे रीतसर बाजुला ठेवून पुढील ठराव सुद्धा पारित झाले. तर प्रकरण क्र. ११५,११६ हे जे विषय आहेत. परिवहन उपक्रम वगैरे, डेपोची जागा अत्यावश्यक विषय पण प्रशासनाला हे वाटले नाही व परिवहन विभागाला ही वाटले नाही. आमची प्रकरणे या महासभेत तहकूब झाली ती पुढच्या महासभेत आली पाहिजे. परिवहनचे जे कोणी उपायुक्त होते. परिवहनचा जो स्टाफ आहे तर आपण जवळ जवळ नगरभवनला ३५ ते ४० लाख रू. खर्च करून तोट्यात परिवहन सेवा चालू असून सुद्धा डबघाईला आलेली असून सुद्धा आपण त्यांना ४५ लाख रूपये खर्च करून नुसती बसायची सोय करून दिलेली आहे. राज्याचा मुख्यमंत्रीसुद्धा एखाद्या आलीशान ऑफिसमध्ये बसू शकत नाही. बसत नाही. आय.एस.ए. ऑफिसरसुद्धा अशा एवढ्या आलीशान ऑफिसमध्ये बसलेला पाहिलेले नाही. तरीसुद्धा एवढ्या सोयी देवून सुद्धा त्या अधिकाऱ्याने आपल्याला कुठेही एक इनफॉरमेशन दिलेली नाही की, साहेब आमच्या ठरावाच्या प्रस्तावाचे काय झाले आणि आपण सोयीस्करपणे ते प्रस्ताव बाजूला ठेवून ही

जी पुढची मिटींग आहे. दि. १६/०४/२००७ यामध्ये ही प्रकरणे आणली नाहीत. त्या कारणाने महत्वाचे ठराव पास होउ शकले नाहीत. याबद्दल आपला काय खुलासा? आपल्याला काय अडचण होती?

**नगरसचिव :-**

मा. महापौरांचे रूलिंग होते, संबंधित विभागाने गोषवारे द्यावेत.

**मिलन म्हात्रे :-**

बरोबर आहे. त्यांनी गोषवारे दिले नाही. आपण गोषवारे मागितले नाहीत.

**नगरसचिव :-**

गोषवारे त्याच लोकांनी द्यायला पाहिजे होते.

**मिलन म्हात्रे :-**

डायसवर ज्यावेळेला रूलिंग होते, त्यावेळेला सभागृहातील जे कोण सदस्य आहेत. सन्मा. आमचे अधिकारी वर्ग आहेत. त्याच्यात कनिष्ठ वगैरे सर्व आले या लोकांना ती रूलिंग लागू असते. एखादा अधिकारी जर गैर हजर असेल तर त्याला ते कळविले जाते. सचिव कार्यालयातून कळविले गेले पाहिजे की, असे असे प्रकरण आपल्या विभागाचे आले होते. त्याच्यावर मा. महापौरांनी असा असा निर्णय दिलेला आहे. तर आपला गोषवारा यावेळेला आला नव्हता. ते पुढच्या मिटींगमध्ये आम्हाला मांडायचे आहे. कारण मा. महापौरांच्या आदेशाचे पालन आम्हाला करायचे आहे. आपल्या सचिव कार्यालयातून ही गोष्ट का झाली नाही?

**नगरसचिव :-**

त्यावेळी सभागृहात संबंधित अधिकारी होते.

**मिलन म्हात्रे :-**

तरीसुद्धा सचिव कार्यालयातुन आपण त्यांना इनफॉरमेशन देवून त्यांचा गोषवारा मागवला पाहिजे होता. माझे असे म्हणणे आहे की परिवहनचे त्यावेळेला कोण अधिकारी होते? अजिज शेख साहेब गेले म्हणजे परिवहन बंद झाला हा त्याच्यातला भाग नाही. त्या लोकांना हा गोषवारा पुढच्या मिटींगला का दिला नाही? विदाउट गोषवारा ही मिटींग संपन्न कशी झाली? त्याच्यात तुम्ही प्रकरणेच घेतली नाही. ती तुम्हाला पान नंबर सांगतो. पान क्र. ३३ वर मा. महापौरांचे रूलिंग आहे. त्याच्याखाली तुमची १२६ नंबरची प्रकरण आली. ही सभा शेवटची आहे. दि. २०/०२/२००७ ची सभा आहे त्याच्यात शेवटी जे प्रकरण क्र. १२४ आले त्यानंतर परिवहनचे गोषवारे या मिटींगमध्ये यायला पाहिजे होते. परिवहनचे अधिकारी कोण आहेत त्यांना खुलासा करायला लावा? त्यांची पॉवर ऑफ ॲटर्नी आपण घेउ नका. त्यांना नगररचना तर्फे काय आले नाही का? हा जागेचा विषय आहे नगररचना आणि परिवहन यांनी संयुक्त विद्यमानाने कार्यवाही केली नाही का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

प्रकरण क्र. ११५ व ११६ बाबत, परिवहन समितीने निर्णय घेउन मा. महासभेला निर्णयासाठी त्यांचे ठराव शिफारस केलेले होते. तत्कालिन मा. महासभेमध्ये चर्चा होत असताना या विषयाला गोषवारा नाही म्हणून चर्चा झालेली नाही. सन्मा. श्री. घेवारे, टाउन प्लॅनर, ए.डी.टी.पी. प्रभारी यांच्याशी चर्चा झाली असता त्यांनी यानंतरच्या सभेत जी सभा झाली त्याच्यात गोषवारे दिले असे सांगितलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आपण परत एकदा या सभागृहाची दिशाभुल करत आहात. या प्रोसिडिंगमध्ेय पुढे प्रकरण क्र. १ सुरु झालेला आहे हे नीट लक्षात घ्या.एवढे मोठ आम्हाला बार्ड देतात. मी पान आणि पान वाचतो रात्री दोन तीन वाजेपर्यंत जागुन त्रास आम्हाला होतो. दिवसभर कामाचे व्याप करुन नाईटला जागायचे व परत सकाळी लवकर उठायचे आणि हे शांत समयी वाचत बसायचे तेव्हा तुमच्या ह्या क्वेरीज आम्हांला पकडता येतात पुढच्या मिटींगमध्ये आपण प्रकरण क्र. १ सुरु केले आहे पान नं ५१ वर प्ररकण क्र. २ सुरु झाले त्याच्यापुढे तुमची सिरीयल बदलली मग आपण प्रकरण क्र. ११५ चा पहिला निकाल दिला पाहिजे की, नाही त्यानंतर ११६ चा निकाल दिला पाहिजे. मग आपले प्रकरण क्र. १, २ असे सुरु झाले पाहिजे.

**नगरसचिव :-**

नविन वर्ष म्हणजे एप्रिल महिन्यापासुन प्रकरण क्र. १ सुरु होते.

**मिलन म्हात्रे :-**

मी नंबराचे बोलत नाही मी त्या प्रस्तावाचे आणि प्रकरण बोलत आहे. आपण परिवहनाच्या विषयाला एक नंबर दिला असता तर काय बिघडले असते का? इन ब्रॅकेट सदर प्रकरण एक हे पुर्वीच्या ११५ प्रकरणाचे वाचन झाले असे आपण बोलु शकत होता प्रश्न एक आणि एकशे पंधराचा नाही. असा महत्वाचा प्रश्न आहे की, परिवहन सेवा सुरु झाली आहे. त्याच्या गाड्या बेवारशा सारख्या कुठेही ठेवल्या जातात. त्याची कार्यशाळा त्याच डेपो या जागाची आवश्यकता असतांना सुध्दा प्रशासनाकडुन परिवहनकडुन याचा रितसर गोषवारा आला

नाही. सभेचा वेळ त्या अधिकाऱ्यांनी फुकट घालवला अधिकाऱ्यांनी त्यांची संपुर्ण इंतभुत माहिती आपल्या प्रशासनाकडे आपल्याकडे घ्यायला पाहिजे होती ती संक्षिप्त माहिती आपल्याला द्यायला पाहिजे तसे त्यांनी पुढच्या मिंटीग मध्ये सुध्दा केले नाही. त्याबद्दल प्रशासनाचे म्हणणे काय? तुमच्याकडे जर माहिती नव्हती तर विषय आणायला नको होता आणि जर विषय आणला तर माहिती द्यायला पाहिजे तुम्हांला एक महिन्याचा अवधी दिला होता संपुर्ण सभागृहाने तुम्ही केलेल्या विनंतीला मान देवुन मा. महापौरांनी जे रुलिंग दिले त्याचा मान ठेवुन आम्ही आपल्याला एक महिन्याचा अवधी दिला त्यानंतर पण काहीच नाही. महापौरांच्या रुलिंगला अगदी कसतरडे कर्मचारी आपल्याला काहीच किंमत देत नाही हे या सभागृहात प्रत्येक मिटींगमध्ये परत परत उघड होते.

**मा. महापौर :-**

गोषवारे मागवलेले आहेत. तोपर्यंत आपण पुढचे पेज घेउ घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब हा रितसर रेग्युलर आलेला विषय विषयपत्रिकेवरचा आहे. विषयपत्रिकेवर एकदा विषय येतो. त्याला आपण बांधिल असतो. त्या विषयाचा ठराव झाला पाहिजे किंवा तो विषय फेटाळला गेला पाहिजे. एक नाही तर दोन विषय आहेत आणि ते ही महत्वाचे माझा सांगण्याचा दृष्टीकोन असा आहे की, प्रशासनाला त्याचे काय महत्त्व पटत नाही आपण या दोन विषयाकरिता सभागृहाचा एवढा मोठा कालावधी घेतला मा.महापौरांनी रुलिंग दिलेली आहे ॲक्च्युअल त्याला रेड पॅक लावुन सचिवांनी तशी पुढची कार्यवाही करण्यासाठी त्यांना बोलावुन वॉर्डफुटरवर काम करुन घेतले पाहिजे. आता येईल पण आज विषयपत्रिकेवर तो विषय नाही त्यांतरच्या मिटींगमध्ये रेग्युलर विषयपत्रिकेवर विषय आणायला पाहिजे होता.

**मा. महापौर :-**

पण त्यांनतर अजुन चार मिटींग झाल्या ना.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौरांनी रुलिंग काय दिले आहे. पुढचा मिटींगला असे शब्द आहे. त्यामुळे जी पुढची मिटींग आहे त्याचीची गोष्ट करणार पुढे दहा मिटींग होउ दे मा. महापौर साहेब, आजच्या सभेमध्ये सुध्दा या प्रोसिंडिगला मंजुरीच्या व्यतिरिकत महत्त्वाचा असा कुठलाच विषय नाही. आज वर्तमानपत्रात ही अशाच बातम्या आहेत की, इतिवृत्तांताला मंजुरी देणारी महासभा आणि त्या मिटींगमध्ये पण ते घेउ शकत होते ना विषयच नव्हता.

**मा. महापौर :-**

जी रुलिंग झालेली आहे त्यानंतर दोन तीन मिटींग झाली त्याच्या मुळे ते आलेले नाही. पुढच्या मिटींगमध्ये गोषवाऱ्यासहित तो विषय मी घेवुन येतो.

**मिलन म्हात्रे :-**

ते अधिकारी कोण आहेत.त्यांची नाव डिक्लर करा.

**मा. महापौर :-**

कोणाची?

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी त्यावेळेला एक महिन्याची रुलिंग देवुन सुध्दा हेतु परस्पर पणे प्रशासनाला.....

**मा. महापौर :-**

पण विषय आणण्याचा अधिकार हा मा. महापौरांचा असतो ना. पण त्यावेळी पुढच्या तीन मिटींगमध्ये विषय आला नाही.

**मिलन म्हात्रे :-**

सगळ्यात पहिले मा. महापौरांचा अधिकार असतो. एकदा डायवर विषयपटलावर विषयपत्रिका आली की, तो महापौरांचा अधिकार नसतो. तो सभागृहाचा अधिकार असतो.

**मा. महापौर :-**

आपण म्हणता ना विषय पुढच्या मिटींगमध्ये आणायचा होता

**मिलन म्हात्रे :-**

नाही नव्याने जर विषय असेल आणि तो आला तिथपर्यंत साहेब विषयपत्रिका बनवण्याचे तुमचे अधिकार आहेत पण विषयपत्रिका एकदा सभागृहाच्या पटलावर आली तर तो विषय सभागृहाचा झाला. तुम्ही त्याच्यावर रुलिंग दिलेले आहे. म्हणजे त्यावेळेच्या तत्कालिन महापौरांनी तो महापौराच्या हातातुन मुद्दा निघुन गेलेला आहे.

**मा. महापौर :-**

आता विषय परत आणता येईल पण त्या व्यतिरिक्त अजुन काय करता येईल का?

**मिलन म्हात्रे :-**

माझे म्हणणे आहे मी, जे हे म्हणतोय त्याचा आम्हांला परत परत त्रास नको. रुलिंग होतात त्याला मान नसतो आपण अधिकाऱ्याला उभे करुन विचारा ना.

**मा. महापौर :-**

आता एकच ठरवले आहे जी काय रुलिंग होईल ती रुलिंगची कॉपी प्रत्येक अधिकाऱ्याने घ्यायची आणि त्याच्यावर अमंलबजावणी कराचची.

**मिलन म्हात्रे :-**

हा जो विषय आहे तो परिवहन आणि नगररचना या दोघांना संलग्न आहे दोन्ही अधिकारी उपस्थित असतील तर त्यांनी ह्याच्यात डिक्लर करावे की, त्यावेळेला काय अडचण होती? त्यांनी सभागृहाला तसा खुलासा करावा. त्यांनतर मग गोषवारा येउ द्या.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे विषय दिले किंवा नाही. त्याच्यावर आपण सहा महिने मागे जाणार त्यापेक्षा पुढच्या मिटींगमध्ये आपण तो विषय आणु या बाकी जी दुरुस्ती आहे ती सुचवा

**मिलन म्हात्रे :-**

माझे असे म्हणणे आहे की, वेळोवेही ज्या चुका करणारे अधिकारी आहेत.....

**मा. महापौर :-**

पण ती बॉडी वेगळी होती.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही आणि आम्ही ना आपण होतो त्यांनी गोषवारा दिला नाही त्यामुळे त्यांना आम्ही क्षमापन करतो. हा निकाल देवून टाका. आम्ही ॲक्सेप्ट करतो . म्हणजे हेही कळू द्या. अधिका-यांनी वारंवार चुका करुन तुम्ही त्यांना क्षमापन करता. अन्यथा त्यांना उभे राहून या सभागृहापुढे सांगु दया की, आम्हांला काय अडचण होती? मला ते म्हणायचे आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

नगररचना विभागाकडून याचे गोषवारे येणे अपेक्षित होते. त्या सभेमध्ये सन्मा.महापौरांनी तसे निर्देश दिलेले होते आणि ते गोषवारे दिले की नाही याची खात्री करण्यासाठी ते अभिलेखे तपासत आहेत त्याला पाच मिनिटे लागेल.

**मिलन म्हात्रे :-**

चालेल.

**मा. महापौर :-**

तो पर्यंत पुढचे पेज नंबर घ्या.

**नयना म्हात्रे :-**

पान क्र. ३९ मध्ये 'ज' प्रस्ताव आणून उठसुट नगरसेवक याला परमनन्ट करा, त्याला प्रमोशन द्या. याला घरी बसवा. याला माझा विरोध नोंदवा. कारण माजी नगरसेवक श्री. रोहित सुवर्णा यांचा देखिल विरोध होता आणि याला माझा देखील विरोध होता.

**मा. महापौर :-**

त्याच्यात दुरुस्ती आहे का ? काय समाविष्ट करायचे आहे.

**नयना म्हात्रे :-**

दुरुस्ती नाही. साहेब आपण बघा आपल्याकडे पेपरला जाहिरात आली की, दोन कर्मचारी ड्रायव्हरमध्ये परमनन्ट करायचे आहेत आणि चार कर्मचा-यांची कोर्टामध्ये केस चालू होती . आणि तो कर्मचाऱ्यांना परमनन्ट केले व त्या दोन कर्मचा-यांना तसेच ठेवले. म्हणून 'ज' प्रस्ताव आणून नगरसेवक याला प्रमोशन द्या, त्याला प्रमोशन द्या असे करतात तर याला माझा विरोध आहे ते आपण याच्यात नमुद करा.

**हेलन गोविंद :-**

मॅडम, आम्हांला ते वाचून सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, हा ठराव सर्वानुमते मंजुर झालेला आहे.

**मा. महापौर :-**

हे चुकीचे आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

पान क्र.४० मध्ये, माझा एक ठराव आहे. ड्रायव्हर लोकांचा विषय होता. आपण ती चार पद निर्माण करुन कायमस्वरुपी करायचे होते. त्यांना तसे करुन घेतले का? त्या विषयाला आज बरोबर दहा महिने झालेले आहेत. ते चार ड्रायव्हर सन १९९४ पासून आपल्याकडे ड्रायव्हर म्हणून काम करत होते. त्यांची ती चार पद मंजूर करुन आपण त्यांना कायम केले का ?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

वाहन चालकाचे आस्थापनेवर मंजूर पदापैकी दोन पद रिक्त झाली होती आणि निवड समितीने त्या दोघांना त्याच्यामध्ये सामावून घेतलेले आहे व जे दोन राहिले आहेत. यथावकाश त्याच्यामध्ये जे अकार्यक्षम ड्रायव्हर आहेत त्यांना इतरत्र काम देवून ती कार्यवाही केली जाईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्यांना लिपिकमध्ये घेता येईल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

होय.

**प्रेमनाथ पाटील :-**

धन्यवाद.

**नगरसचिव :-**

पुढचे दि. १७/३/०७ चे इतिवृत्तांत आहे.

**हेलन गोविंद :-**

मा. महापौर साहेब, मला बोलायचे आहे. प्रकरण क्र. १२ व १३ या विषयावर बोलायचे आहे. आपण मला परवानगी द्या. इतिवृत्तांताला धरूनच आहे.

**शशिकांत भोईर :-**

या इतिवृत्तांतामध्ये पान क्र. ५ खाली माझ्या संभाषणामध्ये, सन्मा.सदस्य मै चुपचाप बैठा हु ना तो वहा बोलूँगा तर वह बोलूँगा असे करा.

**हेलन गोविंद :-**

सन्मा. महापौर साहेब, या सभागृहामध्ये दि. ८/६/०७ रोजी प्रकरण क्र. ४१ या शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे एस.ई.झेड वर विचारविनिमय करण्याबाबत ठराव क्र. १३ मंजूर केला होता या ठरावाप्रमाणे एस.ई.झेड बाबत शासनाचे स्पष्ट धोरण काय आहे ? याबाबतची माहिती शासनाकडून मागवणार होतो. त्याचे काय झाले? शासनाने आपले महापालिका हद्दीतील आठ गावे, मुंबई महानगरपालिका हद्दीतील दोन गावे असे एकंदरित १० गाव एम.एम.आर.डी.ए. कडून महाराष्ट्र राज्य पर्यटन मंडळाकडे वर्ग केले आहेत. पर्यटन महामंडळ म्हणजे महाराष्ट्र सरकार या १० गावात एस.ई.झेड पर्यटनावर अधारित उद्योगधंदे निर्माण करण्यासाठी श्री. सुभाषचंद्र गोईल यांच्या पॅन इंडिया या पर्यटन कंपनी बरोबर वाटाघाटी करित आहे. असे समजते. एस.ई.झेड मुळे आमचे मच्छीमार शेतकरी, बागायतीदार व मिठागरवाले यांच्या उपजिविकेचे साधन निघुन जाणार. लोकांचे करोडो रूपयाचे नुकसान होणार कारण सरकार कायद्याचा वापर करून १० गावातील जमिनी ताब्यात घेणार एस.ई.झेड. बद्दल लोकांच्या मनात प्रचंड भिती व असंतोष निर्माण झाला असुन हा निर्णय घेतेवेळी सरकारने महापालिकेचे मत सुद्धा विचारात घेतले नाही या प्रकल्पाबाबत शासनाचे स्पष्ट धोरण काय आहे व या प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती पर्यटन महामंडळाने येथील जनतेला देणेबाबत महापालिकेने विना विलंब शासनाला कळवावे. साहेब, आपण आम्हाला माहिती देणार होता त्याचे काय झाले? आम्हाला माहिती द्या.

**मा. महापौर :-**

शेवटी चर्चा करू या. आता यामुळे पुर्ण प्रोसिडींग डिर्स्टब होते.

**हेलन गोविंद :-**

साहेब, आम्हाला नंतर शेवटला बोलायला मिळत नाही. म्हणून आपण आम्हाला याबाबत आता माहिती द्या. कारण प्रोसिडींगला ते आहे.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर साहेब, प्रोसिडींग है यह हम मानते है। लेकीन इससे पहिले जो प्रश्न उठाया उसका जवाब आपने दिया ना। तो आप इसका भी जवाब दिलीए।

**हेलन गोविंद :-**

साहेब, आम्हाला यावर याचे उत्तर पाहिजे.

**मा. महापौर :-**

एस.ई.झेड का विषय पहिले भी आया था। मिटींग के बाद पुरे विषय होने के बाद उसपर चर्चा करेंगे। प्रोसिडींग को डिर्स्टब हो रहा है। हम इसमे प्रोसिडींग मे चेंजेस कर सकते है क्या?

**हेलन गोविंद :-**

सन्मा. महापौर साहेब, आपण चेंज करू नका पण आम्हाला याचे उत्तर द्या.

**बर्नड डिमेलो :-**

आम्हाला उत्तर नको आम्हाला एस.ई.झेड. बद्दल सर्व माहिती पाहिजे.

**हेलन गोविंद :-**

साहेब, आपण अधिकाऱ्यांना माहिती द्यायला सांगा त्याशिवाय आम्ही सभा चालू देणार नाही. कारण आमच्या लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे व असंतोष पसरला आहे. आम्हाला नागरिकांना तोंड द्यावे लागते आणि आमच्या नावाची बदनामी चालू आहे त्यामूळे आम्हाला उत्तर पाहिजे.

**बर्नड डिमेलो :-**

हा अत्यंत ज्वलंत विषय आहे.

**मा. महापौर :-**

मी कुठे नाही बोलतो.

**हेलन गोविंद :-**

साहेब, तुम्हाला माहित नाही या महापालिकेमध्ये कुठला अंधाधुदी कारभार चालवलाय ना हे मी येथे स्पष्टपणे बोलते. मी तुम्हाला अगोदरच बोलली आहे की, मी ते बोलायला घाबरत नाही. जिथे चुकत असेल तिथे मी बोलणार कारण मी कोणाला घाबरत नाही. म्हणून सांगते मला याचे उत्तर पाहिजे.

**बर्नड डिमेलो :-**

मा. महापौर साहेब, हा ज्वलंत विषय आहे. मला वाटते येथील नगरपालिकेतील नगरसेवक आहेत त्यापैकी किती नगरसेवकांना माहित आहे त्याची मला कल्पना नाही.

**हेलन गोविंद :-**

इथे ठराव काय होतात ते कळतच नाही.

**बर्नड डिमेलो :-**

या महापालिकेत किती नगरसेवकांना एस.ई.झेड. बद्दल माहिती आहे याची मला कल्पना नाही. मला तर नाहीच नाही. गेल्यावेळेला मा. रोहिदास पाटील यांनी विषय मांडला होता त्याला श्री. खतगांवकर साहेबांनी उत्तर दिले होते.

**हेलन गोविंद :-**

आता सभागृहात सन्मा. नगरसेवक प्रफुल्ल पाटील साहेब, येथे नाही जर ते असते तर त्यांनी तुम्हाला आण्खिन प्रश्न विचारले असते. त्यांनी सुद्धा हा प्रश्न मांडलेला आहे. त्यांनी तुम्हाला चांगलेच धाऱ्यावर धरलेले होते पण आज सुदैवाने ते इथे नाही. सुदैवाने म्हणावे किंवा दुर्दैवाने त्यांनी तुम्हाला प्रश्न विचारले असते.

**बर्नड डिमेलो :-**

आपण कागदोपत्री काय माहिती घेतलेली आहे याची माहिती द्यावी. श्री. खतगांवकर साहेब व श्री. घेवारे साहेबांनी याची माहिती द्यावी.

**मा. महापौर :-**

आपण एस.ई.झेड. विषयावर पुर्ण रितसर चर्चा करूया.

**हेलन गोविंद :-**

साहेब, चर्चा चर्चा काय? आम्हाला चर्चा करायला थांबायचे नाही. अधिकाऱ्यांना सांगून झाले आणि आता चर्चा करण्यासारखा हा विषय राहिलेला नाही. १६ तारखेला रस्त्यांवर किती मोठे आंदोलन झाले तेव्हा तुम्ही आला नव्हता.

**बाविघर सिसीलिया :-**

म्हणजेच चर्चा करून तुम्ही आमचे गाव त्यांना देणार आहात का?

**बर्नड डिमेलो :-**

मला एवढेच बोलायचे आहे की, श्री. घेवारे साहेब आणि श्री. खतगांवकर साहेबांनी ही माहिती पुढच्या मिटींगला पुरवू असे उत्तर दिलेले आहे. तर याची काय माहिती घेतली ते मा. महासभेसमोर मांडावे. तुम्ही हा विषय थांबवू नका.

**हेलन गोविंद :-**

साहेब, तुम्ही हा विषय थांबवू नका. कारण तुम्हाला माहित नाही आम्हाला पब्लिकला तोंड द्यावे लागते.

**बाविघर सिसीलिया :-**

या विषयावर काय आहे त्याची आम्हाला नक्की माहिती द्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तत्कालिन सभेमध्ये एस.ई.झेड. या विषयावर भरपूर चर्चा झाली होती आणि प्रशासनाला जितकी माहिती होती ती सर्व माहिती सभागृहासमोर मांडली होती. त्यावेळेस सभागृहाचे त्यावर समाधान झाले नव्हते. त्यामध्ये प्रशासनाने जास्तीची माहिती उपलब्ध करून सभागृहासमोर मांडावी. झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने प्रशासनाकडून आपले प्रभारी ए.डी.टी.पी. श्री. घेवारे साहेब आहेत त्यांना मी स्वतः आदेश काढले होते आणि ती माहिती संकलित करुन सभागृहासमोर मांडावे याकरिता निर्देश दिले होते. त्यापध्दतीने त्यांनी माहिती जमा केलेली आहे. पण हायकोर्टाची काय तारीख निघाली म्हणून ते मा. महापौरांची परवानगी घेउन तात्काळ गेले आहे व ते फोनवरुन बोलत आहेत. ती माहिती आणलेली आहे व निश्चितच आपल्यासमोर मांडण्यात येईल.

**हेलन गोविंद :-**

साहेब, आपण या विषयाकरिता संपूर्ण नगरसेवकांना विश्वासात घ्या. तुमच्यापुरती माहिती ठेवू नका. आमच्यापर्यंत माहिती पोहचवा. एवढीच तुम्हांला विनंती आहे.

**बर्नड डिमेलो :-**

जी माहिती आहे त्याची प्रत आम्हाला पाहिजे. उत्तरामध्ये काय काय होणार आहे? आपल्या मिरा भाईंदर शहराच्या हद्दीमध्ये काय होते आणि आपल्याला माहित नाही.

**मिलन पाटील :-**

आयुक्त साहेब, ही दि. २०/१२ ची मिटींग आहे. आज ही २०/१२ आहे.

**हेलन गोविंद :-**

साहेब, किती वेळ झाली तरीही तुमच्याकडे अजून माहिती गोळा होत नाही.

**मिलन पाटील :-**

साहेब, ही सभा झाली ती गेल्यावर्षीची दि. २०/१२ ची सभा होती आणि आजसुध्दा दि. २०/१२ आहे. एक वर्ष झाले. प्रशासनाने काय केले? पुढच्या मिटींगमध्ये माहिती देतो म्हणून असे सांगितले होते.

**हेलन गोविंद :-**

अजून माहिती उपलब्ध होत नाही म्हणजे काय? एवढा वेळ कशासाठी?

**बर्नड डिमेलो :-**

आपण एवढ्या वर्षात काय माहिती घेतली ती येथे कळवावी व वाचून दाखवावी.

**हेलन गोविंद :-**

येथे सभागृहामध्ये असलेले सर्व आगरी, कोळी सदस्य आहेत आणि सर्वांना लोकांची कळकळ आहे. म्हणून आम्हाला माहिती हवी आहे.

**बर्नड डिमेलो :-**

पूर्ण माहिती दिल्याशिवाय हे करायचे नाही.

**हेलन गोविंद :-**

राई, मोर्वा, डोंगरी, तारोडी, उत्तन, पाली, चौक.

**मिलन पाटील :-**

आज एक वर्ष झालेले आहे तरी आपण सभागृहाला याची माहिती दवू शकत नाही.

**सिसिलीया बावीघर :-**

आज आम्हाला प्रत्येक नागरीक प्रश्न विचारत आहे की, एस.ई.झेड. म्हणजे काय?

**अनंत पाटील :-**

मा. महापौर महोदय, मी तुम्हाला एस.ई.झेड.बद्दल सांगतो. आता जवळ जवळ ८ हेक्टरचा प्लॉट आपण लॉ कॉलेज ॲकेडमीसाठी दिला गेलेला आहे. येथे त्याचे आरक्षण होते का? त्या ८ हेक्टर जागेमध्ये आपण जवळ जवळ २ कोटी रुपयाचे वृक्षारोपण केलेले होते आणि त्या वृक्षारोपणात किती झाडे लावली? ती झाडे तिथे तोडली गेलेली आहेत. ॲकेडमी म्हणजे सर्वोच्च न्यायालय तिथे वसते आहे. तीच कायद्याचा भंग करते. झाडे तोडली जातात आणि सामान्य माणसांनी जर घरं बांधली तर ती तोडली जातात. या संदर्भामध्ये आपण सांगा.

**बर्नड डिमेलो :-**

मला त्या विषयावर बोलायचे नाही. कॉलेजचे जे काम आहे त्याबद्दल बोलायचे नाही. एस.ई.झेड.बद्दल बोलायचे आहे. सन्मा. सदस्य आपण विषय बदलू नका.

**हेलन गोविंद :-**

सरकार सांगते की, ''झाडे लावा झाडे जगवा'' आम्ही कॉलेजमध्ये असताना त्या जागेवर आमच्या हाताने झाडे लावली होती आणि हा सर्व अंदाधुंदी कारभार चालू आहे. जनतेचे काय हित बघितले जात नाही.

**बर्नड डिमेलो :-**

तो एस.ई.झेड.चा विषय नाही.

**हेलन गोविंद :-**

३०-३० वर्षे झाली तिथे लोकवस्ती होती. त्यालोकांना आम्हाला सांगायला सांगते. लोकांचा रोष आमच्यावर आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने, पूर्ण महाराष्ट्रामध्ये अति उच्च दर्जाचे याठिकाणी शासकीय संस्था स्थापन होत आहे आणि ती पूर्ण जागा शासनाच्या मालकीची होती आणि शासनाने त्याठिकाणी धोरणात्मक निर्णय घेतला.

**बर्नड डिमेलो :-**

साहेब, विषयांतर करु नका.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

विषयांतर नाही.

**हेलन गोविंद :-**

सन्मा. सदस्यांनी तिथे कोर्टासाठी कितीवेळा मागणी केलेली आहे. पण ती मागणी पूर्ण केलेली नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याठिकाणी ती झाडे तोडलेली आहेत.

**बर्नड डिमेलो :-**

एस.ई.झेड.बद्दल सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सदर विषयाची माहिती विचारली म्हणूनच मी सांगतोय. सार्वजनिक बांधकाम विभागाला रितसर परवानगी दिलेली आहे आणि त्यांनी ती झाडे तोडलेली आहेत.

**हेलन गोविंद :-**

म्हणजे झाडे तोडण्याची परवानगी त्यांना आहे. साहेब, आपण आम्हाला एस.ई.झेड.बद्दल माहिती द्या.

**बर्नड डिमेलो :-**

आणि जर महानगरपालिकेला त्याची माहिती नसेल तर मला वाटते की, पुढची काम करुन काय उपयोग नाही. तोपर्यंत आम्ही सभा चालू देणार नाही.

**मा. महापौर :-**

एस.ई.झेड.बद्दल आतापर्यंत काय काय कार्यवाही झाली? त्याच्यामध्ये आपल्याला काय रिप्लाय आला? आपण काय केले?

**बर्नड डिमेलो :-**

मा. महापौर साहेब, आम्हाला कार्यवाही काय झाली ते नको. जर आपल्या महानगरपालिकेच्या मालकीच्या हद्दीमध्ये काय घडले आणि काय घडणार आहे? हे जर आपल्या महापालिकेला माहित नसेल तर या मा. महासभेचा अर्थ काय?

**मा. महापौर :-**

आपल्याला उद्या सकाळी पूर्णपणे रितसर माहिती देतो.

**बर्नड डिमेलो :-**

आज का मिळणार नाही? याला वर्ष झाले आहे.

**हेलन गोविंद :-**

साहेब, याला याच विषयावर बोलून बरोबर एक वर्ष झाले.

**बर्नड डिमेलो :-**

त्याची आपण अजून माहिती देत नाही. मा. महापौर साहेब, आपण अधिकाऱ्यांना सहकार्य करत आहात असे मला वाटते.

**मा. महापौर :-**

अधिकाऱ्यांना सहकार्य करण्याचा प्रश्न कुठे येतो?

**बर्नड डिमेलो :-**

अधिकाऱ्यांना उत्तर देवू द्या. तुम्ही बोलू नका.

**हेलन गोविंद :-**

साहेब, आम्हाला माहिती पाहिजे. कारण जनेतचा रोष आमच्यावर आहे. त्यालोकांनी आमच्यावर आरोप केलेला आहे की, तुम्ही पैसे खाल्ले आणि तुम्ही त्यांचे साथीदार आहात. आम्हाला हे सर्व जनतेचे ऐकायला लागते. म्हणून आम्हांला माहिती पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्यांना मी सांगू इच्छितो की, हा एस.ई.झेड. विषय आपल्या महापालिकेचा नाही आणि महापालिका सदस्यावर जनतेने आरोप करण्याचे काही कारण नाही.

**सिसिलीया बाविघर :-**

मग हा विषय कोणाचा आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

महापालिका सदस्यावर जनतेने आरोप करण्याचे काही कारण नाही. हा विषय शासनाचा आहे. आपल्या महापालिकेचा तो विषय नाही.

**अनंत पाटील :-**

हा विषय शासनाचा कसा काय होईल? शासनाचा विषय म्हणजे कोणाचा? शासन कुठले?

**बर्नड डिमेलो :-**

हा विषय शासनाचा जरी असला, तरी तो महापालिकेच्या हद्दीत आहे.

**हेलन गोविंद :-**

साहेब या प्रोसिडींगला मंजूरी कशी काय मिळाली?

**सिसिलिया बाविघर :-**

महापालिकेच्या हद्दीत आहे म्हणजे तो विषय महापालिकेचा आहे ना.

**मिलन पाटील :-**

हे असे नाही. ते आपल्यावरचे घोंगड दुसऱ्यावर टाकत आहेत. श्री. खतगांवकर साहेब म्हणणे तुमचे आहे ते मी वाचून दाखवितो. आम्ही यापुढे यामध्ये शासनाचे मनोदय आहे. अशाप्रकाराबाबत येणाऱ्या सभेस

सविस्तर माहिती मा. महासभेस सादर करु हे असे आपले म्हणणे आहे आणि आता आपण सांगता की हा विषय आपला नाही. तुम्हीच सभागृहाला सांगितले आहे की, पुढच्या सभेमध्ये सविस्तर माहिती देवू. हे म्हणणे तुमचे आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी कोणत्या विषयाला असे बोललो ते आपण ऐकाल का? सन्मा. नगरसेवकेनी असे बोलले की जनतेचा रोष सदस्यांवर आहे की, हा विषय सदस्यांकडून लादला गेला त्याकरिता ती बाब आपली नाही याचा मी त्यांना खुलासा केलेला आहे. हा विषय आपला नाही असे मी बोललेलो नाही. मा. महापौर साहेबांच्या माध्यमातून सन्मा. सदस्यांना मी सांगू इच्छितो की ह्या एस.ई.झेड. साठी मा. महापौर साहेब यांच्या दालनात त्यांच्या अध्यक्षतेखाली येणाऱ्या वर्कींग डे मध्ये १२.०० वा. बैठक घेवून याठिकाणी याबाबतची सगळी माहिती दिली जाईल.

**मा. महापौर :-**

याकरिता विशेष मिटींग लावतो.

**जयंत पाटील :-**

सन्मा. नगरसेवक-नगरसेविका आता विषय क्र. १६ चालू आहे. तो विषय प्रोसिडींगला मंजूरी हा विषय आहे. जर प्रोसिडींगमध्ये काय चुका असतील ते सांगा. आपण त्याला वेळ द्या. हा विषय अतिशय गंभीर आहे. त्यांच्या भावना तिव्र आहेत. त्यांच्यासोबत आम्ही सर्वजण आहोत. मागच्या सभेमध्ये सगळ्यांचे समर्थन त्या गोष्टीला मिळालेले आहे. साहेब, आपण त्यांना वेळ द्या. अन्यथा, आपण या विषयावर खास सभा लावा.

**मा. महापौर :-**

माझ्या दालनात विशेष सभा लावतो. संबंधित नगरसेवक व अधिकारी यांना बोलवतो व बैठक लावतो. त्यात काय काय प्रोसेस झाली आहे ते बघतो.

**जयंत पाटील :-**

ठिक आहे. आपण तसे सांगा. व तशी रुलिंग द्या.

**मा. महापौर :-**

सांगितले आहे.

**सिसीलिया :-**

त्यासाठी आपण खास सभा लावा आणि आम्हांला बोलवा.

**मा. महापौर :-**

जेवढे स्थानिक नगरसेवक आहेत त्या सर्वांना बोलावण्यात येईल.

**शशिकांत भोईर :-**

सचिव साहेब, पान क्र. २२ वर सन्मा. नगरसेवक प्रफुल्ल पाटील साहेबांचे जे संभाषण आहे १९८५ ते २००७ इतक्या वर्षामध्ये आम्ही करोडो रुपयाची मालमत्ता उभारलेली आहे. त्याच्यातली काही मालमत्ता म्हणजे भांडवली खर्च पाहिजे. खर्च शब्द बरोबर लिहा. तसेच त्याच्या खालची तिसरी लाईन लेखापरिचनाच्या नाहीतर लेखापरिक्षकांच्या अहवालामध्ये असे पाहिजे. पान क्र. २३ वर पहिलीच ओळ आहे. महापालिकेचे पद लिहिले आहे तिथे पथ पाहिजे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

पान क्र. ३९ पर मेरा परिच्छेद है। उसमे मा. महापौर पान क्र. ८ पर भाईंदर पूर्व-पश्चिम भूयारी गटर योजनामध्ये ५ करोड रुपये दाखविले आहेत. त्याच्यावर आपली पूर्ण योजना कितीची आहे. उसके बाद पेज नं. ४० पर मेरा वक्तव्य है लोन से निकालनेका है और जो भाईंदर पूर्व-पश्चिम भुयारी गटार आहे वह शहर के लिए भाईंदर (पूर्व) के लिए अत्यावश्यक सेवा है। यह जल्द से जल्द होनी चाहिए तो यह की जगह यहा कर दिया है। इसको पुरा १३ करोड किया जाए और लोन दुसरे चीज पर लिया जाए। पिछली मा. महासभा मे भी इसपर चर्चा हूई थी और आप लोगोंने रुलिंग दिया था। उसका करेक्शन पेज नं. ३२ पर भी किया जाए आठ से बढाकर तेरा किया जाए। इसके बाद आयुक्तने रुलिंग दिया था हा इसको आठ से बढाकर तेरा करेंगे और उनका स्टेंटमेंट इसमें आया नही है।

**नगरसचिव :-**

चेक करतो.

**मदन उदितनारायण सिंग :-**

पण आम्हांला याला आता मंजूरी द्यायची आहे ना.

**नगरसचिव :-**

चेक करके करेक्शन करेंगे। पुढचे दि. १६/४/०७ चे इतिवृत्तांत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

या इतिवृत्तांतामध्ये पान क्र. ५१ वर आयुक्तांचे वक्तव्य आहे. संबंधित अधिकाऱ्यांना शोकास नोटीस काढण्यात येईल आणि त्याचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर त्याच्यावर कार्यवाही करण्यांत येईल. १ करोड रुपये इतक्या रक्कमेला स्थायी समितीने मान्यता दिली जे त्यांच्या अधिकारात नाही तर आयुक्तांनी सभागृहात

वक्तव्य केले. त्यामध्ये पुढे काय झाले? साहेब आपण जे पहिले पान दिले त्याच्यात बघा परत एकदा मागच्याचे ७१ नंबरचे पान वाचा. महापौर सर्व उपस्थित सन्मा. सदस्य/सदस्या, मनपा अधिकारी वर्ग, मनपा कर्मचारी वर्ग आपण सर्वांचे आभार मानून दि. १७/३/०७ ची दुसरी सभा कोरम अभावी रद्द करण्यात येत आहे असे मी जाहिर करीत आहे. आपली ही जी दुसरी दि. १६/४/०७ ची सभा लागली ही कोरम अभावी रद्द करण्यांत आलेली सभा होती? तुमच्या पहिल्या पानाचे जे हेडींग आहे ती नुसती महासभा नाही तर त्याच्या खाली तुम्ही कंसात दिले पाहिजे होते, अमुक तारखेची रद्द केलेली ही महासभा. आपण जे दि. १६/४/०७ चे जे टायटल दिले त्याच्यामध्ये तुम्ही इन ब्रेकेट ही रद्द सभा आहे असे कळले पाहिजे. दुसरे पान बघा. आपण दि. १६/४/०७ ची जी उपस्थिती देता त्याच्यात रद्द सभा आहे, तहकूब आहे असे काहीही मेन्शन डायरेक्ट उपस्थितांचा चार्ज दिलेला आहे.

**नगरसचिव :-**

नोंद करतो.

**मिलन म्हात्रे -:-**

बरोबर आहे ना. आयुक्तांनी जे प्रशासनाच्या वतीने आपल्याला निवेदन केले ते रुलिंग नाही निवेदन आहे. आयुक्तांनी काय कार्यवाही केली का? का केली नाही? श्री. खतगांवकर साहेब, आता जर आम्ही या इतिवृत्तांला मंजूरी दिली तर हे सगळं प्रकरण बासनात जसेच्या तसे गुंडाळले जाईल. हा महत्त्वाचा आणि एक करोड मंजूरीचा विषय आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, आपण हा विषय पेंडीग ठेवून बाकीची मंजूरी द्या. कारण शोकास नोटीस आहे. त्याचे काय झाले काय नाही.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे हा दुसरा विषय पेंडींग राहिला आहे. आत्ता तिसरा विषय पान क्र. ५२ वर प्रकरण क्र. ३ भाईंदर पश्चिम व उत्तन येथील प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूरी, केंद्र इमारतीवरील जागा मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार महापालिकेकडे हस्तांतरीत करण्याकरिता जिल्हा परिषद ठाणे यांना इमारती व जागेची किंमत अदा करणे. टेंम्बा येथे अद्यावत इमारत खर्चास प्रशासकीय आर्थिक मान्यता देणे. आपला ठराव झाला आहे ठराव क्र. ३ मध्ये शेवटचे घ्या. रक्कमेच्या अंदाजपत्रकास ८ करोड ९१ लाख रुपये प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे. सदर हॉस्पिटल इमारत कशाप्रकारे बांधून द्यावी याबाबत आयुक्त यांनी त्यांच्या स्तरावर महापालिकेच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक ते निर्णय घेउन कार्यवाही करावी. ही सभा दि. १६/४/०७ ला झाली. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तुम्हांला सहा महिन्याचे टाईम बॉंड लिमिट होते. सहा महिने हे १५ मे २००७ ला पूर्ण झाले. तेही टाईम बॉंड लिमिट संपण्याच्या एक महिन्या अगोदर आम्हा सर्व नगरसेवकांनी तुम्हांला सगळे अधिकार सोपवून टाकले. म्हणजे ९ करोडचे अधिकार सन्मा. आयुक्तांना आम्ही बहाल केले. हे तुम्हांला जे योग्य वाटले कारण पुढे इलेक्शन लागणार होते. सहा महिन्यामध्ये माझ्या माहितीनुसार अजूनपर्यंत या महासभेच्या आता चार मिटींग झाल्या. पण आयुक्तांना मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचे पण काही गांभीर्य पडलेले नाही. फक्त नोकरभरत्या हे ते सगळं ह्याच्यात राजकारणासह गोल गोल गुरफटत चाललो आहोत तिथे फिरती आहे. ह्याच्यावर आणखीन काय करायचे. भाईंदरच्या सर्व नागरिकांना एवढा मोठा जिव्हाळ्याचा अत्यंत आरोग्याच्या दृष्टीकोनातून महत्त्वाचा असा प्रश्न, उच्च न्यायालयाने त्याच्यावर निकाल दिला. अख्खा महाराष्ट्रामध्ये हा लॅंड मार्क निकाल आला. मी केस केली म्हणून सांगत नाही. जिल्हापरिषदेच्या संपूर्ण महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये त्यांनी सगळ्यात पहिली मिरा भाईंदर महानगरपालिकेला जमिन विकली त्याचा ड्राफ्ट पण त्यांच्याकडे तयार नव्हता. स्पष्ट सी.ओ.झेड. होते. श्री. सुभाष हजारे साहेब बोलले आमच्या या लाईफ मध्ये आम्ही कधी जमिन विकली नाही. आम्ही लोकांच्या घेतल्या. आज आपल्याला एवढी सोन्यासारखी जागा मिळाली. आमच्या प्रशासनाच्या सर्व नगरसेवकांनी त्यावेळेला तुम्हांला मंजुऱ्या देवून टाकल्या. अधिकार बहाल केले. पण पुढे काय झाले?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलत आहे की, ठराव क्र. ३ मध्ये जी मान्यता दिलेली आहे आणि आयुक्तांना अधिकार दिलेले आहेत. त्या अनुषंगाने जिल्हापरिषद ठाणे येथे मा. मुख्यकार्यकारी अधिकारी यांच्याशी बैठक झालेली आहे आणि निश्चित केलेली रक्कम महापालिकेकडून त्यांना अदा केलेली आहे आणि ती जागा हस्तांतर करुन घेतलेली आहे आणि ती पूर्ण जागा महापालिकेच्या ताब्यात प्राप्त झालेली आहे. सदर जागेला कुंपण बांधण्याचा आपला जो पहिला विषय होता त्याचे प्रशासकीय कामकाज पूर्ण झालेले आहे आणि ते काम आपण हाती घेणार आहोत. याठिकाणी आपल्याला जो दवाखाना उभारावयाचा आहे. त्यासाठी येणाऱ्या अर्थसंकल्पामध्ये त्याची तरतुद करण्याची कार्यवाही आणि काही भाग त्यापैकी बी.ओ.टी. ने बांधण्याच्या अनुषंगाने प्रशासनाने त्यावर विचार केलेला आहे. सदरचा प्रस्ताव स्थायी समितीमार्फत महासभेला सादर केला जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

माझ्या माहितीनुसार त्या उच्च न्यायालयाच्या आदेशामध्ये कुठेही असे नमुद केलेले नाही की, ॲग्जेस्टींग वैदयकीय ज्या काही सुविधा टेंम्बा प्राथमिक आरोग्य केंद्रात चालू आहे. उदाहरण दाखल पल्स-पोलिओ, प्रेगनेन्सीच्या ज्या केसेस असतात लसीकरण, पोस्टमार्टम, ह्या ज्या सुविधा अत्यावश्यक होत्या त्या बंद करा असे कुठेही म्हटलेले नाही. असे असताना सुद्धा केवळ श्री. सुभाष हजारे साहेब जे जिल्हापरिषदेचे सी.ओ.झेड होते त्यांनी माझ्या समोर मिटींगमध्ये आपल्या आयुक्तांना सांगितले की, श्री. घेवारे साहेब येथे असतील तर त्यांना विचारायचे ते त्यावेळेला मिटींगला हजर होते की एक माणूसकी या नात्याने तुम्हांला मी माझ्या स्टाफचे एक महिन्याचे एक्सेटेंशन देतोय. माणुसकी या नात्याने इमरजन्सीचा विषय आहे. तुम्ही राज्य शासनाकडे जा. तुमचे जे एम.बी.बी.एस. डॉक्टर्स आपल्याकडे आहेत त्यांच्या नावाने तुम्ही मंजूरी आणा पण तिथले पोस्टमार्टम बंद करु नका. आम्ही करत नाही आणि तुम्हांला एक महिना देतोय. आज एक महिना होवून वर्ष व्हायला आले. तिकडे आता जवळपास होणारे पोस्टमार्टम बंद झाले. लोकांना त्रास होत आहे. पाली, चौक आणि अन्य ठिकाणी वाद निर्माण झाले. या सगळ्याला जिम्मेदार कोण? म्हणजे ऑर्डरमध्ये कुठेही नाही की, पोस्टमार्टम बंद करा. आपण आपल्या महापालिकेमध्ये सक्षम डॉक्टर असूनसुद्धा त्यांना हे काम दिले नाही. जिल्हा परिषेदचा आत्ताचा जो डॉक्टर पोस्टमार्टम करत आहे. तो तुमच्या त्या सिमेच्या बाहेरचा म्हणजे त्याला कायदेशीर दृष्टीकोनातून हद्दीच्या बाहेर असलेला डॉक्टर म्हणतात. मिरा भाईंदर शहरातील वॉर्डाचे पोस्टमार्टम करण्याचा त्याला अधिकार नाही. त्या उपर कहर आयुक्तांनी सर्व पोलिस स्टेशनला पत्र दिली की, पाली येथे जावून आपण पोस्टमार्टम करावे पण जो डॉक्टर पोस्टमार्टम करणारे त्यालाएकही पत्र दिलेले नाही की, तुम्ही येथे पोस्टमार्टम करावे म्हणून तिन्ही पोलिस स्टेशनचे पोलीस कॉन्स्टेबल डॉक्टरशी आज ही भांडतात की तू नाही म्हणून बोलतोस ना, तर आमच्याकडे हे बघ आयुक्तांचे पत्र आहे. तू पोस्टमार्टम केले पाहिजे. त्याची अडचण अशी आहे की, त्यांच्या ज्युरीडेक्शन मधली पोस्टमार्टम तो करु शकतो. साहेब तुम्ही ठाणे महानगरपालिकेचे काम करु शकणार नाही. तर तुम्ही मिरा भाईंदर महानगरपालिकेचे काम करणार. तुमचे जिरोडक्शन फिक्स आहे. तशी त्या डॉक्टरची सुद्धा आहे. आज एवढा मोठा कलह होत आहे. शहरामध्ये उद्रेक चालला आहे. उद्या काहीही होण्याची शक्यता आहे. हॉस्पिटल तुटतात. डॉक्टरला मारले जाते. काळे फासले जाते. आपण पेपरवर, टि.व्ही. वर बघतो. असे असतानासुद्धा अजूनपर्यंत शासनाची मंजूरी का येत नाही. आपल्या डॉक्टरला पोस्टमार्टम करण्यासंदर्भात एखाद्या अधिकाऱ्याचे पदाबद्दल जर असते किंवा एखाद्याची नियुक्ती असती तर एक आठवडयाच्या आतमध्ये अगदी तत्परतेने ते पटकन मंजूर न घेता अधिकारी नियुक्त होतो. पण एवढा मोठा महत्त्वाचा विषय असुनसुद्धा आपल्या प्रशासकीय सेवेमधील आयुक्त म्हणा किंवा आरोग्य सेवेतील जे कोणी वरिष्ठ, कनिष्ठ अधिकारी असतील. मी माहितीच्या अधिकारात त्या डॉक्टरांना पत्र दिले त्यांनी मला जुने १९९१ चे ठराव दिले. त्यांनी दिले, मी त्यांना असा वेध लिहून दिले. आपले प्रशासन कसे चालत आहे. आपण ठराव पास केलेला आहे. त्याच्यानंतर कालावधी गेला. तुमचा आमचा काहीच दोष नाही. उद्या लोक तुम्हांला आणि मला रस्त्यावर मारतील. मार आपण खाउ.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्याला काय म्हणायचे आहे ते थोडक्यात म्हणा. मुद्दा मांडा.

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्या डिपार्टमेंटकडून सगळ्यांकडे मी स्वतः आर.टी.ए. खाली अर्ज केले की, याची कार्यवाही काय आहे? तर कोणी १९९२ चे ठराव दिले. कोणी १९९३ चे दिले. तुमचा आरोग्य विभाग ते म्हणतात की, आमच्याकडे आम्ही काहीच कार्यवाही केलेली नाही. बांधकामामध्ये सांगितले जाते की, आम्ही सुरुवात केलेली नाही. म्हणजे उच्च न्यायालयाचे आदेश येउन सुद्धा प्रशासनातर्फे या महत्त्वाच्या उच्च न्यायालयाच्या निर्णयावर आपण काहीच कार्यवाही केली नसेल तेवढेच मला बोला की, काय काय कार्यवाही झाली. बाकी आम्हांला काही नको.

**बर्नड डिमेलो :-**

मा. महापौर साहेब, पहिल्या सभेमध्ये मी देखिल हा विषय काढला होता. फक्त पंधरा दिवसाची मुदत मागितली होती की, पोस्टमार्टम जे उत्तनला होत आहे त्याला पंधरा दिवसाचा अवधी द्या. नंतर आपण कुठेतरी सोय करु. अजूनपर्यंत सोय झालेली नाही. आहे तोच प्रकार आहे. मी त्यादिवशी तुम्हांला सांगितले ना. त्यांच्याजवळ हत्यार ही नाही. बाजूच्या घरातून मागवून कोयत्याने पोस्टमार्टम करतात अशी अवस्था आहे. तरीही आपल्याला जाग येत नाही. अडचण काय आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्यांनी जे मुद्दे मांडले आहेत त्याच्याशी सहमत आहोत. महापालिकेच्या डॉक्टरांना पोस्टमार्टम करण्याचे अधिकार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांना अधिकार आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आम्हांला नाही मी जे बोलत आहे ते डायसवरुन बोलत आहे व ते प्रोसिडींगमध्ये येत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

दुसऱ्या क्रमांकाची जी परिक्षा होते ती पोस्टमार्टमची होते.

**बालाजी खतगांावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही आहेच म्हटल्यावर आम्ही ते केले आणि उद्या कोर्टात ते वॅलिड झाले नाहीतर...

**मिलन म्हात्रे :-**

ती परिक्षा डॉक्टर पास होतात. कॉरोररची परिक्षा पास झाल्याशिवाय डॉक्टर एम.बी.बी.एस. होत नाही आणि त्यांना ते अधिकार आहे पण शासनाची त्यांना विशिष्ट परवानगी लागते किंवा...

**बालाजी खतगांावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण काहीतरी वेगळे करता. मी त्याच मुद्दयावर येत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब एक वर्षे झाले आहे आपण रखडतोय.

**बालाजी खतगांावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

साहेब बरोबर आहे. आपण जे मुद्दे पोटतिडकीने मांडलेले आहेत. ती वस्तुस्थिती आहे. मिरा भाईंदर वासियांची निश्चितच पोस्टमार्टमसाठी गैरसोय होत आहे. जिल्हापरिषदेचे जे अधिकार होते दवाखान्याची वास्तू आपल्याकडे हस्तांतर झाल्यानंतर त्यांच्या हेडला खर्च टाकण्याची खूप मोठी अडचण निर्माण झाली प्रशासकीय अडचण असल्यामुळे त्यांनी तो पूर्ण दवाखान्याचा स्टाफ वर्ग केलेला आहे आणि तो दवाखाना बंद केलेला आहे त्याठिकाणी मिरा भाईंदर शहरामध्ये जे दोन पोस्टमार्टमचे केंद्र होते ते एक बंद झाल्या कारणाने चालू असलेल्या ठिकाणी पोस्टमार्टम करण्यासाठी मा. आयुक्तांनी सर्व पी.आय. यांना सुचना दिलेल्या आहेत आणि याठिकाणी पोस्टमार्टम सुविधा चालू राहण्यासाठी शासनाकडे आम्ही प्रस्ताव सादर केला होता आणि मला सांगायला आनंद होतो की, मा. संचालक आरोग्य सेवा त्यांनी तो प्रस्ताव मान्य करुन प्रधान सचिव आरोग्य यांच्याकडे सादर केलेला आहे आणि एक आठवडयाच्या आत आपल्याला आपल्या डॉक्टरांना ते अधिकार प्रदान करणार आहेत त्यांची कॉपीसुद्धा आपल्याकडे आलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, याच्यावर पुढे रुलिंग काय? आपल्या भाषणामध्ये आपण ऑलरेडी एक वर्षे अगोदरच्या गोष्टी करत आहोत. आनंद वगैरे वाटण्याची काय गरज नाही. हा आनंद तुम्ही जर निकाल लागल्याबरोबर कामाला लागला असता तर आम्हांलाही झाला असता आम्हीही शेअर केला असता. आता मला सांगा ह्यांनी जे सर्व सरकमटन्स सांगितल्या तो तुमचा जो काय निकाल किंवा जो काय आदेश आल्यानंतर किती दिवसात तुमची सर्व्हिस झाली पाहिजे ह्याचे मला रुलिंग पाहिजे.

**बालाजी खतगांावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. नगरसेवक आपल्याला कल्पना होती आपला दवाखाना हस्तांतर झाल्यानंतर नियोजित वास्तू व्हायला दोन ते तीन वर्ष पूर्ण लागणार होते. आपण जिल्हापरिषद ॲथोरिटीकडे पत्रव्यवहार केलेला आहे की तोपर्यंत आमची यंत्रणा सिल करु नका, बंद करु नका. पण त्यांनी ती बंद केली म्हणून हे प्रश्न निर्माण झालेले आहेत आणि त्याच्यासाठी तुम्ही आमच्या सोबतच होता.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांना अधिकार आहे आणि त्यांनी आपल्याला स्पष्ट सांगितले. मेहेरबानी खात्यामध्ये तुम्हांला एक महिना दिला. फक्त एवढेच आहे की, त्यांनी जे सांगितले त्याच्यावर आपण रुलिंग द्या.

**मा. महापौर :-**

अधिकार प्राप्त झालेले आहेत आणि लवकरात लवकर पंधरा दिवसात आपण ती सेवा सुरु करु या.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

पान क्र. ३५ वर सन्मा. नगरसेवक सुर्यकांत भोईर यांचे वक्तव्य आहे तो नाला अरुंद असल्यामुळे मुन्शी कंपाउंड व कृष्णास्थल आहे तर कृष्णास्थल झाले आहे. ती दुरुस्ती करावी.

**प्रभात पाटील :-**

सन्मा. नगरसेवक मदन सिंग यांनी जो मुद्दा उपस्थित केला होता त्यांची लक्षवेधी होती आणि त्याचे इम्प्लीमेंटेशन गेल्या दहा दिवसांत झालेले नाही तर पान क्र. ४८ वर मी पण म्हटले होते की, लॉजिंग आणि बोर्डींगच्या संदर्भामध्ये व त्या मा. महासभेमध्ये खूप मोठा मुद्दा उपस्थित झालेला होता व सगळ्या कॉंग्रेसच्या सदस्यांनी त्याला जोरदार विरोध केला होता आणि कमिशनर साहेबांनी तेव्हा सांगितले होते की तुम्हांला या शहरातल्या लॉजिंग आणि बोर्डींगची लिस्ट तुम्हांला मा. महासभेमध्ये देवू की किती अधिकृत आहेत किती अनधिकृत आहेत. किती जणांनी परवानगी घेतली आहे आणि कितीजणांनी नाही व त्यांच्याकडे लायसन्स आहे की नाही. त्याला आता दि. १६/४ म्हणजे ८ महिने की १० महिने व्हायला आले आणि त्याच्या पलिकडे जावून सांगते की परवाच्या एक महिन्याच्या पूर्वीच्या महासभेमध्ये मुद्दा काढला होता तेव्हाही तेच उत्तर मिळाले. त्यावर आपण रुलिंग दिले की, पुढच्यावेळी अजेंडा येईल, प्रोसिडींग येईल तेव्हा झालेले मागचे ठराव आणि त्याच्यावर कार्यवाही त्याच्यामध्ये एक मुद्दा आणखीन ॲड करा की काही नाकारते जे अधिकारी आहेत. त्यांचे

सुद्धा नाव ॲड करा की, ह्यांच्या नाकारत्यापणामुळे आम्हांला कार्यवाही करता आली नाही. तुम्हांला जर या शहराचे खरचं सोनं करायचे असेल तर सोनं करु नका पण चांदी तर करा असे मी म्हणेन कारण सोनं होणे तर काय शक्य नाही. मगाशी तुम्हीच बोललात यांनी आक्षेप घेतला होता की, मा. महापौर बरोबर बोललात. बोंबलण्यासारखे बोललात ना. ह्याचा आक्षेप होता की ते बोंबल्यासारखे करतात. आपले मा. महापौर बरोबर बोलतात आम्ही नुसते येथे बोंबलतो. सभागृहातले सगळे सदस्य नुसतेच बोंबलतात. त्यांचा फायदा काय आणि वरुन चक्क हसत असतात. सन्मा. नगरसेवक प्रेमनाथ पाटील नेहमी बोलतात की, विषयाला फाटे फुटले वर मस्त हसत असतात. येथे कोणी बोंबलण्यासाठी येत नाही. याच्यापुढे इथे घडणाऱ्या प्रत्येक घटनेची आणि पुढच्याच महासभेमध्ये असेही नाही आपण तीन महिन्याचे आणणार. या पोथ्या जेव्हा पाठवता व आम्ही जेव्हा महासभेमध्ये येतो तेव्हा तुमचा शिपाई पाठवा हे घेवून यायला. आम्ही त्या पोथ्या हातामध्ये घेणार नाही. पुढच्याच महासभेमध्ये त्याचे सगळे इतिवृत्तांत आले पाहिजे तेही कार्यवाही सहित की तुम्ही त्या ठरावावर काय कार्यवाही केली? माझा आणखीन एक मुद्दा आहे. परवाना अधिकारी येथे बसले आहेत. आपण मागच्या वेळेला एक ठराव केला होता की, महाराष्ट्रामध्ये नामफलक मराठीमध्ये असले पाहिजे ही पहिली अट आहे. त्याच्यानंतर कोणत्याही भाषेमध्ये त्याचे नामफलक देवू शकता असा महासभेमध्ये ठराव पारित केला त्याचे काय झाले? जय महाराष्ट्र असे नाही. मी मराठी आहे. शिवसेनेवाल्यांनीच त्याचा अभिमान बाळगावा असे काही नाही. सन्मा. नगरसेवक अनंत पाटील यांनी या विषयावर उठून बोलले पाहिजे असे मी म्हणेन. तो जो मुद्दा होता त्याचे काय झाले? इतर सगळ्या विषयाची तुमची अगदी लगेच कार्यवाही होते. शहराच्या हिताच्या दृष्टीने जे मुद्दे आहेत त्याचे काय?

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब, आता सन्मा. नगरसेविका प्रभात (ताई) पाटील यांनी जो विषय काढला. त्यावेळी आम्हांला आयुक्त साहेबांनी रुलिंग दिले होते की जर रहिवासी क्षेत्रामध्ये लॉजिंग बोर्डीग आहे त्यांच्यावर आम्ही आठवडयामध्ये कार्यवाही करु. त्याला आठ महिने झाले. आपण बी.पी.रोडला संध्याकाळच्या वेळेत जा. तिथे आपल्या आया-बहिणी फिरु पण शकत नाही. जर आपण रेसीडेन्शीयलमध्ये बोर्डीग लॉजिंगचे परमिशन दिलेले आहे का? माझ्या प्रभागात असे दोन आहेत.

**एस. ए. खान :-**

मा. महापौर साहेब, आपण रेसीडेन्शीयल एरियामध्ये लॉजिंग आणि बोर्डीगची परमिशन दिलेली आहे त्याबाबत खुलासा करायला सांगा.

**प्रभात पाटील :-**

माझ्याही प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही.

**कल्पना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब यासंदर्भात विचारायचे आहे. जे व्हिडीओ सेंटरला परमिशन दिलेले आहे त्या संबंधी ही माहिती द्या. मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये जे व्हिडीओ सेंटरला परमिशन दिलेली आहे त्याबद्दल आम्हांला माहिती द्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये नामफलक हे मराठीतून असावेत यापूर्वी जी सभागृहात चर्चा झाली होती. त्यावर चर्चा होउन अंतिम ठरले होते आणि शासनाचे जे निर्देश आहेत त्याप्रमाणे मा. आयुक्तांनी आपल्या सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना तसे आदेश काढलेले आहेत की आपल्या एरियामध्ये अशाप्रकारच्या कार्यवाही साठी सर्व्हेक्षण करावे आणि सर्व्हेक्षण करुन ज्या लोकांची नामफलक मराठीमधून नाही त्यांना नोटीसा द्याव्यात आणि त्याचा सर्व्हेक्षणाचे काम चालू आहे. असे संबंधित अधिकारी श्री. तायशेटे यांनी सांगितले आहे.

**प्रभात पाटील :-**

आपली उत्तर चांगली असतात की, आमचे समाधान करण्यासाठी चांगले असतात. पण त्याला टाईम पिरिएड काय आहे? त्याला तुमचा अधिकारी काळवेळ ठरवेल की नाही? तुमचा सर्व्हे आणखीन पाच वर्षे होणार नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

पुढच्या सभेपर्यंत त्याला अहवाल आम्ही सादर करु.

**प्रेमनाथ पाटील :-**

आयुक्त साहेब, मी जो प्रश्न विचारलेला आहे, बी.पी.रोडवर काही लॉजिंग बोर्डीग आहे. तिथे देहव्यवसाय चालू असतो. देहविक्रीचा वापर तिथे चालू असतो त्याच्यावर आपण तिथे काय ॲक्शन घेणार की नाही?

**एस. ए. खान :-**

खतगांवकर साहेब, रेसीडेन्शीयलमध्ये आपण लॉजिंग आणि बोर्डीगचे जे परमिशन दिलेले आहेत ते रद्द करण्यांत यावे.

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त साो.) :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो की, या संदर्भात मागे जी सभा झाली होती त्यावेळी पण आयुक्त महोदयांनी निवेदन दिलेले होते. एकूण ५८ लॉजिंग बोर्डींग सर्व्हेक्षणामध्ये आढळले आहेत आणि त्यापैकी आठ लॉजिंग बोर्डींगचा परवाना रद्द करुन यादी जी आहे ती जिल्हाधिकारी महोदयांकडे पुढील कार्यवाही करिता ऑफीसमार्फत पाठविण्यांत आलेली आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब आपण रेसीडेन्शीयल एरियामध्ये लॉजिंग आणि बोर्डींगला परवानगी देता का? फक्त नावाला लॉजिंग बोर्डींग आणि तिथे देह व्यवसाय चालू असतो त्यांचे तुम्ही काय करणार? संध्याकाळच्या वेळेला आपण बी.पी.रोड बघा. आपण तिथे फिरु शकतो का? तिथे पोझिशन बघा. अक्षरशः वेश्या तिथे पुरुषांचे हात धरुन जातात.

**एस. ए. खान :-**

सर्व्हेक्षणामध्ये किती आहे?

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त साो.) :-**

सर्व्हेक्षणाची जी यादी आहे त्याच्यामध्ये ५८ लॉजिंग बोर्डींग आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

ते ५८ अधिकृत आहे का?

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त साो.) :-**

आपण सर्वांना एन.ओ.सी. दिलेली नाही त्यापैकी...

**प्रेमनाथ पाटील :-**

मग ते चालू कसे काय आहे?

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त साो.) :-**

आपण १२ ते १३ लॉजिंग व बोर्डींगला परमिशन दिलेली आहे आणि राहिलेली जी यादी आहे ती आपण जिल्हाधिकाऱ्यांकडे कार्यवाहीकरिता पाठविलेली आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

लॉजिंग बोर्डींग कधी चालू होते. जेव्हा तुमच्याकडे प्लॅन पास करायला येतो. त्याच्यामध्ये उल्लेख असतो की ही जागा आम्ही लॉर्जिंग बोर्डींगसाठी आरक्षित केलेली आहे. असे तुमच्याकडे काय इमारती आहेत का? मा. महापौर साहेब, मी जो प्रश्न विचारलेला आहे त्याचे उत्तर साहेबांना द्यायला सांगा. बी.पी.रोडला जो वेश्या व्यवसाय चालतो त्या लॉजिंग बोर्डींगमध्ये त्याला आपण परवानगी दिलेली आहे का?

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त साो.) :-**

त्याला परवानगी दिलेली नाही आणि जो नाहरकत दाखला आपण परवाना विभागामार्फत देतो त्याच्यावर आपण नमुद केलेले असते की अनधिकृत बांधकाम असल्यास त्याबाबतची कार्यवाही करण्याचे अधिकार राखून ठेवून एन.ओ.सी. दिलेली आहे. अशाप्रकारची अट नमुद करुन देत असतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण लॉजिंग बोर्डींग चालू करण्याकरिता दिलेले आहे की, रद्द करण्याकरिता दिलेले आहे.

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त साो.) :-**

जिल्हाधिकारी महोदयांकडे आपण रद्द करण्याकरिता दिलेले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

पण आपल्या महानगरपालिकेने परमिशन दिलेले आहे त्याचे आपण काय करणार?

**प्रभात पाटील :-**

५८ की १५८? लॉजिंग आणि बोर्डींग किती ५८ की १५८?

**प्रेमनाथ पाटील :-**

२५८ आहेत.

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त साो.) :-**

आपल्याकडून जे सर्व्हेक्षण झालेले आहे त्याच्यामध्ये ५८ ही संख्या आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

कुठल्या कुठल्या रोडला किती किती आहेत ते मला आपण सांगाल का?

**प्रभात पाटील :-**

आपण आम्हांला ती लिस्ट द्या.

**मदन उदितनारायण सिंग :-**

श्री. दिवटे साहेब आपण त्याची यादी सर्वांना द्या.

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त साो.) :-**

यादी पुढच्या मिटींगमध्ये सर्व सदस्यांना पुरवली जाईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण सांगता की, ५८ आहे तर त्या ५८ ची लिस्ट आपल्याकडे असायला पाहिजे ना.

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त सो.) :-**

ती लिस्ट माझ्याकडे आहे मी वाचून दाखवू का?

**जयंत पाटील :-**

सन्मा. नगरसेवक प्रेमनाथ पाटील दूपारचे दोन वाजलेले आहेत व आपल्याला संपूर्ण माहिती पाहिजे असेल तर आपल्याकडे पाठवून देवू शकतो.

**कल्पना म्हात्रे :-**

ही माहिती सभागृहाला पाहिजे.

**जयंत पाटील :-**

मला वाटते सर्वांना लॉजिंग बोर्डींगबाबत भरपूर इंटरेस्ट आहे.

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त सो.) :-**

झेरॉक्स प्रत सर्व सन्मा. सदस्यांना पुरविण्यांत येईल.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, त्यांनी आता असे वक्तव्य केले. एक मिनिटापूर्वी की आमच्याकडे यादी आहे त्यात ५८ आहे त्यातले ८ परवाने त्यांनी कॅन्सल केलेले आहे.

**जयंत पाटील :-**

कुठले कॅन्सल केले आहे तेवढे सांगा.

**प्रभात पाटील :-**

त्यांनी ८ कॅन्सल केले आहे आणि बाकी जे राहिले आहेत जे अनधिकृत आहे त्यांना परवानग्या नाही ती आधी त्यांनी जिल्हाअधिकाऱ्यांकडे सूपूर्द केली तर का? यामध्ये महापालिका सक्षम नाही का? कार्यवाही करायला?

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त सो.) :-**

जिल्हाधिकारी महोदयांमार्फत त्या संबंधित आस्थापनेकरिता जे इतर एन.ओ..सी परवाने दिले जातात ते रद्द करण्यासंदर्भात त्या बाबतची पुढची कार्यवाही करण्यासाठी जिल्हाधिकारी महोदंयाकडे पाठविले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब आधी आपली परमिशन लागते नंतर जिल्हाधिकाऱ्यांची तुम्ही तुमचा रिमार्क दिल्याशिवाय जिल्हाधिकारी परमिशन देत नाही हे आपण तेवढे लक्षात ठेवा.

**प्रभात पाटील :-**

आपण परवानगी दिलीच असेल.

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण ५८ च्या ५८ लॉजिंग बोर्डींगला परमिशन दिलेली नाही.

**प्रभात पाटील :-**

त्याच्यावर कार्यवाही करणे आपले काम आहे. जर आपली परवानगी नाही तर त्याच्यावर नाही तर त्याच्यावर तुम्ही कार्यवाही करा ना. तुमच्याकडून कार्यवाही व्हायला पाहिजे.

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त सो.) :-**

ते रद्द करुन जिल्हाधिकारी महोदयांनी त्यांनी त्यांचा जो परवाना दिलेला तो रद्द करण्यासाठी..

**प्रभात पाटील :-**

ते अगोदर देतात की नंतर देतात?

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त सो.) :-**

आपल्या एन.ओ.सी नंतर त्यांनी देणे आवश्यक आहे. परंतु काही ठिकाणामध्ये तसे झाले नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण काय रिमार्क दिला? आपण ते बांधायला परमिशन दिली. मग आपण त्याच्यावर रिमार्क काय दिला? की, सदर ठिकाणी देह व्यवसाय चालू द्या असा रिमार्क दिलेला आहे का?

**ओमप्रकाश दिवटे (उपायुक्त) :-**

प्रशासनामार्फत असा कसा प्रस्ताव देण्यात येईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण परमिशन देताना त्या जागेची चौकशी केली का? आपण त्या जागेमध्ये जावून भेटलात का? ही जागा ह्यासाठी अव्हेलेबल आहे का?

**ओमप्रकाश दिवटे (उपायुक्त) :-**

सन्मा. सभागृहाच्या भावना पोलिस स्टेशन आणि मा. जिल्हाधिकारी महोदयांकडे प्रशासनामार्फत लेखी पोहचविल्या जातील.

**प्रेमनाथ पाटील :-**

पहिले आपण महानगरपालिकेतर्फे परमिशन द्यायला लागते. त्यानंतर मग जिल्हाधिकारी परमिशन देतात.

**नुरजहाँ नझरहुसैन :-**

पिछले महासभा मे सन्मा. नगरसेविका प्रभात (ताई) पाटील इन्होने बोला है फिर भी उसके उपर कोई कार्यवाही नही होती है। मेरा तो यही कहना है की, जो रस्ते हम लोगो से टॅक्स वसुल करके बनाते है, शहर को इतना अच्छा बनाता है। अच्छा वातावरण डेव्हलप करते है। उसके उपर फ्रुटवाले, भाजीवाले बेकार लोग बैठते है। उनको आप लोग नही उठा सकते तो लॉजींग बोर्डींग को आप लोग क्या हटाओगे, मुझे यह बताओ?

**प्रभात पाटील :-**

नाही, आपण काहीच करु शकत नाही. कारण आपल्यामध्ये अगदी निष्क्रीयता भरलेली आहे. आपण काहीच करु शकत नाही. अनधिकृतपणाला आपल्याकडे आळा घालण्यासाठी आपल्या महापालिकेची क्षमता राहिलेली नाही. मी तुमच्यावर पूर्ण आरोप करते की, तुमच्याकडे कोणतीही क्षमता राहिलेली नाही की, कोणतेही अनधिकृत बांधकाम असो किंवा अनैतिक धंदे असो त्याला आपण पायबंद घालू शकता. आम्ही शासनकर्ते प्रशासनाच्या इतक्या पाठीशी उभे राहतो. परंतु, आपल्या निष्क्रीयतेत आम्ही साफ हरलेलो आहोत हे मान्य करायला सभागृहाची काहीच हरकत नाही की, आम्ही तुमच्यापुढे पूर्णपणे हरलेलो आहोत आणि आपण जिंकलेले आहात.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आपणच सांगा की, काय करायचे? लॉजींग-बोर्डींग चालू ठेवायचे की बंद ठेवायचे?

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर महोदयांच्या परवानगीने बोलतो की, आता जो विषय घेतलेला आहे लॉजींग-बोर्डींगचा त्याच्यात जे जे अनधिकृत बांधकाम केलेले आहे ते पहिल्यांदा तोडा त्याला कशाला आपल्या हरकती आहेत. ते पहिल्यांदा तोडा. अधिकृत बिल्डींग असेल व त्याच्यात अनधिकृत लॉजींग-बोर्डींग असेल तर त्याचा नंतर निर्णय घ्या. पण अनधिकृत बांधकाम आहे तिथे पहिल्यांदा कार्यवाही करा. आपण हतोडा मारल्याशिवाय दुसरी कामे होणार नाही आपण अनधिकृत बांधकाम काढले की, आपोआप त्याचे लॉजींग-बोर्डींग बंद होईल.

**ओमप्रकाश दिवटे (उपायुक्त) :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो की, सन्मा. सदस्यांनी जी सुचना दिलेली आहे. त्याबाबतची माहिती घेउन जे अनधिकृत इमारती आहेत त्याच्यावर अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागामार्फत तोडण्याबाबतची जी आवश्यक कार्यवाही आहे ती नक्कीच केली जाईल.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौरांनी त्याच्यावर रुलिंग द्यावे की, हे किती दिवसात करावे? कारण आपण रुलिंग दिली तरच त्याच्यावर कार्यवाही होईल.

**स्नेहा पांडे :-**

मा. महापौर महोदय, फाटक रोडपर पाच लॉजीग बोर्डींग है। वह ऐसे है की, जिनको नगरपालिकासे परमिशन नही है। यह इन्फॉरमेशन मैने महानगरपालिका के अधिकारीयोंसे निकाला है वह उनको भी पता है। फिर भी उसपर कोई भी कार्यवाही नही की जाती है। ऐसा क्यों है?

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, याला कारण काय आहे?

**जुबैर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, आपण त्यांना जे पाण्याचे कनेक्शन तसेच महापालिका जे इतर सोयीसुविधा देते. ते बंद करण्यात यावे. आपण फक्त त्यांच्या परवानग्या कशाला रद्द करता? त्यांच्या जेवढ्या सोयीसुविधा आहेत तेवढ्या सर्व बंद करण्यात याव्यात.

**ओमप्रकाश दिवटे (उपायुक्त) :-**

परवाना विभागामार्फत जे एन.ओ.सी. दिले जाते.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

परवाना विभागाचे श्री. तायशेटे यांनी याठिकाणी माहिती दिलेली आहे ती माहिती मी सभागृहाला देवू इच्छितो. लॉजींग बोर्डींगसाठी मागच्या दोन तीन सभामध्ये खुप मोठा प्रक्षोभ याठिकाणी मांडला होता आणि आपल्या शहरामध्ये जे अनियमित किंवा बेकायदेशीर व्यवसाय चालतात त्याला

पायबंद करण्यासाठी सदस्यांच्या ज्या सुचना होत्या त्या बाबी विचारात घेउन एकूण जवळपास असे ५० लॉजींग बोर्डींगचे व्यवसाय बेकायदेशीर आहेत. त्यांची यादी करुन विधी विभागाला दिलेली आहे. महापालिकेच्या अधिनियमाचे कलम ४२७ प्रमाणे त्यांच्यावर फौजदारी संहिता अंतर्गत गुन्हे दाखल करण्याचा प्रस्ताव महापालिकेच्या विधी विभागाला दिलेला आहे. त्याचे ॲफीडेव्हीट आणि जे काय स्टे आहे ते कोर्टात दाखल केले जाणार आहे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, आपण विधी विभागाला ते कोणत्या तारखेला दिले आहे व विधी विभागाने त्याच्यावर काय कार्यवाही केली आहे? विधी विभागाने त्याचा खुलासा करावा. आपण आदेश दिले आणि ते दप्तरी बांधून माती, घाण, धूळ खात ठेवायचे. तसे त्यांनी ठेवलेले नाही ना? विधी अधिकाऱ्यांना बोलवा आणि त्याचा खुलासा करायला सांगा आणि ज्या ज्या लॉजींग बोर्डींगला नोटीसा दिलेल्या आहेत. बेकायदेशीर बांधकाम असेल त्यांना तुम्ही तोडा. मा. महापौर साहेब, त्याकरिता आपणाला विनंती केली की, आपण याच्यावर रुलिंग द्यावे की, किती दिवसात कार्यवाही होईल आणि विधी अधिकाऱ्यांना बोलवा आणि विचारा की, आपल्याला पत्र दिलेले आहे त्याच्यावर काय कार्यवाही झाली? कारण आपण प्रत्येक केस हरतोच, जिंकत नाही. आपल्याला हारण्यासाठी केस करायची असते आणि वकील पोसायचे असतात. आजपर्यंत कोणतीही जिंकलेली केस दिसली नाही. बिल्डर असला की, या केसला हजर राहू नका त्या केसला हजर राहू नका आणि बिल्डर केस जिंकतो आणि आपण तिथे हारतो. विधी अधिकाऱ्याकडून आपण त्याचा खुलासा घ्यावा.

**जुबैर इनामदार :-**

स्टे घेतात त्याच्या अगोदर हे लोक केवीट फाईल करत नाही. त्यामुळे त्यांना स्टे घ्यायला संधी मिळते.

**मा. महापौर :-**

साहेब आपण जेवढया लॉजिंग बोर्डींगला मिरा भाईंदर महानगरपालिकेने टाउन प्लॅनिंगने लॉजिंग बोर्डींग म्हणून परवानगी दिलेली आहे त्यांनाच आपण लायसन्स द्यावे बाकी जेवढया इमारतींना आपण जे लायसन्स दिलेले आहे ते एखाया कमर्शियल बिल्डिंगमध्ये असू द्या किंवा रेसिडेन्स बिल्डिंगमध्ये असू दे. इललिगल बिल्डिंगमध्ये असू दे. आपण ते प्रत्येक लायसन्स कॅन्सल करावे. जसे आपण गोल्डमर्चंट गुन्हा दाखल केलेला आहे. तसाच त्यांच्यावरही गुन्हा दाखल करण्यांत यावा आणि जेवढे इललिगल कन्स्ट्रक्शन आहेत किंवा लॉजिंग बोर्डींग आहेत मग ते आजचे असू द्या किंवा दहा वर्षांनंतरचे असू द्या. आपण प्रत्येक इललिगल बांधकामावर कार्यवाही करुन घ्या आणि विधी विभागाने जे जे कोर्टमॅटर आहे त्याचा रितसर अहवाल सादर करा.

**मिलन म्हात्रे :-**

दि. ३/५/०७ ची सभा झालेली आहे त्याच्यामध्ये पान क्र. ५२ व ५३ वर आयुक्तांनी प्रशासनाला आदेश दिलेले आहेत. ते आपण चेक करा. संबंधित विषयावर या सभागृहांमध्ये प्रशासनाच्यावतीने आणि प्रशासनाचा प्रमुख म्हणून विषयाचे गांभीर्य आणि सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेवून आयुक्तांनी तात्काळ आदेश दिले होते. आपण सांगितल्याप्रमाणे ते अनावधानाने राहिले असेल. अशा आशयाचा खुलासा करु इच्छितो आपण जाहिरातीच्या बोर्डाला परवानगी देतो. जाहिरातीचे जाहिरातदार असतील किंवा ते स्वतःच्या बोलण्यावर उत्सुक असतील. महापालिका फी घेते. त्याप्रमाणे त्यांना परवानगी दिली जाते. असे समजा, बिगर परवानगीचे बोर्ड वगैरे त्याच्यात कार्यवाही केलेली आहे. कार्यवाही केली जाईल. असे आयुक्तांचे इथे आदेश आहे. वर बघा, सभागृहामध्ये जी मगासपासून चर्चा सुरु आहे. त्या चर्चेच्या अनुषंगाने मी आपल्याला सांगू इच्छितो की ज्या ज्या ठिकाणी रहिवासी भागामध्ये अशाप्रकारे जर लॉजिंग बोर्डींग सुरु केलेले असतील तर त्याच्यावर तातडीने कार्यवाही करण्यांत येईल. त्यांना कुठल्याही प्रकारचे लायसन्स दिले जाणार नाही. हा पहिला मुद्दा आहे. दुसरा मुद्दा साधारणतः शहरामध्ये जेवढे लॉजिंग बोर्डींग सुरु आहेत तर त्यांना कुठल्या प्रकारच्या परवानग्या दिलेल्या आहेत त्याचा हिशोब घेण्यांत येईल. हिशोब कुठला घेतात ते माहित नाही. त्यांनी जर रिपेरींगच्या नावाखाली वेगळ्या प्रकारचे हॉटेल बांधले असतील किंवा लॉजिंग बोर्डींग चालू केली असेल तर त्याचे लायसन्स ताबडतोब रद्द केले जाईल. हे आयुक्तांनी सभागृहापुढे सांगितले आहे आणि आता आपण जे म्हणालात हे आपले रुलिंग झाले. पण प्रशासन सन्मानाने आयुक्तांनी दिलेले रुलिंग ही पाळत नाही. त्यांनी ते पाळले नाही. त्यांनी हे दि. ३/५/०७ च्या सभेमध्ये दिले.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब आपण त्यांना एका आठवडयात जेवढे लायसन्स दिलेले आहे आपण ते सर्व रद्द करु.

**मिलन म्हात्रे :-**

आठ महिने झाले. आता आणखीन किती कालावधी देणार ते सांगा.

**मा. महापौर :-**

मी आपल्याकडे सात दिवस मागत आहे. सात वर्कींग दिवसाच्या आतमध्ये आपण त्यांचे लायसन्स रद्द करु आणि श्री. तायशेटे साहेबांना सांगेन की यापुढे आपण एक वेगळे बायलॉज तयार करा कारण प्रत्येक फिल्डमध्ये हा प्रॉब्लेम आहे की एखाद्याने जर एन.ओ.सी. घेतली नाही किंवा त्याचे उल्लंघन केले तर आपण त्याच्यावर नक्की काय कार्यवाही करायची? कारण आपण त्यांच्यावर फक्त गुन्हा दाखल करायचे व त्याच्यापुढे काहीच नाही आणि एक कोर्टमॅटर झाले की, आपण घरी बसायचे. त्याकरिता आपण एक नविन बायलॉज तयार करु या, त्याप्रकारचा इनकेस त्यांनी गुन्हा दाखल केल्यानंतर विदाउट एन.ओ.सी. चालवितो तर आपण काय करायचे यासाठी आपण एक बायलॉज तयार केला तर त्यामुळे आपले बरेचसे कंट्रोल राहिल व त्यांना पाण्याचे कनेक्शन व जेवढया आपल्या महापालिकेतर्फे सुविधा देण्यात आलेल्या आहेत तर उपायुक्त साहेब आपल्याला ते नियमाप्रमाणे काढण्यात येत असतील तर ते तातडीने काढून घेण्यात यावे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महासभेमध्ये आयुक्तांनी जे आदेश दिलेले आहेत त्याला अधिन राहून नाहीतर, ते तुमचे आदेश म्हणून काहीतरी निराळा फाटा फोडतील.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब, आपण रेसीडेन्शीयल एरियामध्ये जे आहे त्यांचे परवाने आपण रद्द करा.

**मा. महापौर :-**

आपल्याकडून जी सुविधा दिलेली आहे त्याची नियमाप्रमाणे कार्यवाही करा.

**प्रेमनाथ पाटील :-**

जे रेसीडेन्शीयल एरियामध्ये लॉजिंग बोर्डींग आहेत त्यांच्यावर काय कार्यवाही करण्यांत येणार आहे?

**मा. महापौर :-**

आपण ते टोटली रद्द करणार. जेवढे परवानग्या दिलेल्या आहेत. ज्याला लॉजिंग बोर्डींग म्हणून आपल्या टाउन प्लॉनिंगकडून परवानगी आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

टाउन प्लॉनिंगने कन्स्ट्रक्शन करण्याच्या वेळेला जी परवानगी दिली होती ती परवानगी आपण म्हणता ना.

**मा. महापौर :-**

प्लॉन अप्रूव्हड करताना ज्याने लॉजिंग बोर्डींग दाखवून परमिशन घेतलेली आहे, बिल्डिंग किंवा इमारती त्यालाच फक्त परवानगी दिली जाईल बाकी सर्व रद्द करु.

**कल्पना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, मला व्हिडीओ सेंटरबाबत बोलायचे आहे. किती व्हिडीओ सेंटर अधिकृत आहे व किती अनधिकृत आहे त्याच्याबद्दल माहिती द्या.

**मा. महापौर :-**

रितसर माहिती घेउन आपल्याला देण्यात येईल.

**कल्पना म्हात्रे :-**

पण आता तिथे जो वेश्या व्यवसाय चालला आहे तो भयंकर आहे.

**मा. महापौर :-**

त्याप्रकारचे व्हिडीओ सेंटरचे लायसन्स आपण रद्द करुन घेउ.

**कल्पना म्हात्रे :-**

हे जे व्हिडीओ सेंटर आहे ते भाजी मार्केटमध्ये चालतात व बाहेर घाणेरडे पोस्टर लावलेले असतात.

**मा. महापौर :-**

आपले म्हणणे आम्हांला समजले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहब, हमारे उस समय गटनेता श्री. रोहिदास पाटील उस क्षेत्र के नगरसेवक थे। और उस समय यह आरोप लगाया गया की, भाजप के राज्य मे क्या होता है? तभी आयुक्त साहबने रुलिंग दिया था की, हम पुलिस की कार्यवाही करके ताबडतोब बंद कर देंगे। लेकिन ऐसा कुछ भी नही हूआ है। आप वही वह आश्वासन दे रहे है।

**कल्पना म्हात्रे :-**

यहा पर एक महिने तक बंद रखा और वापस चालू किया।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हमने उसके लिए मोर्चा निकाला।

**मा. महापौर :-**

आपल्या अधिकारात जे जे आहे त्याच्यावर आपण नक्की कार्यवाही करु.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

उसको लायसन्स दिया है या नही दिया तो अधिकार हो गया। ताबडतोब बंद करो।

**मा. महापौर :-**

मैंने वही बताया है की, जुने उपविधी के अंदर ऐसा कोई नियम नही बनाया गया की, उनको जाकर सील किया जाए। बंद किया जाए। उसके लिए नया बायलॉज बनाना पडेगा।

**कल्पना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, म्हणजे ज्यांना लायसन्स दिले आहे त्यांना उघडे नागडे पिच्चर दाखवण्याचे ही लासयन्स आहे का ह्याची देखिल माहिती द्यावी.

**मा. महापौर :-**

मॅडम, तो आपला विषय नाही.

**कल्पना म्हात्रे :-**

प्रशासनाने त्याच्यावर लक्ष द्यायला नको का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण एन.ओ.सी दिली का नाही?

**मा. महापौर :-**

आपण दिली का नाही त्याची माहिती नाही आणि दिली असेल तर रद्द करु..

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, अधिकारी मागेच बसले आहेत त्यांना आपण विचारुन घ्या की, परवानगी दिली आहे की, नाही?

**मा. महापौर :-**

नाही दिली.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग ते केव्हाच बंद झाल्या पाहिजेत? ते का होत नाही? आज सहा महिने होउन गेले. श्री. रोहिदास पाटील यांनी येथे विषय उचलला होता तेव्हा सांगितले की, चार दिवसात कार्यवाही करतो तेव्हा आयुक्त साहेबांनी ठामपणे सांगितले होते.

**मा. महापौर :-**

जे आहेत त्यांच्यावर गुन्हा दाखल करुन रितसर पोलिस स्टेशनला सर्व माहिती देवु या की,येथे या प्रकारचे कामकाज होते.

**कल्पना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब ज्या रस्त्यावर वेश्या फिरतात त्या तिथे ही कार्यवाही झाली पाहिजे बी.पी रोडला पुर्ण वेश्या व्यवसाय चालु असतो. सकाळपासुन रात्रीपर्यंत हा वेश्या व्यवसाय चालु असतो.

**मा. महापौर :-**

संबधित पोलिस स्टेशनला आपण तशी माहिती देवुन त्यापध्दतीने कार्यवाही करायला लावु.

**कल्पना म्हात्रे :-**

आमचा पत्रव्यवहार झालेला आहे पण तिथे काहीच कार्यवाही होत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहब जैसे इललिगल बांधकाम के लिए आपके पास
पुलिस कमिश्नर का फोन आया। आपने किया तो इसके लिऐ भी किजीए ना।

**मा. महापौर :-**

सन्मा. नगरसेवक मैं आपको वही बोल रहा हु की, उनको भी लेटर देकर जो इस तरह के कामकाज चल रहे है। उनको बंद किया जाएगा।

**नगरसचिव :-**

दि. ३/५/२००७ चे इतिवृत्तांत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सचिव साहेब ही जी सभा आहे याला आपण पहिले टायटल दिले १६/४/२००७ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची विशेष मा. महासभा सभा सुचना १०/४/२००७ च्या विषयपत्रिकेनुसार आयोजित करण्यांत येत आहे सभागृहात मा. महापौरांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे सदस्य हजर होते. ह्याच्यापुढची जी सभा आहे त्याच्यामध्ये त्याच्या अगोदरची जी सभा झाली उपमहापौर तथा पिठासीन अधिकारी असे भाष्य लिहीले आहे ही दि. १६/४/२००७ ची सभा आहे वेळ सायं ५.१० वा. लिहिले आहे हि दि. १६/०४/२००७ ची सभा आहे. ह्याचे आपण जे पहिले पान दिले मागच्या ह्याच्यात तुमची सभा तहकुब झाली आहे आणि ही नंतरची सभा लागली आहे.

**नगरसचिव :-**

एका दिवशी दोन सभा होत्या. सुचना वेगळ्या आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

पहिली सभा तहकुब लागेल.

**नगरसचिव :-**

दि. १६/४/२००७ ची ही सभा चालु होती.

**मिलन म्हात्रे :-**

दि. १६/०४/२००७ च्या दोन सभा आहे. माझा मुद्दा असा आहे की, आपण ही जी नोटीस दिली

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

त्याच्यामध्ये तुमचा आक्षेप काय आहे ते सांगा?

**मिलन म्हात्रे :-**

आपण या पानाच्या शेवटला लिहिले आहे की, तहकुब सभा हे एकतर चुकीचे आहे किंवा आपली जी पहिली विषयपत्रिका स्टार्ट झाली. तिथे तुम्ही फक्त रेग्युलर सभा बोलता तहकूब सभा असते त्याच्यामध्ये नविन विषय वगैरे काही येत नाही. जुन्या विषयपत्रिकेवर चालते एक तर हे चुकीचे आहे किंवा ते चुकीचे दोघामधुन काहीतरी कमिट करा.

**नगरसचिव :-**

नविन सभा आहे व  १ नंबर आणि २ नंबर अशा दोन सभा आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

ते सगळं मान्य आहे. माझा मुद्दा असा आहे की, एकतर हे खरं आहे की, ते खंर आहे तेवढेच बोला आपण खाली जे लिहिले आहे सभा तहकुब झाल्याची वेळ ५.१० मिनिटे बरोबर आहे का? मग एकतर हे बरोबर आहे किंवा मग पुढच्या विषयपत्रिकेची स्टार्ट बरोबर आहे. दोघापैकी एक काहीतरी सांगा.

**दिपक खांबित :-**

दि. १६/०४/२००७ ची जी सभा आहे ती विशेष सभा दुसरी सभा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

इतिवृत्तांतामध्ये मग तुमचा क्रम चुकला. इतिवृत्तांता हे शेवटचे पान झाले व त्याच्यानंतरची लागलेली ही मिटींग.

**नगरसचिव :-**

शेवटी तहकुब लिहीले आहे तिथे करेक्शन व्हायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

असे बोला आणि विषय संपुन टाका.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तहकुब शब्द तिथे अपेक्षित नाही.

**मिलन म्हात्रे :-**

सचिव साहेब, आपण हे एवढ लाईटली बोललात, तहकुब सभेमध्ये अन्यथा कुठलेही विषय विषयपत्रिकेच्या व्यतिरिक्त येत नाही. असा नियम आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तहकुब शब्द नसायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

तहकुब शब्द जो लिहिला आहे तो इथे असावा किंवा तिथे असावा आपण सुधारणा काय केली?

**नगरसचिव :-**

तहकुब शब्दाचा पुढे करेक्शन करणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

दि. ३/५/२००७ च्या सभेमध्ये ही तीच चुक झाली आहे.

**मा. महापौर :-**

सुधारणा करुन घेतो.

(सन्मा. सदस्य जयंत पाटील ह्यानी प्रकरण क्र. १६ ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**ठराव क्र. :-**

दि. २०/०२/२००७, दि. १७/०३/२००७, दि. १६/०४/२००७, दि. १६/०४/२००७, दि. ०३/०५/२००७ व दि. १७/०५/२००७ रोजीच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करणे असा मी ठराव मांडत आहे.

**भगवती शर्मा :-**

या ठरावाला अनुमोदन आहे.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौरांनी जे रुलिंग दिले आहे की, याच्यापुढे येणाऱ्या विषय आणि त्यांचे ठराव हे सुध्दा त्याच्यामध्ये इनक्ल्युड करुन घ्या.की, आम्हांला त्याची अंमलबजावणी त्या त्या प्रोसिंडिग बरोबर मिळत जाईल.

**प्रकरण क्र. १६ :-**

दि. २०/०२/२००७, दि. १७/०३/२००७, दि. १६/०४/२००७, दि. १६/०४/२००७, दि. ०३/०५/२००७ व दि. १७/०५/२००७ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १६ :-**

दि. २०/०२/२००७, दि. १७/०३/२००७, दि. १६/०४/२००७, दि. १६/०४/२००७, दि. ०३/०५/२००७ व दि. १७/०५/२००७ रोजीच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करणे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील. अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**जयंत पाटील :-**

आजच्या सभेमध्ये रुलिंग होते की, एस.इ.झेड संबंधची माहिती त्यांना द्यायची आहे.

**मा. महापौर :-**

आपण त्याची बैठक लावणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण जे विषय वगळले आहेत १५ व १६ त्याचा गोषवारा अजुन आलेला नाही.

**मा. महापौर :-**

आणुन देतो.

**मिलन म्हात्रे :-**

त्याला अधिन राहुन आपण याला मंजुरी घ्या.

**मा. महापौर :-**

होय.

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौर साहेब सन्मा. सभागृह सन्मा. आयुक्त श्री. सुदामराव गायकवाड साहेबाबद्दल बरेचसे काही बोलले गेले ते आज कुठे आहेत त्याचा खुलासा सभागृहासमोर केला तर बरे होईल आणि त्यांना जे आदेश आलेले आहेत त्या आदेशाचे वाचन देखिल सभागृहात झाले पाहिजे जे सचिव कार्यालयाकडुन नगरविकास खात्याकडुन जे आदेश आलेले आहेत. त्या आदेशाचे वाचन या सभागृहात झाले पाहिजे आज ते कुठे आहेत त्या बद्दलची माहिती दिली पाहिजे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती साहेबांनी जी सुचना केलेली आहे तर आदेश काय आला आहे याची माहिती प्रस्तावांवर मागवून ठेवा व ती सभागृहापुढे द्यावे.

**नगरसचिव :-**

मा. महापौरांनी जेवणाची सुट्टी जाहिर केलेली आहे.

**लंच टाईम :-**

दुपारी ०२.३० वा.

**नगरसचिव :-**

जेवणानंतर सभेच्या कामकाजाला सुरूवात करण्यात येत आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे, आपल्या अजेंड्यावरील विषय आहे. प्रश्नोत्तराचा तास, मागील सभांचे इतिवृत्तांत, सर्व निवडणूका, सर्व नियुक्त्या, मध्यम प्रश्न हे असे आहेत. आपण सर्व नियुक्त्या अशा कोणाच्या केल्या? नेमणूका, नियुक्त्या वगैरे?

**नगरसचिव :-**

नियुक्त्या केल्याबद्दल प्रशासनाचा माझ्याकडे असा कोणताही नविन प्रस्ताव आलेला नाही. नियुक्त्या केलेल्यांची माहिती नाही, प्रस्ताव आलेला नाही.

**शशिकांत भोईर :-**

माझ्या आणि सभागृहाच्या माहितीसाठी आपण आत्ताच्या आपल्या आस्थापनेवर उपायुक्त म्हणून श्री. ओमप्रकाश दिवटे साहेब आलेले आहेत. सभा चालू होती ती तहकूब सभा होती. त्याच्यात तो विषय आला नाही तर आम्ही मानू. पण आत्ता ही रेग्युलर सभा असल्या कारणाने विषय येणे गरजेचे होते. त्याच अनुषंगाने आपल्या महापालिकेस मी ज्यावेळेस पत्र दिले होते त्यावेळेस महापालिकेने मला एक खुलासा दिला होता की, आपल्या महापालिकेने आकृतीबंध निर्णय ४ मे २००६ ला आलेला आहे. आपण ज्यावेळेस सेवाभर्ती / सेवाप्रवेश विनियम २००५ बनविले ते नामंजुर केले की नाही. सभागृहाने फक्त मान्यता दिलेली आणि मंजुरीसाठी शासन निर्णयासाठी पाठविलेले आहे. परंतु, त्याच्यावर अजुन काही शासन निर्णय झालेला नसून शासनाचे एक परिपत्रक......

**मा. महापौर :-**

सन्मा. नगरसेवक आपण कुठल्या विषयावर बोलत आहात?

**शशिकांत भोईर :-**

साहेब नियुक्त्यांच्या विषयावर बोलत आहे.

**मा. महापौर :-**

पण तो विषय कुठे आहे?

**शशिकांत भोईर :-**

पण त्यांची आपल्या महापालिकेत नेमणूक होते ना.

**मा. महापौर :-**

कोणाची?

**शशिकांत भोईर :-**

श्री. दिवटे साहेबांची आपल्या प्रशासनाच्या आस्थापनेवर ते आले की नाही? की शासनाने पाठवले म्हणून आपण त्यांना डायरेक्ट चार्ज देणार? त्याला या सभागृहाची मंजुरी पाहिजे की, नाही?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मागच्या सभागृहामध्ये आपल्या समक्ष त्यांची ओळख करून दिली होती.

**शशिकांत भोईर :-**

ओळख करून दिली होती, आपण त्यांना आपल्या आस्थापनेवर नियुक्त केले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. प्रधान सचिवांचे आपल्याकडे पत्र आहे. अशी जी नियुक्ती होते त्याला सभागृहाची मान्यता असावी असे नाही.

**शशिकांत भोईर :-**

ठिक आहे. तुमच्याशी सहमत आहे. शासन निर्णयाप्रमाणे चर्चेचा विषय आहे म्हणून तुम्हाला सांगतो की, त्यांची नियुक्ती केली. त्याच्या अगोदर दि. १५/०१/२००७ चे महापालिकेने पत्र दिले होते की, ज्यावेळेस आपले तीन उप-आयुक्त आहेत असे आपले सेवाभर्ती नियम, सेवाप्रवेश नियम, विनियम २००५ मध्ये, आपण केले की तीन उपायुक्त असावेत त्या अनुषंगाने तीन उपायुक्त आहेत. तदनंतर ४ मे २००६ च्या महाराष्ट्र शासनाचा आकृतीबंध आपल्याला आला त्याच्यामध्ये आपली महापालिका ड वर्गाची आहे. हे त्याच्यात नमुद आहे. आणि आपल्याला कोणकोणती पद घ्यायची आहेत तेव्हा आपल्याकडे दोनच उपायुक्त होते. त्यावेळी जेव्हा मी पत्रव्यवहार केला होता तेव्हा प्रशासनाने मला पत्र दिले होते. मी ते पत्र वाचून दाखवित आहे.

(सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर यांनी सदर पत्राचे सभागृहासमोर वाचन केले.)

म्हणजे ज्यावेळेस आकृतीबंधामध्ये दोन उपायुक्तांची पद होती त्यावेळेस तीन उपायुक्त होते. मी त्यांच्या पत्राने चालेन. ती तीन होती ती राहू दे. जोपर्यंत एखादा उप-आयुक्त ह्याच्यातून कार्यमुक्त होत नाही. किंवा जात नाही. तोपर्यंत तीनच अस्तित्वात राहतील. परंतु, आता आपला शासन निर्णय आहे. त्या शासन निर्णयाचा अनुक्रमांक परिच्छेद ६ प्रमाणे आपण दोनच ठेवायला पाहिजे. मग तिसरा का? आपण एका ठिकाणी हा चर्चेचा विषय आहे. आपण म्हणता की, नियुक्ती केलेली नाही. मग त्यांना कसे काय नियुक्त केले? शासनाने पाठवले आपल्याला आवश्यकता आहे की, आपली दोन पद मंजुर असताना आपण तिसरा उपायुक्त घेउ शकतो का? हे तुमचेच पत्र आहे हे पत्र मला आयुक्तांनी दिलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. महापौरांच्या परवानगीने सन्मा. सदस्यांनी ज्याठिकाणी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्याबाबत मी खुलासा करतो. सन्मा. सदस्यांनी यापुर्वी जे शासनाने आकृतीबंध निश्चित केलेले आहे. महाराष्ट्रातील महापालिकेसाठी आणि त्यामध्ये आपली महापालिका ड वर्ग महापालिकेमध्ये समावेश होते. आणि त्या आकृतीबंधाप्रमाणे उपायुक्त पदासाठी दोन पदे त्याच्यामध्ये दर्शविलेली आहेत आणि त्यामध्ये जास्तीचे जर उपायुक्त असतील त्यानंतर त्यांची बदली झाल्यानंतर ते पद आपोआप संपुष्ठात येईल असे आकृतीबंधामध्ये नमुद आहे. त्याचा संदर्भ देवून सन्मा. सदस्यांनी एक उपायुक्त शासनाकडे परत पाठवावे असे पत्र शासनास आणि महापालिकेस दिले होते. त्या अनुषंगाने जी. आर. चा रेफरन्स देउन त्यांना ती वस्तुस्थिती अवगत करण्यात आली होती. शासनाने आकृतीबंध निश्चित करणे हे एक धोरण आहे. आणि आपल्या आस्थापनेवर जे पद मंजुर आहे ते शासनाने पद मंजुर केलेले आहे. त्या आकृतीबंधाचा इफेक्ट देवून जोपर्यंत ऑर्डर होत नाही तोपर्यंत ते पद लॅप्स होत नाही. समजा, आकृतीबंधामध्ये पाच इंजिनियर आहेत आणि आपल्याकडे ऑलरेडी सात इंजिनियर कार्यरत आहेत. त्या आकृतीबंधाचा रेफरन्स देवून जे सात इंजिनियर मंजुर झालेले आहेत त्याला इफेक्ट ऑर्डर काढणार नाही जोपर्यंत ते सात इंजिनियर कार्यरत राहतात.

**चंद्रकांत वैती :-**

मी आपल्याला या विषयात पाच मिनिटांकरिता थांबवत आहे. आपण जो आकृतीबंध प्रशासकिय कारकीर्दी मध्ये मंजुर केला त्यानंतर आपण सेवा शर्ती नियम बनवले ते ही त्या आकृतीबंधाला अनुसारून आज आपण सन २००५ नंतर सेवाशर्ती नियम बनवले आणि हे नियम शासनाच्या मंजुरीसाठी पाठवले तेव्हा २६ मे २००५ ला शासनाकडून एक पत्र दिले आणि उपरोक्त जी उपविधी आहे त्या प्रस्तावित उपविधीमध्ये खुप सुधारणा करावयाची आहे आणि सुधारीत सेवाशर्ती नियम शासनाकडे फेर मंजुरीसाठी पाठवावेत असे आठ पॉईंट लिहिले होते. नववा पॉईट लिहिला होता की, सदर सेवाशर्ती नियम हे इंग्रजीमध्ये असावेत. आयुक्तांनी चार महिन्या नंतर त्या प्रश्नाला उत्तर दिले होते आणि त्याच्यात लिहिले होते की, सदरची सुधारीत प्रस्तावित सेवाशर्ती नियम बनविण्याचे कामकाज सुरू असून इंग्रजीमध्ये देखिल बनवण्याचे कामकाज सुरू आहे आणि त्याची पुर्तता होताच आपल्याला कळवू. सन २००५ पासून या आयुक्तांनी या शहराचे साफ वाटोळे केले आहे. या शहराची या नागरीकांची घोर फरवणूक या आयुक्तांनी केली. त्यांना आदेश काय आला तो वाचायला सांगितले आपण ते वाचले नाही. आता एवढी सगळी चूक झालेली आहे आणि त्यामधल्या काळात श्रीम. दांडेकर बाईंनी या शहरामध्ये अनेक पदोन्नत्या आणि नियुक्त्या दिल्या हे संगणक चालक या शहरातले आहेत सर्व सभागृह सांगते की, या संगणक चालकांना लघुलेखकांना या महापालिकेच्या आस्थापनेवर घेतले पाहिजे अशा आशयाचे ठराव केले. आपल्या या दोन तीन अधिकाऱ्यांना ही नको होती. हे कर्मचारी नको होते मग त्यांनी तिथे पत्र पाठवले श्रीम. दांडेकर बाईंनी आदेश दिला की, आउट सोर्सीगने त्यांच्याकडुन काम करुन घ्या. पण त्यांना आस्थापनेवर घेता येणार नाही मग मागच्या सभेमध्ये लक्षदीपमध्ये त्यांना आयुक्तांनी का जाहिरात दिली? जर त्या लोकांना आउट सोर्सीगने घ्यायचे आहे मग लक्षदीप पेपरमध्ये तुम्ही कशी काय जाहिरात देता? ही जाहिरात देवुन लोकांची फसवणुक करायची या शहरवासियांची फसवणुक करायची ४२ टक्के आस्थापनेचा खर्च आहे आता तुम्हाला पुन्हा या सभागृहाला अवगत करु इच्छितो की, सेवाप्रवेश नियम सुधारित करावयाचे आहेत ते प्रस्तावित करायचे असतील तर त्याच्यामध्ये सुधारणा करण्याचा विषय मा. महासभेपुढे आला पाहिजे. मा. महापौर महोदय आपण जेवढ्या लवकर होईल तेवढ्या लवकर या विषयी एखाद्या तज्ञाचा सल्ला मागवुन मुख्यालय साहेब आपण या विषयात तज्ञाचा सल्ला मागवुन जे सेवाप्रवेश नियम आहेत. त्याच्यामध्ये ज्या काय सुधारणा करायच्या आहेत. त्या केल्या पाहिजेत नाही केल्या तर अशी भरती होत राहणार आहे. आज ४२ टक्के गेले पण आपल्याला प्रस्ताव नाकारायला लागतात. पण या शहराला काय दिले? फक्त कर्मचारी मी तर सचिवांना व हेड ऑफ दि डिपार्टमेंटला विनंती करत आहे की, तुम्ही पहिल्या माळ्यापासुन चौथ्या माळ्यापर्यंत जायचे आपण किती कर्मचाऱ्यांना ओळखता ते सांगायचे आमचे जुने कर्मचारी अजुन फाईल घेवुन फिरतात नविन आलेले सुटाबुटात फिरतात. या महापालिकेमध्ये आस्थापनेवर खर्च करताना महापालिकेची ७१ वाहने आहेत. तरी आपण १८ वाहने भाड्याने घेतले ते अधिकाऱ्यांच्या सोयीसाठी वरुन आपण काही लोकांना १८ हजार रुपये इंधनभत्ता देतो म्हणजे किती वाहनांवर आपण खर्च करत आहेत. यासर्व गोष्टीमध्ये खर्चामध्ये कपात करावी लागेल. यासगळ्या विषयांचा सांकल्याने विचार करावा लागेल असे विषय या सभागृहासमोर आणा आता आपल्याला कुठल्याही आर्थीक प्रशासकिय धोरणात्मक निर्णय घेता येणार नाही. येणारा आयुक्त आला तर जेवढया पदोन्नत्या दिलेल्या आहेत तेवढया सर्वाच्या चौकशा होणार? त्यांना परत त्या जागेवर आणुन बसवावे लागणार एखादी समिती गठीत केली जाईल. सगळ्या प्रकरणाची चौकशी केली जाईल त्याच्या आधी आपल्याकडुन अशा आशयाचा विषय या सभागृहासमोर आणुन सभागृहाचे मत त्यात आजमावले गेले पाहिजे आपण कृपया आयुक्तांना जे आदेश आले आहेत ते वाचावेत आणि ह्याच्यापुढे आपल्याला जर कोणतीही भरती करायची असेल किंवा पदोन्नोती द्यायची असेल तर राज्यशासनाला जी. आर स्पेसिफिक म्हणतोय. ज्या जी.आर चा घेवुन सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेब बोलत आहेत तो श्री. ना.बा.पाटील यांचा जी.आर आहे त्या जी.आर च्या शेवटच्या पानावर या महाराष्ट्रातल्या २२ महापालिकांसाठी २८ पदांचा आकृतीबंध सांगितलेला आहे त्याचा मिरा भाईंदरशी काही संबध नाही. तो संपुर्ण महाराष्ट्रासाठी

आकृतीबंध आहे ज्यांच्याकडे ती पद उपलब्ध नाही. त्याच्यासाठी परंतु, आता कुठल्याही प्रस्ताव आपल्याला संमत करायचा? जी आर.मध्ये स्पेसिफिक शासन निर्णयात म्हटलेले आहे की, ३५टक्के वर हा खर्च जात असेल तर हा खर्च ३५टक्के च्या वर जावू नये म्हणून आवश्यक असल्यास अत्यावश्यक वाटल्यास शासनाच्या पूर्वपरवानगीने अशी भरती करावी अन्यथा शासनाकडे देखिल अशा भरत्या अशा पदोन्नत्या मंजूरीसाठी पाठवू नये. असे स्पष्ट संकेत लिहिलेले आहेत. सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेबांचा मुद्दा आहे त्यांनी स्पेसिफिक २२ महानगरपालिकेकरिता जी.आर. निघालेला आहे. त्याच्यामध्ये शेवटच्या पानावर ३८ अधिकाऱ्यांचे जे आकृतीबंध सांगितलेले आहे त्याच्याबद्दलची माहिती घेत आहेत. अजून या सभागृहाला माहिती पुरवू इच्छितो की अनेक नगरसेवक पूर्वी देखिल व याच्यापुढे देखिल आपल्याला अधिकाऱ्यांकडून काय ठराव येतील आणि या ठरावांवर आपल्याला गोषवारा दिला जातो आणि आपण गोषवारा वाचून आपण दोन चार शब्दांची फेरबदल करतो. हा ठराव मी मांडत आहे आणि त्याला अनुमोदन देत आहे. सन्मा. सदस्य मिलन पाटील साहेबांनी एक ठराव मांडलेला आहे की त्याच्यामुळे आस्थापनेचा खर्च ३०टक्के च्या वर जाणार नाही. सन्मा. परशुराम पाटील यांनी एक ठराव मांडलेला आहे. त्याच्यामध्ये आस्थापनेचा खर्च २५टक्के च्या वर जाणार नाही आणि दस्तूरखुद्द आयुक्तांनी २००६ सालामध्ये नगरविकास खात्याला लिहून दिले आहे की, आस्थापनेचा खर्च हा सध्या १९टक्के आहे. ह्या पदोन्नत्या आणि नियुक्त्या केल्यास आस्थापनेचा खर्च अंशतः वाढून तो २०टक्के होईल आणि त्यावेळेला या महापालिकेच्या आस्थापनेचा खर्च ४२टक्के होता. श्री. सुनिल म्हात्रे या सर्व्हेअरने काय केले आहे? श्री. क्लासो फर्नांडिस यांनी काय केले? आमच्या येथील लोकल कर्मचारी कित्येक वर्षापासून आधीच्या नगरपालिकेत आणि आत्ताच्या महानगरपालिकेत सेवा देत आहेत. त्या श्री. सुनिल म्हात्रेला पदोन्नती द्यावी असे होते तर या श्रीम. दांडेकर बाईंनी तेथून महाराष्ट्र शासनाने एक ऑर्डर काढली. संपूर्ण महाराष्ट्राला आदर्श वाटावा अशी ऑर्डर १७ वर्षे काम करणारा कर्मचारी आहे. महाराष्ट्रात पहिली अशी ऑर्डर निघालेली आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये सर्व्हेअर हे पद प्रतिनियुक्तीवर आणावे. प्रतिनियुक्तीवर ही सर्व्हेअरची पद आणतात का? मी मागच्या सभेमध्ये सांगितलेले आहे. वरिष्ठ पातळीवर मी सगळ्यांची दाद मागणार आहे? त्याप्रकरणी आम्ही आमचे काम सुरु केलेले आहे. ज्या ज्या अधिकाऱ्यांची चौकशी लागणार होती त्यांची चौकशी लागलेली आहे. परंतु, असे जी.आर. मॅनेज करुन आणतात. असे शासन निर्णय मॅनेज करुन आणता. त्या संगणक चालकांना आस्थापनेवर घेण्याचा ठराव मांडला तर आपण लगेच तेथून शासन निर्णय करुन आणता की, आस्थापनेवर घेता येणार नाही? मग लक्षव्दीपमध्ये ती सुचना का दिली? गेल्या वेळेला जेव्हा आम्ही सांगितले, सर्व नगरसेवकांनी पोटतिडकीने भुमिका मांडली की, आम्हांला निदान एक कर्मचारी तरी लावता आले पाहिजे. भले तो सफाई कर्मचाऱ्यांच्या भुमिकेतून असेल किंवा सुरक्षा रक्षकाच्या भुमिकेतून असेल. सगळ्यांनी एक एक नाव द्यायचे ठरले. आयुक्तांनी शेवटपर्यंत सगळ्यांच्या तोंडाला पाने पुसली. जाता जाता १७० लोकांना अपॉईंट केले असते अशी भिती आम्हांला वाटत होती. ती भुमिका आम्ही शासनाकडे स्पष्ट केली होती. जो आदेश सचिवांकडून आला आहे त्या आदेशाचे सभागृहासमोर वाचन झाले पाहिजे अशी विनंती करतो.

**शशिकांत भोईर :-**

माझा मुद्दा पण तोच आहे. आत्ता सन्मा. नगरसेवक चंद्रकांत वैती साहेबांनी जो मुद्दा मांडला की ३५टक्के आस्थापनेवरचा खर्च पाहिजे. अगर आपल्याला आस्थापनेवरचा खर्च वाचवायचा असेल व आपल्याला दोन पद मंजूर असतील व शासन आकृतीबंध आहे व आपण म्हणत असाल की, तीन पाहिजे मग आपण या शासन निर्णयाचा अवमान केल्यासारखे वाटत नाही का? आणि आपण ज्यावेळेस कोणतेही कर्मचारी भरायचे तर शासन निर्णय का आणतो? त्याची आवश्यकता का असते? याचा मला पहिल्यांदा खुलासा करुन द्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

शासन स्तरावर जे निर्णय होतात त्याचा खुलासा आम्ही येथे कसा करणार?

**शशिकांत भोईर :-**

आयुक्तांच्या सहीनिशी हे पत्र आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

आपण हा मुद्दा समजून घ्या. आपल्याकडे महापालिकेला तीन उपायुक्त मंजूर आहे. आस्थापनेवर इतकी चर्चा होते...

**शशिकांत भोईर :-**

तीन नाही दोन आहे. आपला आकृतीबंध...

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपली ही १० वी बैठक आहे जी आस्थापनेवर चर्चा होत आहे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब तीन पदे कोणती आहेत? दोनच पद आहेत. ''ड'' वर्गाची आपली महापालिका आहे. श्री. ना.बा. पाटील यांचा जी.आर. आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

माझी उपमहापौर साहेबांनी आपल्याला त्यांच्यात भाषणात सांगितलेले आहे ते धोरण आहे. यापुढचे धोरण तसे राहिल. तुम्ही गैरसमज करुन घेउ नका.

**शशिकांत भोईर :-**

धोरण ठरवायला पाहिजे होते ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ते धोरण आहे. पद मंजूर नाही. आपण कृपा करुन गैरसमज करुन घेवू नका. ते धोरण आहे. ''ड'' वर्गामध्ये जे जे महापालिका येतील तिथे दोन उपायुक्त असावेत. शासनाचे धोरण आहे. त्याच्यासाठी महाराष्ट्रातले महापालिकेचे आर.आर.तयार होत आहेत. त्याच्यामध्ये या महापालिकेत जे एक्सेस पदे असतील त्याचे समायोजन वेगवेगळ्या पद्धतीने होईल. त्याची अंमलबजावणी अजून झालेली नाही. त्या धोरणाप्रमाणे पुढचे जे काम व्हायचे आहे. महाराष्ट्रातले सामुहिक सेवाशर्ती नियम तयार करायचे आहे ते काम प्रगती पथावर आहे. आपण एक वेगळा अर्थ काढत आहात.

**शशिकांत भोईर :-**

आपण बोलत आहात ते बरोबर समजते. धोरण जर निश्चित करायचे तर...

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

धोरण निश्चित झालेले आहे. आपण पोटतिडकीने बोलू नका. समजून घ्या. शासनाने धोरण निश्चित केल्यानंतर त्याच्यापुढचे जे कामकाज व्हायला पाहिजे त्या धोरणाप्रमाणे व्हायला पाहिजे मी ही त्याच्याशी सहमत आहे. पण ते अजून शासन निर्णयाप्रमाणे आलेले नाही. आपल्याकडे तीन उपायुक्त पद मंजूर आहे. आपल्याला हे मान्य आहे का?

**शशिकांत भोईर :-**

मला मान्य नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.) साो.) :-**

आपल्या आस्थापनेवर मंजूर आहे. मान्य नाही असे कसे आपण म्हणता? मंजूर आहे.

**शशिकांत भोईर :-**

मी ज्यावेळेस पत्र दिले होते तेव्हा एक्स्ट्रा जे पद आहे ते आपोआप रद्द होईल असे होते. मग आपल्याला तिसरा उपायुक्त कशाला पाहिजे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.) सो.) :-**

कृपा करुन गैरसमज नको. महापालिका प्रशासन...

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

आपल्या आस्थापनेवर तीन पदे ऑलरेडी मंजूर आहेत त्यामध्ये एक पद आपण भरलेले आहे आणि जी दोन पदे आहेत ती ५०-५० टक्क्याप्रमाणे शासनाकडे भरायचे आहे. महापालिकेचा भरायचा आहे. पण जेव्हा आपली दोन पद राहतील तेव्हा तुम्ही ती एकाकी म्हणाल. आतापर्यंत आपल्याकडे तीन पदे आहेत. तुम्ही एकाकी पद तुमच्या प्रस्तावामध्ये भरत आहात. तुम्हांला काय म्हणायचे आहे ते मला सुद्धा त्या प्रस्तावामध्ये काय कळले नाही.

**शशिकांत भोईर :-**

असेच म्हणायचे आहे. त्याला काय करायचे आहे?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

शासनाच्या आकृतीबंधाप्रमाणे ते तयार व्हायचे आहे. तोपर्यंत हे तीनच राहणार आहेत.

**शशिकांत भोईर :-**

सेवाशर्ती नियम हे शासनातर्फे मंजूर झालेले नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्या धोरणाप्रमाणे एका उपायुक्तांनी बदली झाल्यानंतर दुसऱ्या उपायुक्तांनी पोस्टींग व्हायला नको अशी आपली भावना आहे.

**शशिकांत भोईर :-**

बरोबर आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

आपण ते स्पष्ट मांडा ना. आपण मुद्दा मांडत नाही. तो बाजूला राहतो आणि आपण वेगळीच चर्चा करतो. पण आपल्याला सांगू इच्छितो की शासन अजून त्या अंतिम निर्णयाला आले नाही. जे तुम्हांला अपेक्षित आहे. ते होईल तेव्हा ते निश्चितच होईल ना. एक आयुक्त कमी होवून जाईल. पण तसे झाले नाही तुम्ही सुद्धा सन्मा. पाठक साहेबांकडे गेल्यानंतर या धोरणामध्ये जी पद निश्चित केलेली आहेत ती सुद्धा वाढू शकतात असे तुम्हांला स्पष्ट सांगितले होते.

**शशिकांत भोईर :-**

साहेब ते बरोबर आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त मु. (सोा.):-**

धोरणामध्ये मिरा भाईंदर महापालिकेकरिता जरी दोन उपायुक्त दिलेले आहेत तरी मिरा भाईंदर महापालिकेचे कामकाज विचारात घेता, तुमची सुचना अमान्य केली साहेबांनी, तुम्हांला सुचना दिल्या की याच्यापेक्षा जास्तीची सुद्धा ठेवण्याची गरज पडली तर आम्हांला ठेवायला लागेल. मला असे म्हणायचे आहे की, कोणाची तरी वेगळी चर्चा करुन त्याच्यातून काहीच साध्य होणार नाही. आपण याठिकाणी काय निर्णय करणार? किंवा त्याची काय चर्चा करणार? माजी उपमहापौर साहेबांनी तो मुद्दा मांडला की त्या धोरणाप्रमाणे अजून अंमलबजावणी शासनाने अस्तित्वात आणलेली नाही ते भविष्यात येईल. कदाचित त्याच्यात सुधारणा होईल किंवा तेवढेच राहिल. त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी होईल.

**शशिकांत भोईर :-**

म्हणजे आपण जे पत्र दि. १५/१/०७ रोजी दिले ते धोरणाला निश्चित धरुन नाही. म्हणजे हे आपले खोटे पत्र आहे. तुम्ही पण आमच्या तोंडाला पान पुसल्यासारखीच आहे. साहेब, आता आयुक्तांच्या जागी आपण बसला आहात ना. जेव्हा महापौरांच्या जागी दुसरा कोण बसेल तेव्हा आम्ही त्याला पिठासिन अधिकारी म्हणूनच संबोधू. आपण तिथे बसला आहात म्हणून आपल्या सहीनिशी बोलणार.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त मु. (सोा.):-**

कामकाजामध्ये जे प्रचलित शासनाचे धोरण जी.आर. असतात. त्याचा रेफरन्स देवून आपल्याला पत्रव्यवहार केलेला आहे. ती चूक नाही जे धोरण होते ते धोरण आपल्याला अवगत झालेले आहे. आपण माहिती मागितली होती त्याचे उत्तर देणे अपेक्षित होते.

**शशिकांत भोईर :-**

उत्तर दिले. पण आता एक पद रिक्त झाल्यानंतर ही आपण दोन पद का ठेवत नाही? तुम्हीच कळविता की एक ज्यादा पद गेल्यानंतर दोनच पद ठेवण्यांत येतील.

**मा. महापौर :-**

पुढे भविष्यात आपण करुन घेउ व सन्मा. नगरसेवक चंद्रकांत वैती साहेबांनी सांगितले की सेवाप्रवेशामध्ये जे काय फेरफार करायचा आहे तो आपण नक्कीच सभागृहापुढे आणू. पत्र वाचून दाखवा.

**सिसिलिया बावीघर :-**

मा. महापौर साहेब, माझा प्रश्न असा आहे की आज मिरा भाईंदरच्या उत्तन गावात गोराई रोडवर ज्युडीशिएन कॉलेजचे उद्‌घाटन आहे. भुमिपूजन आहे त्याठिकाणी तुम्ही त्यांना सगळ्या व्यवस्था करुन दिल्या. साफसफाई केली आणि याठिकाणी एवढे ७९ नगरसेवक आहेत. तिथे याच्यापैकी कोणालाही बोलावले नाही. आपण महापौरांनाही त्यांनी बोलावले नाही का?

**मा. महापौर :-**

अजून कुठलेही आमंत्रण आलेले नाही.

**सिसिलिया बावीघर :-**

त्याठिकाणी दिडशे वर्षापासूनची वहीवाटाची चर्चच्या कब्ज्याची जमिन आहे तिथे उद्‌घाटन करता आणि यावर महानगरपालिका काहीच करत नाही याचे मला उत्तर पाहिजे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त मु. (सोा.) :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलत आहे की, शासनाच्या जागेवर नियमाप्रमाणे त्या ॲकेडमी शासन त्याठिकाणी कार्यान्वित करत आहे.

**सिसिलिया बावीघर :-**

पण तिथे दिडशे वर्षापासून आमच्या चर्चचा कब्जा आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त मु. (सोा.) :-**

मॅडम, तो विषय या सभागृहाचा नाही.

**सिसिलिया बावीघर :-**

संबंध आहे आणि महानगरपालिकेचे त्यांना तिथे साफसफाई कशी करुन दिली? आपला विषय नाही तर आपण त्याठिकाणी झाडे वगैरे कशी तोडली?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त मु. (सोा.) :-**

आपण कोणते झाड म्हणता?

**सिसिलिया बावीघर :-**

ज्याठिकाणी भूमिपूजन होणार आहे तिथली तुम्ही झाडे वगैरे तोडली आहे व महानगरपालिकेने चौकी ही उभारलेली आहे. मग तुमचा प्रश्न नाही असे कसे आपण बोलता.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त मु. (सोा.) :-**

सार्वजनिक बांधकाम विभागाचे कर्मचारी त्याठिकाणी काम करतात. जागा विकसित करणे किंवा तिथे त्या ॲकेडमी करणे हा मिरा भाईंदर महानगरपालिकेचा विषय नाही. तो राज्य शासनाचा विषय आहे.

**सिसिलीया बावीघर :-**

राज्य शासनाचा विषय असला तरी आपण त्याठिकाणी आपल्या महानगरपालिकेतर्फे साफसफाई केली. झाडे तोडली आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त मु. (सो.) :-**

आपण परवानगी दिली.

**सिसिलीया बावीघर :-**

त्या ठिकाणी आपल्या महानगरपालिकेची चौकीपण आहे. पोलिस चौकी स्थापन केलेली आहे. त्यांना प्रोटेक्शन व सगळी साफसफाई ही पण......

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त मु. (सो.) :-**

सदर काम झाडे तोडण्यासाठी सार्वजनीक बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन हे करत आहे. आपली महापालिका करत नाही. महाराष्ट्र शासन यांचा आम्हांला प्रस्ताव आला होता आयुक्त साहेबांनी त्यांना झाडे तोडण्याची परवानगी दिलेली आहे. आणि सदरचे काम महाराष्ट्र शासनाचे सार्वजनीक बांधकाम विभाग करत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, ज्युडीशिएशन कॉलेज बनत आहे ही आनंदची गोष्ट आहे. शहराच्या अभिमानाची गोष्ट आहे. पण शेवटी त्याला परवानगी कोण देणार?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त मु. (सो.) :-**

महापालिका

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महापालिका परवानगी देणार आहे. महापौर या शहराचे सन्मा. प्रथम नागरिक आहे. जेव्हा या देशाचे पंतप्रधान या शहरामध्ये आले त्यांनी प्रोटोकॉलप्रमाणे या शहराचे प्रथम नागरिक म्हणुन त्यावेळी त्यांना बोलावुन त्यांच्याकडुन पुष्पगुच्छ स्विकारला होता आणि आज आमचे महापौर सभागृहात येथे बसले आहे. आणि तिथे त्यांचा कार्यक्रम होणार आहे. परवानगी आपण देणार आहेत म्हणजे हे या शहराच्या प्रथम नागरिकाचा अपमान आहे. येथे एक ज्युडीशिएशन कॉलेज येथे उघडत आहे. त्यांना हे माहित नाही. की,आम्ही या शहरामध्ये येवुन कोणाचा अपमान करत आहेत? याची दखल आपल्या शहरांमध्ये कोणी घेतली की नाही?

**हेलन गोविंद :-**

सन्मा. महापौर साहेब, सरकार सांगतो की झाडे लावा. झाडे जगवा. किती वर्षे झाले ती पडित जागा होती. चर्चची जागा होती. आम्ही स्कुलमध्ये असतांना आम्ही विद्यार्थी तिथे जावुन आमच्या हाताने ती झाडे लावली त्याला पाणी घातले आहे ती झाडे लावली आणि आज सरकारच झाडे तोडायला लागली तर काय करायचे? प्रत्येक महापालिकेचे परमिशन आपण कसे काय द्यायला लागले? तिथे ३०-३० वर्षापासुनची घर होती ती घरे तोडली.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यांना महापालिकेची गरज वाटणार नाही का? असे हे ज्युडीएशन येथे दिल्लीहुन पाणी आणणार आहे का? म्हणजे शेवटी या शहराकडुन जे मागत आहे. त्यांना आम्ही ते द्यायला तयार आहेत आणि या शहराच्या महापौरांना साध निमत्रंण देण्याचे सोडुन द्या पण आपल्याकडुन त्यांना सर्व गोष्टी हवी आहे. अशावेळी या सभागृहाचा अपमान केलेला आहे. भले कुठलीही ज्युडीशिएन असो आपण एखाद्या कोटीमध्ये विशीष्ट विषयाची येथे चर्चा केले की, त्यांचा अपमान होतो.

**हेलन गोविंद :-**

आपण कोर्टाची मागणी करत होतो तेव्हा आपल्याला दिले नाही. कित्येक वर्षापासुन सदस्य कोर्टाची मागणी करत आहेत आणि जज लोकांना तिथे.....

**मा. महापौर :-**

ठिक आहे. आपण पत्र वाचुन दाखवा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नगररचना विभागाने त्याला काहीतरी परवानगी दिली असेल त्यावेळी जाणीव करुन दिली की, नाही? यासभागृहात स्थानिक नगरसेवक आहेत त्यांना पत्रिका दिली पाहिजे की, नाही?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त मु. (सो.) :-**

आपल्या भावनांची सभागृहात नोंद झालेली आहे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, आपण बोलता की, हे श्री. ना.बा.पाटील यांचे पत्र आहे. मी आपल्याला फक्त एक मजकुर वाचुन दाखवितो. महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त मु. (सो.) :-**

महाराष्ट्र शासनाचा कारभार कुठल्याही शासन निर्णयाचे ..

**शशिकांत भोईर :-**

म्हणजे त्यांना राज्यपालाचे आदेश आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त मु. (सोा.) :-**

महाराष्ट्र शासनाचा कारभार कुठल्याही शासन निर्णयाचे.....

**शशिकांत भोईर :-**

म्हणजे त्यांना राज्यपालाचे आदेश आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त मु. (सोा.) :-**

महाराष्ट्र शासनाचा कामकाज प्रत्येक विभागाच्या मा. राज्यपालाच्या आदेशाने होतो आणि तशीच प्रकारचे जी.आर निघतात.

**शशिकांत भोईर :-**

म्हणजे त्यांनी जे आदेश दिले ते मान्य नाही?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त मु. (सोा.) :-**

कोणाला मान्य नाही?

**शशिकांत भोईर :-**

आपणासं ..

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त मु. (सोा.) :-**

कोण बोलले मान्य नाही?

**शशिकांत भोईर :-**

धोरणात्मक आहे म्हणुन बोलतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त मु. (सोा.) :-**

जे धोरण आहे त्याप्रमाणे पुढे काम होणार आहे असे मी म्हणतोय.

**शशिकांत भोईर :-**

आपण हा जी.आर वाचला आहे का/

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त मु. (सोा.) :-**

ते धोरण आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

आपण हा जो ज चा ठराव मांडला आहे

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त मु. (सो.):-**

त्याबाबत मी आपल्याला सांगतो.

**शशिकांत भोईर :-**

तो ज चा ठराव नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य, शशिकांत भोईर साहेब याच्या अतिरीक्त आपणाला जास्त माहिती हवी असेल तर आपल्याला रितसर माहिती देवु.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त मु. (सोा.) :-**

राज्यशासनाकडुन प्रशा प्र.क्र. मि.भा.म.न.पा/१००७/१८२४/नवि२८,नगरसचिव विभाग मंत्रालय मुंबई ४०० ०३२ दि. निरंक विषय - शासनाकडे प्राप्त तक्रारी पत्राच्या संदर्भात के.एन.खवारे, सहसचिव यांचे हे डि.ओ.पत्र आहे. श्री. गायकवाडे मिरा भाईंदर महानगरपालिकेने अलिकडच्या काळात घेतलेल्या काही निर्णया बाबत तक्रार अर्ज शासनाकडे प्राप्त झालेले आहे.या अनुषंगाने कळविण्यांत येते की, अत्यंत घाईने कोणतेही निर्णय घेवुन त्यात त्रुटी राहु नये यासाठी पुढील ओदश होईपर्यंत महापालिकेच्या कोणत्याही ठरावाची अमंलबजावणी करण्यांत येवु नये महापालिकेचे आर्थिक हित जोपासण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आर्थिक निर्णय घेउ नये महापालिकेत कोणतीही पदभरती रिक्रुटमेंट करु नये. तसेच, कोणतेही महत्त्वाचे निर्णय शासनाच्या पुर्व परवानगी शिवाय घेण्यात येवु नये. टाळता न येण्या जोग्या काही बाबी असल्यास निर्णय घेण्यापुर्वी शासनाकडे प्रस्ताव पाठवुन विचारणा करावी. आपल्या स्नेहांकित के.एन. खवारे. (सही) प्रति - श्री. सुदाम गायकवाड, आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, शासनाकडे याचा तक्रारदार कोण आहे?

**मा. महापौर :-**

त्याची माहिती आपल्याजवळ आली नाही.

**जयंत पाटील :-**

फक्त पत्रच वाचायचे होते की, आणखिन काय माहिती पाहिजे होती? म्हणजे हा जो आदेश दिलेला आहे तो मुख्यमंत्र्यानी दिलेला आहे की, श्री. के.एन. खवारे यांनी दिलेला आहे. ते उपसचिव आहे. म्हणजे या आदेशाचे पालन किती करायचे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त मु. (सो.) :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो. की, श्री. खवारे साहेब हे उपसिचव नाही तर सहसचिव आहेत आणि हे आदेश महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाचे आहे आणि त्याच्या अंमलबजावणीकरिता सर्व विभागप्रमुखांना मा. आयुक्तांनी तंतोतंत आदेश काढलेले आहेत. ह्या आदेशाची फक्त अंमलबजावणी होत आहे.

**जयंत पाटील :-**

हा आदेश फक्त आपल्या महापालिकेकरिता आलेला आहे की, इतर महापालिकेकरिता पाठविलेला आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त मु. (सो.) :-**

फक्त मिरा भाईंदर महानगरपालिकेकरिता आलेला आदेश आहे.

**जयंत पाटील :-**

ह्याच्यामध्ये काही गोष्टी लिहिलेल्या आहेत. निर्णय घेण्यापुर्वी शासनाकडे प्रस्ताव पाठवुन विचारणा करावी. किंवा महापालिकेच्या कोणत्याही ठरावाची अंमलबजावणी करण्यांत येवु नये. म्हणजे आज जे आम्ही ठराव करणार त्याची अंमलबजावणी होणार नाही का? त्याच्यानंतर आपण खाली असे ही लिहिले आहे की, महत्त्वाचे आर्थीक निर्णय घेवु नये. म्हणजे इकडचे दगड हलवायचा झाला तरी आम्हांला खर्च येतो एक मजुर आणावा. लागतो. मग आपण कसलीही आर्थीक मंजुरी देणार नाही का? निर्णय घेणार नाही का? आम्हाला अडीच कोटी रुपये जिवनप्राधिकरणाला पाण्याचे भरायचे आहे ते आपण भरु शकतो की, नाही? आर्थीक ज्या गोष्टी आहेत. अत्यावश्यक गोष्टी महापालिकेला करायचे आहे. त्या संबधी आपल्याला आर्थीक निर्णय घेता येईल का ते आम्हांला सांगा किंवा कोणाला माहिती असेल त्यांना सांगावे उद्या या शहराची पाण्याची समस्या आहे या संबधी त्यांनी तक्रार केली असेल आमच्याकडे त्याची संपुर्ण माहिती आहे. जेवढी माहिती तिथे आहे. तेवढीच माहिती येथे आहे. म्हणजे सर्व केवढ्या पाण्यात आहोत ते सगळ्यांना कळेल. या शहराची जर प्रगती व्हायची असेल याशहरात धोरणात राबवायचे असतील तर अशातऱ्हेच्या गोष्टी या शहराला फायदेशीर आहे का? हा माझा विचारण्याचा भाग आहे. आणि मी आपल्याला सभागृहात हे ही सांगु इच्छितो की, आर्थिक निर्णय घेण्याचे अधिकार आम्हांला आहेत. आर्थिक निर्णय घेतांना योग्य असतील तर त्यांची अंमलबजावणी दुसऱ्या दिवशी मी करुन दाखवतो. असे कुठले घाबरण्याचे कारण नाही. पत्र वाचले म्हणजे अगदी आम्ही खुप काही केले आहे. किंवा खुप काय करुन दाखवले असे ही नाही हे निर्णय जे महापालिकेचे अत्यावश्यक गोष्टी आहेत. जर कोणी केले असते. हे पत्र श्री. गायकवाड आयुक्त यांच्यासाठी आहे महापालिकेचे जे अधिकार आहेत. ही एक स्थानिक स्वराज्य संस्था आहे व त्याचे जे अधिकार आहेत ते अबाधित आहेत. ते कोणालाही नाकारता येणार नाही. श्री. गायकवाड साहेबांचे अधिकार त्यांनी काढुन घ्यावेत जर त्याच्याकडुन काही चुका झाल्या असतील तर त्याला आम्ही बांधिल नाही. ही आमची जबाबदारी नाही. परंतु, महापालिकेच्या लोकांची सेवा करायची आहे. आम्हांला लोकांना ज्या सोयी सुविधा द्यायच्या आहे. त्या संबधी कोणीही अडवणुक करणार नाही. हे पत्र ज्यांनी पाठवलेल्या श्री. खवारे साहेबांना आम्ही भेटलो आणि त्यांच्या वरचे जे आहेत. त्यांच्याशी आमची काल भेट झाली त्यांनी आम्हांला स्पष्ट शब्दात सांगितले की, तुम्हांला आर्थीक निर्णय घेण्यामध्ये कोणतीही अडचण येणार नाही. तुम्ही तर कुठल्याही तऱ्हेचा आर्थीक निर्णय घेतला की, त्याला मी येथे ताबडतोब परवानगी देईल. या शब्दात त्यांनी स्पष्ट सांगितलेले आहे. हे मी आपल्याला माहितीसाठी सांगतो.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, तक्रारदार कोण आहे?

**मा. महापौर :-**

त्यांनी आपल्याला तक्रारदाराचे नाव दिलेले नाही.

**जयंत पाटील :-**

तक्रार कोणाची आहे? हे सांगितल्यावर त्यांना अडचणीचे होईल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त मु. (सो.) :-**

याचा मी खुलासा करतो, महापालिकेवर कुठलेही आर्थिक निर्बंध नाही. त्या पत्राच्या मतीतार्थ असा आहे की, महापालिकेचे निर्णयशक्ती आम्ही बाधित केलेले नाही. महापालिकेचे, महासभेचे जे निर्णय आहेत त्याबद्दल याच्यात काहीच नाही.

**जयंत पाटील :-**

ते पत्र वाचल्यानंतर येथे बऱ्याच जणांना घबराहट सुटला आणि आम्ही ते केले असे त्यांना वाटले. हे पत्र आपले स्थानिक आमदार श्री. मुझफ्फर हूसैन साहेबांनी लिहिलेले आहे.

(सभागृहात गोंधळ)

**चंद्रकांत वैती :-**

आपण काय बोलत आहात ते माहित आहे का?

**शशिकांत भोईर :-**

आपल्याला हे शब्द मागे घ्यायला लागेल.

(सभागृहात गोंधळ)

**याकूब कुरेशी :-**

सन्मा. नगरसेवक जयंत पाटील यांनी चुकीचा शब्द वापरलेला आहे.

**एस. ए. खान :-**

आयुक्तांची तक्रार केलेली आहे.

**जयंत पाटील :-**

कोणी केली? मी शांतपणे बोलत आहे ना.

**चंद्रकांत वैती :-**

मनात येईल ते बोलू नका.

**याकूब कुरेशी :-**

सभागृहात वाटेल ते बोलू नका.

**जयंत पाटील :-**

वाटेल ते बोलतोय. काय करायचे आहे ते करुन घ्या.

**प्रभात पाटील :-**

महापालिकेची काम करायला कोणी कोणाला रोखले आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त मु. (सो.) :-**

साहेब ह्याच्यामध्ये महापालिकेचे काहीच घेणं नाही. महापालिकेच्या अधिकाराबाबत कोणताही आक्षेप नाही.

**प्रभात पाटील :-**

कुठेही मूळीच आक्षेप नाही.

(सभागृहात गोंधळ)

**चंद्रकांत वैती :-**

आम्हांला ते पत्र वाचून घ्यायचे होते आणि येथे तुम्हांला वकीली करायची नाही. आपण येथे कोणाबद्दल बोलत आहात? आमच्या नेत्याबद्दल काहीही बोलले तर आम्ही ते ऐकून घेणार नाही.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण खाली बसा. येथे काय चालले आहे. सभागृहात माईक फेकण्याची ही काय पद्धत आहे? आपण सर्वांनी खाली बसावे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सभागृहात सभा चालणार असे दिसत नाही म्हणून मी ही सभा तहकूब करित आहे.

**चंद्रकांत वैती :-**

सचिवजी सदरची सभा किती वेळाकरिता तहकूब करण्यांत आलेली आहे?

**नगरसचिव :-**

मा. महापौर महोदयांच्या आदेशाने, पुढील लेखी सुचना निघेपर्यंत सदरची ही सभा तहकूब करण्यांत येत आहे.

**सभा तहकूबची वेळ :- सायं :- ४.०० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**